मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
»» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.
»» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
»» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

मुंबई | RNI No.: MAHAMAR/2016/79101 | »» गुरुवार, ३ जुलै २०२५ | »» वर्ष: १० »» अंक: ६३ | »» पाने-८ | »» किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## शेख हसीना यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा

**ढाका, दि. २ प्रतिनिधी**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने एका अवमान प्रकरणात शेख हसीना यांना सहा महिन्यांची शिक्षा ठोठावली आहे. बांगगलादेशमधील क्राइम ट्रिब्युनलचे न्यायमूर्ती मोहम्मद गुलाम मुर्तुझा मोझुमदार यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने शेख हसीना यांना ही शिक्षा सुनावली आहे. गैबांधामधील गोविंदगंजच्या रहिवासी शकील अकंद बुलबुल यांना देखील याच प्रकरणात दोन महिने तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बुलबुल या आवामी लीगच्या विद्यार्थी शाखेशी म्हणजेच बांगलादेश छात्र लीगशी संबंधित आहेत. हा अवमान खटला शकील अकंद बुलबुल यांच्याशी झालेल्या कथित फॉन कॉलशी संबंधित आहे. या कथित कॉलमध्ये शेख हसीना नावाची व्यक्ती म्हणत होती की "माझ्याविरोधात २२७ खटले चालू आहेत. त्यामुळे मला २२७ जणांना ठार मारण्याचा परवाना मिळाला आहे."

## अग्रलेख — खरीखरी

### असा आपला मराठीपणा

भारतात अनेक प्रांत आहेत. तिथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. पण आपला महाराष्ट्र देशाच्या मध्यभागात आहे. एका बाजूला दक्षिण भारतातील राज्ये आणि दुसऱ्या बाजूला पूर्व आणि उत्तरेकडील राज्ये अशा विभागणीमध्ये मध्यभागी असलेला महाराष्ट्र भारतातील इतर राज्यांपेक्षा वेगळाच आहे. भारतावर आक्रमण केलेल्या प्रत्येक सत्तेशी संघर्ष करणारा फक्त महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात राहणारा फक्त आणि फक्त मराठाच आहे. मोगली सत्तेशी झुंजला तो छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील मराठा. इंग्रजांशी लढला तोही महाराष्ट्रातील मराठाच. अशा प्रकारचे धाडस करणारा देशात एकमात्र प्रदेश आहे तो म्हणजे फक्त महाराष्ट्र. याच महाराष्ट्र प्रदेशामध्ये पश्चिमेला सह्याद्री पर्वत आहे. उत्तरेत सातपुडा पर्वत आहे. या दऱ्याखोऱ्यातील गोदा, कृष्णा, तापी यासारख्या नद्या आणि त्यांच्या इतर उपनद्या यामुळे इथे एक विशिष्ट जाळे निर्माण झालेले आहे. ते जाळे आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले किल्ले म्हणजे महाराष्ट्राची शान आहेत. अशा आपल्या महाराष्ट्रात शुद्ध महाराष्ट्रीयन म्हटल्यावर आर्य आणि द्रविड यांचे मिश्रण आढळते आणि त्यांचे संमिश्र गुणही मराठी माणसात आढळून येतात. महाराष्ट्रात धर्म आणि समता आढळते. ते या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रात स्वातंत्र्यप्रियता ही जन्मजात असते. आपला महाराष्ट्र उत्तरेकडील राज्यांप्रमाणे धर्माबाबत आग्रही नाही. आपल्याला काही काळ गुलामगिरी पत्करावी लागली. तरी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महाराष्ट्राने सदैव पुढाकार घेतलेला आहे. मराठी माणूस व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देतो. येथील लोक साधे आहेत. प्रामाणिक आहेत. महाराष्ट्रातील लोक शेती करतात. पण त्यासोबतच ते लढाऊ सुद्धा आहेत. न्यायासाठी किंवा न्याय मिळवण्यासाठी ते कोणालाही भीत नाहीत. शत्रूलाही आधीपासूनच सूचना देतात आणि मगच त्यांच्यावर आक्रमण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही शत्रूंना पकडल्यावर त्यांना कधीच ठार केले नव्हते, असाच इतिहास आहे. या प्रांताची जनता शिक्षणाला महत्त्व देते. असा आपला महाराष्ट्र आहे. म्हणजे हा महाराष्ट्र स्वर्गासारखाच आहे चक्रधर स्वामींनी मराठी लोकांचे वर्णन करताना म्हटले आहे की, "महाराष्ट्र थोर आणिक कैसे थोर, जेणुका अर्थी आपुली थोरी असे। ते तुलाही अर्थी आणिकासी थोरी करी, थोरापासौनि महाथोर तयाते महाराष्ट्र म्हणिजे। " असे महाराष्ट्राच्या थोरपणाचे निर्भयतेचे महाराष्ट्राच्या शौर्याचे, युद्ध पारंगततेचे वर्णन प्राचीन वाङ्ग्यात दिसून येते. मराठी माणसाच्या अंगी स्वाभिमान आणि बाणेदारपणा कसा आलेला आहे. याचे उदाहरण म्हणजे पंडित नेहरू पंतप्रधान असताना, त्यांच्या मंत्रिमंडळातील चिंतामणराव देशमुख यांनी आपल्या अर्थमंत्री पदाचा राजीनामा देऊन आपला स्वाभिमान दाखवून दिला होता. महाराष्ट्राच्या महापुरुषांमध्ये हा मराठीपणा ओतप्रोत भरलेला आहे. आग्रा येथे क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कैदेत शिवाजी महाराज होते. पण महाराजांनी त्याच्या दरबारात गर्वाने छाती फुगवून त्याला आव्हान द्यायला कमी केले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांची ती जबरदस्त सिंहगर्जना म्हणजेच शिवगर्जना त्याकाळी समस्त आग्राकरांनी अनुभवली. बादशाहीची खिल्लत फेकून देणारा आमचा राजा असा बाणेदार होता. त्याच गादीचे शेवटचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी तसेच धैर्य दाखवले. इंग्रजांनी त्यांच्यावर धोकेबाजीचे आरोप करून त्यांचे राज्य हिसकावले. पण इंग्रजांच्या धमक्यांना ते कधीच बधले नाहीत. खोट्या आरोपांना मी कधीच उत्तर देणार नाही. असे सांगून त्यांनी आपले राज्य म्हणजे स्वराज्य रक्षक संभाजी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीचा उल्लेख केला. त्यासोबतच आपण खोटेपणा असलेल्या आरोपांना जराही उत्तर देणार नाही आणि तुमच्या न पटणाऱ्या अटी मान्य करणार नाही. असे सांगून आपला बाणेदारपणा दाखवला. पानिपतच्या लढाईमध्ये अहमदशहा अब्दालीसह त्याच्या सेनापतीला 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे म्हणणारे दत्ताजी शिंदे यांनी मरणाच्या दारावरही यमाला थांबवण्याचा देदीप्यमान मराठीपणा सोडला नव्हता. आज या महाराष्ट्राला अशाच मराठीपणाची गरज आहे. मराठ्यांचे हे ऐतिहासिक मराठीपण आणि स्वातंत्र्यप्रियता अंगिकारणे हाच महाराष्ट्र धर्म आहे. त्यासाठी, "।मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा।" हेच आपले ब्रीदवाक्य असले पाहिजे. महाराष्ट्राच्या या स्वातंत्र्यप्रियतेमुळेच दिल्लीच्या तक्ताला मराठ्यांची भीती वाटते. त्यामुळेच शक्य असूनही मराठी नेतृत्वाला दिल्लीचे तख्त मिळू नये. असे प्रयत्न होतात. यापुढे दिल्लीच्या राज सिंहासनावर मराठा म्हणजे मराठी ; आणि मराठी म्हणजे महाराष्ट्र दिसेल काय?

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# ड्रग्सची तस्करी करणाऱ्यांना मकोका लागणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची परिषदेत घोषणा



**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

राज्यात अंमली पदार्थाची तस्करी वाढली आहे. मागील पाच वर्षात जवळपास सव्वा पाच हजार किलो अंमली पदार्थ (एमडी) आणि कच्चा माल जप्त केला आहे. तर ११६ आरोपींना अटक केली. अमलीपदार्थांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन तस्करी करणाऱ्यांना मोक्का लावणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली. तसेच या अधिवेशनात कायद्यात सुधारणा करणारे विधेयक मांडले जाईल, अशी माहिती विधान परिषदेत दिली.

राज्यात अमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मेफेड्रॉन तस्करीत महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे केंद्र बनले आहे. गेल्या तीन वर्षांत देशभरातील मेफेड्रॉनच्या एकूण ७६ टक्के प्रकरणांपैकी १ हजार ४८६ प्रकरणे महाराष्ट्रातील आहेत. पोलिसांनी, राज्य सरकारने यावर काय कारवाई केली, वाढत्या तस्करीला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, असा प्रश्न परिणय फुके यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, राज्यात एमडीला आळा घालण्यासाठी २०२२ मध्ये ३०३ गुन्हे, २०२३ मध्ये ६४२ गुन्हे आणि २०२४ मध्ये ५४५ गुन्हे दाखल केले. गेल्या पाच वर्षांत एएनसी मुंबई पोलीस, महसूल गुप्तचर संचालनालय आणि एनसीबी (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) यांनी अमली पदार्थांच्या निर्मिती करणा-या कारखान्यांवर कारवाई केली. एएनसी मुंबई पोलिसांनी या प्रकरणी १२ गुन्हे दाखल करत ७५ आरोपींना अटक केली. तसेच महसूल गुप्तचर संचालनालयाने ४ गुन्हे दाखल करून २२ जणांना अटक केली तर एनसीबीने ३ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच जामिनावर बाहेर आल्यानंतर पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे केल्यास केंद्र सरकारच्या सहकार्याने सगळ्या राज्यांची को-ऑर्डिनेशन कमिटी तयार झाली आहे. त्यामुळे दोषींवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यास मदत होईल, असे फडणवीस म्हणाले.

### प्रत्येक पोलीस ठाण्यात एनडीपीएस युनिट

अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा बसावा, यासाठी मागील अधिवेशनात स्थापन केलेला टास्क फोर्स यावेळी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाला आहे. काही ठिकाणी एनडीपीएसचे युनिट जिल्हा स्तरावर कार्यरत होते. आता प्रत्येक पोलीस ठाण्यात एनडीपीएसचे युनिट स्थापन केले असून अधिकारी आणि अंमलदाराही त्यांना देण्यात आले आहेत.

### फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवणार

तस्करी विषयीचे गुन्ह्यांबाबत खटला चालविण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्यात यावी, अशी विनंती उच्च न्यायालयाला केली जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले. एका ठराविक लेव्हलच्या वरच्या गुन्ह्याचा केसेस चालविण्यासाठी तरी फास्ट ट्रॅक कोर्ट तयार व्हावेत, अशी विनंती उच्च न्यायालयात करू असे ते म्हणाले.

### मुक्ताईनगरमध्ये अफू, गांजा तस्करी

इतर राज्यातून देखील अमली पदार्थांची तस्करी होत आहे. मध्य प्रदेश, गुजरातमधून जळगाव मुक्ताईनगर येथे अफू आणि गांजाची तस्करी होत आहे. याकडे एकनाथ खडसे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. यावर फडणवीस यांनी सांगितले की आता अफू आणि गांजाची शेती कुठेही करता येत नाही. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश येथे भांगला परवानगी आहे. मात्र आपल्याकडे अफूला परवानगी नाही. मुक्ताईनगर आणि इतर ठिकाणी असे प्रकार होत असतील तर त्यावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

## शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर १४ जुलैला सुनावणी

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**



शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणी पुढील सुनावणी १४ जुलै रोजी घेणार आहे.

ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी या आठवड्यात अथवा पुढील आठवड्यात तत्काळ सूचिबद्ध करण्याची मागणी केली.

दरम्यान, खंडपीठाने आंशिक न्यायालयीन कामकाजाच्या दिवसांत ही याचिका सूचीबद्ध करण्यास सहमती दर्शवली नाही. तर एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी असे सादर केले की, ७ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने तत्काळ सुनावणीची विनंती फेटाळून लावली होती. त्यावर, ठाकरे गटाची बाजू मांडणारे वकील कामत म्हणाले की न्यायमूर्ती कांत यांच्या खंडपीठाने न्यायालयीन सुट्टीत हा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर खंडपीठाने १४ जुलै रोजी हे प्रकरण सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्याचे निश्चित केले. शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे गटाला देण्यात आले होते. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. त्यावर आता १४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

## पोलिसांबाबत सरकार ठोस पावले उचलणार का?- दानवे




"पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे कल्याण ही गृह विभागाची प्रमुख जबाबदारी आहे," असे ठाम प्रतिपादन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत केले. कर्तव्यावर असताना होणाऱ्या पोलिसांच्या मृत्यू प्रकरणावर उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली. राज्यातील पोलिसांच्या मृत्यूचे कारण आजारपण, आत्महत्या यांसारखे असल्याचे त्यांनी सांगितले. "अशा दुर्दैवी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी शासन सातत्याने उपाययोजना राबवत आहे," असे मंत्री कदम यांनी स्पष्ट केले.

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. आज, तिसऱ्या दिवशी सकाळी विरोधकांनी राज्यातील विविध प्रश्नांवरून राज्य सरकारच्या विरोधात आंदोलन केलंय. यानंतर विधानसभेतील सभागृहातही विरोधक शेतकरी प्रश्नावरून आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले, तर दुसरीकडे विधान परिषदेत समाजातील महत्त्वाचा घटक असलेल्या पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न, आरोग्य व्यवस्था आणि डीजी लोन आदी प्रश्नांबाबत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी आज विधान परिषदेतील सभागृहात आवाज उठवला.

मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्यांपैकी निम्म्याहून अधिक पोलीस मुंबईबाहेर वास्तव्यास आहेत. वसई, विरार, नवी मुंबई, पनवेलपासून कर्जत, कसाऱ्यापर्यंत पोलिसांचे वास्तव्य आहे. यामुळे दिवसातील किमान १६ ते १८ तास त्यांचे ड्युटी आणि प्रवासात जातात. पोलिसांच्या ड्युटीचा ८ तासांचा कालावधी असला तरीही किमान १२ तास त्यांना काम करावे लागते. तसेच पोलिसांचा प्रवासात वेळ जात असल्यामुळे योग आणि व्यायाम करण्यासाठी वेळ मिळत नाही. आकडेवारीनुसार, पोलिसांचे सर्वाधिक मृत्यू हे हृदयविकाराच्या झटक्याने होत असल्याची माहिती दानवे यांनी सभागृहात दिली.

पोलिसांच्या मूलभूत सुविधांकडे राज्य सरकारचं लक्ष नाही. पोलिसांच्या शासकीय घरांची दुरवस्था झाली असून, मागील अनेक वर्षांपासून त्यांना डीजी लोन मिळत नाही. आगामी काळात राज्य सरकार या सर्व विषयांवर धोरण आखणार आहे का? असा प्रश्न विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारला प्रश्न विचारत पोलिसांच्या प्रश्नांवर सभागृहाचं लक्ष वेधलं. त्यावर मुंबईत पोलिसांच्या मोडकळीस आलेल्या इमारतींचं नूतनीकरण होणार आहे. तसंच डीजी लोनचे प्रलंबित अर्ज निकाली काढू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिलं.

## आ. शेळकेंनी सरकारची हजारो कोटींची रॉयल्टी लुटली- ठाकरे गटाचा आरोप

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

शिवसेनेचे (ठाकरे) राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र पाठवलं आहे. या पत्राद्वारे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) आमदार सुनील शेळके यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. राऊत यांनी फडणवीसांकडे मागणी केली आहे की त्यांनी आमदार सुनील शेळके यांच्यावर कारवाई करून महाराष्ट्राची लुटमार थांबवावी. सुनील शेळके यांनी उत्खनन क्षेत्रातील हजारो कोटींची रॉयल्टी बुडवून सरकारची फसवणूक केल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. या आरोपांवर सुनील शेळके म्हणाले, "संजय राऊत यांनी यासंबंधीचे पुरावे दिले तर मी त्यावर खुलासा करेन."



संजय राऊत म्हणाले, "हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. सरकारला समर्थन देणारे पक्ष, त्या पक्षांचे आमदार-खासदार महाराष्ट्राची लुटमार करत आहेत आणि फडणवीसांचं त्याकडे लक्ष नाही. मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हजारो कोटी रुपयांची रॉयल्टी लुटली आहे. एमआयडीसीच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे खाण उद्योग सुरू करून त्यांनी सरकारची हजारो कोटी रुपयांची रॉयल्टी बुडवली आहे. त्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर तपशील पाठवला आहे. त्यासह पुरावे देखील जोडले आहेत. मी आतापर्यंत देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री व आमदारांची भ्रष्टाचाराची २१ प्रकरणं पुराव्यासहित पाठवली आहेत. मात्र फडणवीस यांनी आजपर्यंत त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही किंवा मी त्यावर कारवाई करेन असं सांगितलं देखील नाही. त्या पत्रांची दखलही घेतलेली नाही."

राऊतांच्या आरोपांर आमदार सुनील शेळके यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, "कोणत्याही प्रकारचे पुरावे नसताना संजय राऊत यांनी माझ्यावर आरोप केले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की तुमच्याकडे माहिती असेल, काही पुरावे असतील किंवा मला यासंबंधीच्या शासकीय नोटिसा आल्या असतील, माझी चौकशी चालू असेल तर त्याचे पुरावे सादर करावेत. जोवर ते पुरावे सादर करणार नाहीत तोवर मी कुठलीही प्रतिक्रिया देणार नाही. कुठलाही खुलासा करणार नाही."

## शेतकरी आत्महत्यांवरून विरोधक आक्रमक

### सरकारची चर्चेची तयारी-उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

शेतक-यांच्या प्रश्नावरून विरोधकांनी सलग दुस-या दिवशी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढच होत आहे. तीन महिन्यात राज्यात ७६७ शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. बैल नाही म्हणून शेतक-याला स्वत:ला जोताला जुंपून घ्यायची वेळ आली आहे. कर्जमाफी देउ म्हणून सत्तेत आलेले सरकार आता हे आश्वासन विसरले असल्याचे सांगत विरोधकांनी चर्चेची मागणी केली. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांनी याबाबतचा प्रस्ताव आणावा मी चर्चेला पूर्ण दिवस दयायला तयार असल्याचे सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये असे स्पष्ट केले. मात्र तात्काळ चर्चेची मागणी मान्य न झाल्याने विरोधी पक्षांनी सभात्याग केला.

काँग्रेसच्या विजय वडेटटीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून शेतक-यांच्या समस्यांचा विषय उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या.यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदती ही सरकार देत नाही. कृषिमंत्री शेतकऱ्यांना भिकारी म्हणतात, माजी मंत्री बबनराव लोणीकर शेतकऱ्यांविरोधात आक्षेपार्ह विधान करतात आणि त्यांचा अपमान करतात. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही.सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही ,कापसाला भाव मिळालेले नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला दीडपट भाव देऊ असे आश्वासन दिले होते. निवडणुकीआधी कर्जमाफी करू अशी घोषणा केली होती आता मात्र सरकार समितीला पुढे करत आहे. शेतकरी कर्जमाफीसाठी समिती नको अशी भूमिका विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली.

#### पूर्ण दिवस चर्चेसाठी देतो-नार्वेकर

शेतक-यांच्या आत्महत्या हा गंभीर विषय आहे. विरोधी पक्षांनी मला याबाबतचा रितसर प्रस्ताव दयावा मी या प्रश्नावर संपूर्ण दिवस चर्चा करायला देण्यास तयार असल्याचे विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले.

#### सरकार चर्चेसाठी तयार-उपमुख्यमंत्री पवार

शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचंच सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करीत विरोधी पक्ष सदस्यांना सभागृहात गोंधळ न घालण्याचे आवाहन केले.

विरोधी पक्ष सदस्यांनी सभागृहात गोंधळ घालू नये. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. सरकारकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत. सरकार चर्चेपासून पळ काढणार नाही, हे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेतंच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. विरोधी पक्षांना त्यांच्या गुरूवारच्या ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी आहे.

## दादा कोंडकेंसारखे उत्तर देताय?

### विधानसभेत सत्ताधाऱ्यांमध्येच जुंपली



**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस आहे. सभागृहात आज स्थगन प्रस्तावावर चर्चा पार पडली. त्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासावेळी माजी मंत्री तथा भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मतदारसंघातील नाला रुंदीकरणाच्या मुद्यावरून सरकारला प्रश्न विचारले. यावर जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिलेल्या उत्तरावर मुनंगटीवार यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांकडे नाराजी व्यक्त केली. यावर अध्यक्षांनी देखील मंत्री राठोड यांना अपेक्षित उत्तर देण्यास सांगितलं.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, "नाल्यांच्या योग्य नियोजनाअभावी नाल्यांशेजारी राहणाऱ्या वस्त्यांना फटका बसतो. नाल्यांची संरक्षक भिंत नियमांनुसार बांधली नाही, पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण झाला तर त्या अभियंत्यांवर कारवाई करणार का? तसेच जिथे जिथे असे नाले असतील त्यांच्या दुरुस्तीबद्दल सरकारचं नियोजन काय?" यावर उत्तर देताना मंत्री संजय राठोड म्हणाले, "आम्ही अशा नाल्यांचं सर्वेक्षण करू. नाल्यांची रुंदी तपासू, ती वाढवावी लागेल का ते पाहू. भूमीअभिलेख विभागाकरवी जिल्ह्याधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली चौकशी करू. उर्वरित नाल्याचं बांधकाम करण्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव पाठवू."

नैसर्गिक रुंदी कायम राहील का असा माझा प्रश्न होता त्यावर त्यांनी 'सजेशन फॉर ॲक्शन' एवढंच उत्तर दिलंय. हे ॲक्शन, ओन्ली ॲक्शन, नो रिॲक्शन असं असलं पाहिजे. मंत्र्यांकडून अपेक्षित आहे की नाल्याची नैसर्गिक रुंदी काय राहिली पाहिजे. त्यांच्याकडून हमी यायला हवी की नाल्याची नैसर्गिक रुंदी तशीच ठेवली जाईल. ती हमी न देता सजेशन फॉर ॲक्शन हे काय उत्तर आहे? हे तर द्वीअर्थी उत्तर झालं. हे काय दादा कोंडकेंचं उत्तर आहे? हे द्वीअर्थी आहे का? त्याऐवजी नाल्याची रुंदी निश्चित राहील याची हमी द्या."

## ३ कोटी २० लाख सरकारी निधी हडपण्याचा डाव उघड

### आमदार प्रसाद लाड यांचा खळबळजनक आरोप

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

भाजपाचेविधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी विधान परिषदेत धक्कादायक माहिती दिली आहे. लाड यांचं बनावट लेटरहेड वापरून काहींनी ३.२० कोटी सरकारी निधी लंपास केल्याचा आरोप आहे. अधिवेशन संपल्यानंतर ४.३० वाजता मला रत्नागिरी येथून अधिकाऱ्यांचा फोन आला. आपण मागणी केल्याप्रमाणे ३ कोटी २० लाख निधी बीड जिल्ह्याला वर्ग केला आहे. त्याबाबत तुमचा फोनही आला होता असे सांगण्यात आले. त्यानंतर मला संशय आला आणि ती पत्राची प्रत मागवली. त्यातले लेटरहेड बनावट होते. सही खोटी होती. मी फोनही केला नव्हता असा गंभीर आरोप आमदार प्रसाद लाड यांनी केला.

प्रसाद लाड म्हणाले की, मी चौकशी केली असता हा निधी कुणीतरी चोरायचा प्रयत्न केला आहे हे लक्षात आले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर ही बाब घातली. मुंबई पोलीस आयुक्तांशी बोललो. रात्री उशिरा याबाबत सायन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात ४ नावे माझ्याकडे आली तीदेखील पोलिसांना कळवली आहेत. याप्रकारे सरकारी निधी हडपण्याचा प्रकार समोर आला. हा निधी मोठा होता म्हणून लक्षात आले. परंतु छोटे छोटे निधी हडप करण्याचे प्रकार याआधीही झालेत असं त्यांनी सांगितले.

## एवढे प्रेम उतू जातेय तर, मातोश्रीचा एक भाग देतोस का? - नारायण राणेंचा उद्धव ठाकरेंना सवाल

**मुंबई, दि. २ प्रतिनिधी**

दोन भाऊ एकत्र येतात हा भाजपला प्रॉब्लेम आहे असं उद्धव ठाकरे म्हणतात. "दोन भाऊच कशाला, सगळे भाऊ घ्या. आम्हला फरक पडत नाही. भाजप आणि आघाडीचे तिन्ही पक्षांचे आज २३५ आमदार आहेत. एवढं प्रेम उतू जातय तर, मातोश्रीचा एक भाग देतोस का?" असे सवाल नारायण राणेंनी केला.

"काय भविष्य? भविष्य असतं तर हे वेगळे झाले असते का? सत्ताधारी पक्षाची संख्या २३५. आता यांना मराठी माणूस आठवला. त्यांच्यासाठी काय केलं. आज मराठी टक्का १८ टक्के फक्त. १९६० साली ६० टक्के होता. याचं कारण काय? मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी शिवसेना मग गेली कुठे?" असा सवाल नारायण राणे यांनी विचारला. "त्या अडीच वर्षात दोन दिवस मंत्रालयात आले. मुख्यमंत्रीपदाचं महत्त्व नाही. काय केलं महाराष्ट्रासाठी? मराठी माणसासाठी, तरुणासाठी, नोकरीसाठी. पोटापाण्याच्या प्रश्नासाठी. ज्या मराठी माणसाने शिवसेनेला आधार दिला, ताकद दिली. शिवसेनेने त्यांच्या नावावर उदरनिर्वाह चालवला. हेच लोक आता मराठी भाषेचा आंनदोत्सव साजरा करतायत. मराठी माणसासाठी, हिंदुत्वासाठी बोलण्याचा उद्धव ठाकरेंना अधिकार नाही" असं नारायण राणे म्हणाले.

# सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' उपक्रमात जनसहभाग महत्वाचा - 1 जुलै ते 31 जुलैदरम्यान विशेष मोहिम



**पनवेल |** पनवेल महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १ जुलै ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत "सफाई अपनाओ - बिमारी भगाओ" ही जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणे, संसर्गजन्य आजारांचे प्रतिबंध, आणि सार्वजनिक आरोग्य सुरक्षित राखणे या मोहिमेचा उद्देश आहे.

या मोहिमेंतर्गत उप आयुक्त श्री. वैभव विधाते यांच्या नेतृत्वाखाली सबंधित प्रभागातील मुख्य आरोग्य निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि सहाय्यक स्वच्छता समन्वयाने स्वच्छ हात उपक्रम, स्वच्छ घर उपक्रम, स्वच्छ परिसर उपक्रम , स्वच्छ शौचालये, स्वच्छ गटारे, नाले आणि तलाव, स्वच्छ सार्वजनिक जागा उपक्रम असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात आणि आजारांपासून बचाव करावा, असे आवाहन उप आयुक्त श्री. वैभव विधाते यांनी केले आहे.

भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार आणि २०२५ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार "सफाई अपनाओ, बिमारी भगाओ" हे विशेष स्वच्छता जनजागृती अभियान १ जुलै ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात नागरिकांच्या सहभागासह विशेष स्वच्छता मोहिमा, जनजागृती रॅली, प्रबोधनपर फलक लावणे, माहितीपर पोस्टर्स वाटप करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेंतर्गत पनवेल महापालिकेच्या A - खारघर, B - कळंबोली, C - कामोठे आणि D - पनवेल अशा चारही प्रभाग कार्यालयांच्या माध्यमातून प्रभागातील शाळांमध्ये 'स्वच्छ हात उपक्रम' अंतर्गत स्वच्छता आणि जेवणापूर्वी हात धुण्याच्या पद्धतींना प्रोत्साहन देणेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. 'स्वच्छ घर उपक्रम' अंतर्गत प्रभागातील मोठ्या सोसायट्यांमध्ये घरोघरी जाऊन कचरा वर्गीकरण, कचरा महापालिकेच्या घंटागाडीमध्ये देणे आणि स्वच्छता जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ परिसरउपक्रम' या उपक्रमांतर्गत प्रभागातील मोकळ्या जागा, प्रमुख रस्ते, प्रमुख चौक,मोकळी मैदाने, उद्याने, पालिकेच्या मोकळ्या जागा या ठिकाणी स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ शौचालय' उपक्रमांर्गत प्रभागातील स्वच्छ भारत अभियान अंतर्गत असलेले सार्वजनिक शौचालये आणि सामुदायिक शौचालये परिसर स्वच्छता, शौचलयात पाण्याची आणि हात धुण्यासाठी हँडवॉश, साबण व्यवस्था करण्यात येणार आहे. 'स्वच्छ गटारे, नाले आणि तलाव' उपक्रमांतर्गत प्रभागातील बंदिस्त गटारे, नाले आणि तलावांची सफाई मोहीम नागरीक, स्वयंसेवी संस्था आणि सफाई कर्मचारी यांच्या सहभागातून आयोजित करण्यात येणार आहे. 'स्वच्छ सार्वजनिक जागा' या उपक्रमांतर्गत कचऱ्याचे हॉट स्पॉट विशेषतः बाजारपेठा, फळे आणि भाजीपाला मंडई, फूड स्ट्रीट , नाल्यां जवळील कचरा व डेब्रीज , नाले आणि तलाव यामधील कचरा सफाई मोहीम राबविण्यात येणार आहे.

# काव्यगंगा पुस्तकाचे प्रकाशन सोहळा सपन्न



**मुरुड जंजिरा |** आगरी समाज ऊत्कर्ष मंडळ, मजगाव, मुंबई मंडळाचे अध्यक्ष कवी आनंदीनंदन अनंत धर्मा भोईर यांनी लिहिलेल्या "काव्य गंगा " या काव्य संग्रहाचा पुस्तक प्रकाशन सोहळा, वरद सभाग्रुह, दुसरा मजला, गणेश मंदिर डोंबिवली पूर्व येथे नुकताच संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगरी समाज विकास संघ, मुंबई मंडळाचे अध्यक्ष गजानन रामभाऊ पाटील होते आणि प्रमुख अतिथी म्हणून आदर्श अग्रसेन मासिकाचे संपादक, आगरी भाषेचे बादशहा चंद्रकांत नारायण पाटील ऊपस्थित होते. त्याच प्रमाणे साहित्यीक हृदयनाथ पाटील, कवी सुनील पाटील गुरुजी, कवी जयंत पाटील, कवी नमाई सूभाष नाईक, कवी संदेश भोईर, श्री हरी दळवी ऊपस्थित होते. प्रथमता कवी आनदीनंदन अनंत भोईर यांच्या पत्नी प्रिती अनंत भोईर आणि स्नुशा निलम अभिनय भोईर यांनी सर्व ऊपस्थित मान्यवराना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन आणि गणेश पुजनाने झाली. कुमारी निर्मयी सुखदा प्रियेश पवार हिने आपल्या सुमधुर आवाजात गणपती श्लोक आणि गणेश वंदन गीत सादर केले. कार्यक्रमास हजर असलेल्या सर्व मान्यवर आणि कवींनी स्वरचीत कविता सादर करून आपल्या स्वरचीत कवितेतून सर्वांना मंत्रमुग्ध केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, काव्य गंगा पुस्तकाचे प्रस्तावनाकार चंद्रकांत पाटील यानी आपल्या आगरी ढंगात पुस्तकाला आपण दिलेली प्रस्तावना सादर करून पुस्तकातील एकेका कवितेचा आशय ऊलगडून सांगितला.

विशेष म्हणजे सदर कार्यक्रमाला मनसे डोंबिवली शहर अध्यक्ष राहुल कामत कविवर्यावर असलेल्या लोभापायी ऊपस्थित राहीले होते. त्यांनी कविवर्य आनंदीनंदन अनंत भोईर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच आपल्या छोटेखाणी भाषणामध्ये मराठी भाषा आणि मराठी भाषेचा दर्जा आपण मराठी माणसानी उंचावला पाहिजे या बद्दल अभिप्रेत करून , कविवर्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सुधागड तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी शेतात उतरुन साजरा केला कृषी दिन



**सुधागड |** माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ताडगाव (ता. सुधागड-पाली) येथे कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी केवळ व्याख्यानापुरते न थांबता हरिश्चंद्र बाबुराव देशमुख यांच्या शेतात प्रत्यक्ष भात लागवडीचे प्रात्यक्षिक सादर करून कृषीदिन कृतीशील पद्धतीने साजरा केला.

कार्यक्रमाची सुरुवात मंडळ कृषी अधिकारी परळी सुखदेव कोळपे यांच्या प्रस्ताविकाने झाली. यानंतर मंडळ कृषी अधिकारी पाली उदय भोसले यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली.

उप कृषी अधिकारी कुंभारघर मारुती आढाव यांनी वसंतराव नाईक यांच्या हरितक्रांतीतील योगदानाचा आढावा घेतला. उप कृषी अधिकारी आतोणे दिनेश पांढरे यांनी रानभाजी महोत्सवात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या औषधी व पोषणमूल्यांविषयी माहिती दिली.

'कृतीतूनच प्रेरणा!'– हे तत्त्व समोर ठेवत दयावंती कदम यांनी हातात उखड घेऊन भात शेतात प्रत्यक्ष लागवड केली. त्यांच्या या कृतीने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये नवा विश्वास आणि उत्साह निर्माण झाला.

यावेळी वातावरण फाउंडेशनचे गणेश साखरे यांनी रानभाज्यांवरील सखोल माहिती दिली, तर सहाय्यक कृषी अधिकारी पेडली विवेक कापुरे यांनी रानभाज्यांच्या पाककृती व औषधी उपयोग विषद केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर आदिवासी शेतकऱ्यांना तालुका कृषी कार्यालयाच्यावतीने तुर बियाण्यांचे वाटप करण्यात आले. नंतर ग्रामपंचायत कार्यालयासमोर वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता सहाय्यक कृषी अधिकारी महागाव अनंत निरगुडा यांच्या आभारप्रदर्शनाने झाली.

या कार्यक्रमाला सरपंच करुणा साठे, माजी सरपंच छबु जाधव, पांडुरंग खताळ, ग्रामपंचायत सदस्य मंगेश देशमुख,प्राथमिक शिक्षिका प्रियंका बाबर, व कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहा परिषद शिक्षण मंडळाच्या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**रोहा |** रोहा येथील परम पूज्य पांडुरंग शास्त्री आठवले मराठी शाळा, अष्टमी क्र. ३ येथे रोहा परिषद शिक्षण मंडळाच्या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तक वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला केंद्र प्रमुख ईश्वर लाडे सर, अष्टमी गावचे माजी अध्यक्ष नितीन सदावर्ते,अष्टमी ग्रामस्थ मंडळाचे खजिनदार प्रसाद खुळे, दत्तात्रेय शेडगे,हरेश पिंपळे माजी मुख्याध्यापका देशमुख मॅडम शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.नम्रता पानसरे मॅडम व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री शिलधनकर,उपाध्यक्ष रविना कडू , विद्यार्थी आणि इतर मान्यवर मंडळी व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

हा उपक्रम रोहा परिषद शिक्षण मंडळाच्या अंतर्गत राबवण्यात आला. या कार्यक्रमामुळे शाळेतील अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून त्यांचे मनोबल वाढले आहे. शाळेकडून व



शिक्षण मंडळाकडून उपस्थित मान्यवरांचे विशेष आभार मानण्यात आले. समाजहिताचा व शिक्षणविकासाचा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.

**कार्यक्रमा प्रसंगी श्री प्रसाद खुळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की**

"समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लागणाऱ्या मूलभूत गोष्टींची उपलब्धता ही फार गरजेची आहे. शालेय जीवनातील लहान-सहान गोष्टी, जसं की गणवेश आणि वह्या, यांचाही विद्यार्थीच्या आत्मविश्वासावर मोठा परिणाम होतो. मला आनंद आहे की परम पूज्य पांडुरंग शास्त्री आठवले मराठी शाळेत या माध्यमातून मी काहीसा हातभार लावू शकलो. भविष्यातही असे उपक्रम राबवत राहण्याची माझी इच्छा आहे."

# माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी.

## कृषी दिनानिमित तालुक्यात हमी भाव केंद्र नसल्याची खंत.



**तळा |** तालुका कृषी अधिकारी तळा व पंचायत समिती तळा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महादेव शिंदे, प्रभारी तालुका कृषि अधिकारी श्री. तृपसौंदर्य, महिला बालकल्याण अधिकारी दिपाली शेळके, शेतकरी संघटना अध्यक्ष चंद्रकांत राऊत, सचिव कैलास पायगुडे, बळीराजा सेना अध्यक्ष भास्कर गोळे, शेतकरी विलास कदम, श्री. काप, पत्रकार पुरुषोत्तम मुळे, कृष्णा भोसले, माजी सरपंच गोविंद किर्तने आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात शेतकरी संघटनेचे सचिव कैलास पायगुडे म्हणाले की, तळा तालुक्यातील शेतकऱ्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे तालुक्यातील शेतकरी अंग मेहनत करून भात पीक घेत असतात परंतु तालुक्यात आजपर्यंत हमीभाव भात खरेदी केंद्र सुरू न केल्यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांना कमी भावाने धान्य विक्री करावे लागत आहे,त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. हमी भावाने खरेदी केंद्र असेल तर शेतकऱ्याच्या हाताला चांगला भाव मिळू शकणार आहे चांगला भाव मिळाल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वृद्धी होणार आहे. तळा तालुक्यात त्वरित हमी भावाने भात खरेदी केंद्र सुरू करा तरच कृषी दीन साजरा करण्याचा खरा आनंद शेतकरी साजरा करतील.चंद्रकांत राऊत यांनी कृषी खात्याच्या विविध योजना शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटना नेहमी प्रयत्नशील असते कृषी खात्याने आधुनिक शेती प्रशिक्षण देऊन शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न वाढीसाठी मार्गदर्शन करावे जेणेकरं येथील स्थलांतरास आळा बसेल असे सांगितले पत्रकार कृष्णा भोसले यांनी कृषी खात्याकडून निवड केलेले कृषी पर्यवेक्षक यांनी जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे कारण हे पद शेतकरी आणि कृषी खाते यातील महत्वाचा दुवा असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात शेतकरी बांधवांना तालुका कृषी अधिकारी यांनी कृषी विभागातील विविध योजना MREGS फळबाग लागवड, स्व गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजना, पिक विमा योजना, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, PMFME, भात लागवड पद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# चिंभावे. उर्दू शाळेत. एका शिक्षकाची. मदार. शिक्षक वाढवून देण्याची मागणी

**महाड |** महाड तालुक्यातील चिंबावे येथील रायगड जिल्हा परिषद उर्दू शाळेत सध्या एकच शिक्षिका कार्यरत असून शाळेवर आणखीन एक शिक्षक नेमण्यात यावा अशी मागणी चिंबावे ग्रामपंचायतीने महाड पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे केली आहे चिंबावे मला येथील उर्दू शाळेत इयत्ता पहिली पासून सातवी पर्यंतचे वर्ग आहेत या शाळेची पटसंख्या 16 आहे मात्र या सोळा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी एकच शिक्षिका कार्यरत आहे तीही नवीन आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे केंद्रप्रमुखांकडे वारंवार विनंती करूनही त्यांनी ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले याबाबत चिंबळमोला ग्रामपंचायतीने महाड पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांना पत्र पाठवून शाळेवर आणखीन एक शिक्षक नेमण्याची विनंती केली आहे केंद्रप्रमुख जुवले. यांनी वारंवार पत्र देऊनही त्यांनी त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले यापूर्वी शाळेत एकच विद्यार्थी असल्याने शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता मात्र आज रोजी शाळेत 16 विद्यार्थी असल्याने. या शाळेत एक शिक्षक नेमण्याची मागणी चिंभावे. मोहल्याचे. अध्यक्ष. मकबूल. चांदले यांनी केली आहे.

# डायलिसिस रुग्णांसाठी एस.टी. प्रवास मोफत सवलत मिळावी!

**श्रीवर्धन |** दुधर्ग डायलिसिस रुग्णांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटीने मोफत प्रवास करता यावा याकरिता पावसाळी अधिवेशनात शासनाने निर्णय घ्यावे अशी डायलिसिस रुग्णांकडून मागणी करण्यात येत आहे. या आजाराच्या रुग्णांना विविध वैद्यकीय सेवा आणि उपचार घेण्यासाठी नियमितपणे जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय तसेच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये जावे लागते. त्यासाठी त्यांना नेहमी तालुका किंवा जिल्ह्या मुंबई या ठिकाणी प्रवास करावा लागतो. परिणामी आजाराबरोबर दुर्धर रुग्णांचा प्रवासखर्च वाढतो. या पार्श्वभूमीवर पंचात्तर वर्ष वयोवृद्ध, महिला तसेच विद्यार्थी,



अपंगांना मोफत प्रवास दिला जातो तसे डायलिसिस रुग्णांना देखील एसटी महामंडळामार्फत मोफत बससेवा देण्याचा निर्णय पावसाळी अधिवेशनात सरकारकडून घेण्यात यावा.

डायलिसिस वर असलेल्या शेकडो रुग्णांना दर आठवड्याला दोन ते तीन वेळा डायलिसिससाठी जिल्हा किंवा इतर रुग्णालयात जावे लागते. आधीच मानसिक दृष्ट्या खचलेला आणि त्यात रुग्णांची आर्थिक स्थिती हलाखीची असते दरवेळी एसटीने या खाजगी वाहनाने प्रवास करताना त्यांना मोठा आर्थिक पिळवणूकिला सामोरे जावे लागत आहे.

ज्या प्रमाणे अपंग, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना एस.टी. मध्ये सवलत दिली जाते, त्याचप्रमाणे डायलिसिस रुग्णांनाही एसटी प्रवासात शंभर टक्के सवलत देण्यात यावी. अशी मागणी डायलिसिस रुग्णांकडून होत आहे.

# गेल प्रकल्पग्रस्तांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई

**अलिबाग |** गेल कंपनीच्या प्रशासनाविरोधात गेल्या आठ दिवसांपासून स्थानिकांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी आंदोलन कर्त्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई सूरू केली आहे. त्यांना नोटीसा देण्याचे काम सूरू झाले आहे. आतापर्यंत 24 जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. मात्र, कामावर जाणाऱ्या कामगारांची अडवणूक तसेच दमदाटी केल्यास त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करून त्यांना अटक केले जाईल, अशी माहिती समोर येत आहे.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील प्रकल्पाच्या उभारणीसाठी चारशेहून अधिक एकर जमीन शेतकऱ्यांकडून घेतली आहे. प्लास्टीकचे उत्पादन करणाऱ्या गेलच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाचे काम गेल्या दोन वर्षांपासून सूरू असून निम्म्याहून अधिक प्रकल्पाचे काम झाले आहे. 2026 पर्यंत हे काम पुर्ण करण्याचे शर्तीचे प्रयत्न सूरू आहेत. मात्र, कंपनी प्रशासनाने प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना प्राधान्याने नोकरी दिली पाहिजे. ही भुमिका घेत प्रकल्पग्रस्तांनी गेल्या आठ दिवसांपासून काम बंदचा लढा सूरू केला आहे. स्थानिकांसह परराज्यातील कामगारदेखील या बंदमध्ये सामील झाले होते. या काम बंद आंदोलनाचा कंपनीला कोट्यावधी रुपयांचा फटका बसला आहे. अखेर हे आंदोलन मोडीत काढण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात आली. कंपनीपासून पाचशे मीटर अंतरावर ठिकठिकाणी पोलीसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे. कंपनीच्या परिसरात विनाकारण फिरणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात आहे. पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तातून सोमवारपासून पराज्यातील



कामगार कंपनीत कामावर जाऊ लागले आहेत. त्यामुळे कंपनीतील काम पुन्हा सूरू झाले.

मात्र, स्थानिकांनी त्यांची भुमिका कायम ठेवली आहे. गेल कंपनीत कामाकरीता जाणाऱ्या कामगारांना, वाहन चालकांना कामावर जाण्यास परावृत्त करण्याच्या हेतूने दमदाटी सारखे असभ्य वर्तन करून सार्वजनिक ठिकाणची शांतता भंग करून त्यांना कामावर जाण्यास अडवणूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांमार्फत प्रतिबंधात्मक कारवाई सूरू केली आहे. आतापर्यंत 24 जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केल्याची माहिती रेवदंडा पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# डॉक्टर्स डे निमित्ताने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र 6 कामोठे येथे वृक्षारोपण

**पनवेल |** डॉक्टर्स डे निमित्त पनवेल महानगरपालिका आणि मुंबई ऑनकोकेअर सेंटर (MOC) नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक 1 जुलै रोजी कम्युनिटी सेंटर, कामोठे येथे विशेष कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये उपस्थित सर्व डॉक्टरांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पनवेल महानगरपालिका माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी वैद्यकीय आरोग्य विभाग प्रमुख डॉ. आनंद गोसावी, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, कुष्ठरोग अधिकारी डॉ. वैभवी निंबाळकर, वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक ६, १४ व १५, तसेच कामोठे प्रभागातील महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध तपासण्या मोफत करण्यात आल्या. यामध्ये सर्व कर्मचाऱ्यांची ओरल कॅन्सर (तोंडाचा कर्करोग) तपासणी, ३० वर्षांवरील महिलांची सर्व्हिकल कॅन्सर करिताची पॅप सिअर( Pap Smear) तपासणी व ४० वर्षांवरील महिलांची स्तनाच्या कर्करोगासाठी मॅमोग्राफी तपासणी यांचा समावेश होता.

# प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन हा स्वागतार्ह निर्णय - संजय म्हात्रे

**पेण |** आषाढी एकादशी निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. हा निर्णय अतिशय स्वागतार्ह असल्याचे प्रतिपादन शिवसेना युवा सेना जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे यांनी केले. परिवहन मंत्री मंत्री सरनाईक गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत होते. एसटी कर्मचारी हे ऊन,वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाचे हाल होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने प्रताप सरनाईक यांनी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करण्याची घोषणा केली आहे.या निमित्ताने माणसातील " विठुराया" ची सेवा करण्याची संधी त्यांना मिळत आहे. असे देखील संजय म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.


# प्रसाद चिकित्सा संस्थेमार्फत 'कृषी दिन' उत्साहात साजरा

**पनवेल |** प्रसाद चिकित्सा या संस्थेमार्फत आज 'कृषी दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय कृषी परंपरेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या योगदानाला आदरांजली वाहण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता संस्थेच्या गोराड फार्म येथे झाला. याप्रसंगी कृषी तज्ञ श्री. गौतम पाटीलहे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

आपल्या भाषणात गौतम पाटील यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे असलेले अनमोल स्थान आणि शेतकऱ्यांनी देशाच्या विकासात दिलेल्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीचे महत्त्व,वाडी लागवड ,संगोपन आणि शेतकऱ्यांनी सध्याच्या परिस्थितीत सामोऱ्या जाणाऱ्या आव्हानांवरही प्रकाश टाकला.

यावेळी संस्थेचे कार्यकारी व्यवस्थापक मिलिंद नरगुंद यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यांनी संस्थेचा कृषी क्षेत्राशी असलेला संबंध आणि शेतकऱ्यांमध्ये कृषी ज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी संस्थेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमादरम्यान, शेतकऱ्यांनी



कृषी क्षेत्राशी संबंधित विविध त्यांना येणाऱ्या प्रश्नांची चर्चा केली. यातून त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कृषी आधारित उद्योगांचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.

यावेळी संस्थेमार्फत शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे फळ रोपे वाटप करण्यात आले. परिसरातील शेतकरी यांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमाच्या शेवटी धनश्री घरत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वीज कोसळून शेतकऱ्यांचा मृत्यू

## मदत फक्त 4 लाखच, वडेट्टीवारांची 10 लाखांची मागणी – सरकारचा पुनर्विचाराचा संकेत

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी आणि शेतमजुरांना आता वीज कोसळून मृत्यू झाल्यास १० लाखांची मदत मिळावी, अशी जोरदार मागणी काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.

तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना वडेट्टीवार म्हणाले, “वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास २५ लाखांची मदत दिली जाते. मात्र वीज कोसळल्याने मृत्यू झाल्यास केवळ ४ लाख दिले जातात. वीज पडल्याने कुटुंब उघड्यावर पडते. ही मदत अत्यंत अपुरी असून, ती वाढवली पाहिजे.”



**सरकारकडून सकारात्मक संकेत**

या मागणीला उत्तर देताना आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, पूर्वी राज्य आपत्ती व्यवस्थापन योजनेत वीज पडून मृत्यूंचा समावेश नव्हता, मात्र आता तो करण्यात आला आहे. मदत वाढवण्याबाबत मुख्यमंत्री आणि सरकार पातळीवर चर्चा करून निर्णय घेऊ, असे आश्वासन महाजन यांनी दिले.

**वाढत्या मृत्यूची गंभीर आकडेवारी**

राज्यात २०२२ मध्ये वीज कोसळून तब्बल २३६ मृत्यू, तर २०२३ मध्ये १८१ मृत्यू झाल्याचे आकडे सरकारने जाहीर केले.

वडेट्टीवार यांच्या मागणीनंतर वीज कोसळून मृत्यू झालेल्या कुटुंबांना दिलासा मिळणार का, मदत दुप्पट होणार का, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

# महाविकास आघाडीत फूट?

## उद्धव-राज एकत्र येणार, काँग्रेसला वेगळा मार्ग धरावा लागणार ?

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या भूकंपाची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेसला स्वबळावर लढावे लागू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी याबाबत महत्त्वाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडणार का? हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

**काँग्रेसची बैठक आणि नाराजी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांची सोमवारी दिल्लीत बैठक झाली. मात्र या पूर्वनियोजित बैठकीला राहुल गांधी,




पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे किंवा सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांची अनुपस्थिती जाणवली. बैठक काँग्रेसच्या जुन्या मुख्यालयात २४ अकबर रोडवर झाली.

यात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, वर्षा गायकवाड, यशोमती ठाकूर, भाई जगताप, नाना पटोले, सतेज पाटील, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, मुकुल वासनिक, अविनाश पांडे, रजनी पाटील यांसह अनेक नेते उपस्थित होते.

बैठकीत स्थानिक निवडणुका, संघटनात्मक मुद्दे आणि संभाव्य आघाड्यांवर चर्चा झाली. मात्र पक्षश्रेष्ठी अनुपस्थित राहिल्याने नाराजीचा सूर उमटला. एका नेत्याने, “जर प्रभारी आणि प्रदेशाध्यक्षच बैठक घेणार असतील, तर ती मुंबईतही होऊ शकली असती,” असा सवाल केला. "बैठक कशासाठी बोलावली हेच कळलं नाही," अशी तिखट प्रतिक्रिया अन्य नेत्याने दिली.

**काँग्रेसचा राज ठाकरेंना विरोध**

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी राज ठाकरे यांच्या भूमिकेला काँग्रेसचा विरोध असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी म्हटले, “राज ठाकरे यांची उत्तर भारत आणि दक्षिण भारताबाबतची भूमिका आम्हाला मान्य नाही. भारत एक आहे.”

या विधानामुळे, महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळाची भूमिका घेणार का? हा प्रश्न उभा राहिला आहे. तसेच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्यास, महाविकास आघाडीत फूट पडणार की राजकीय समीकरणे पुन्हा बदलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ऑनलाइन अन्न वितरणात फसवणूक आणि आरोग्याला धोका?

## आमदार संदीप जोशी यांनी सभागृहाचे लक्ष वेधले

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेचे सदस्य आमदार संदीप जोशी यांनी ऑनलाईन ॲप्सद्वारे ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नपदार्थांमधून होणारी फसवणूक, निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ आणि तपासणी यंत्रणेच्या अभावावर प्रश्न उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधले. यावर अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी समाधानकारक उत्तर देत लवकरच तपासणीसाठी विशेष मोहीम हातात घेणार असल्याचे आश्वासन दिले.

स्विगी, झोमॅटो, ब्लिंकीट यांसारख्या ॲप्समार्फत नागरिकांना अन्नपदार्थ पोहोचवले जातात.मात्र अनेक प्रकरणांमध्ये चुकीचे वजन, खराब माल, किंवा ऑर्डरमधील वस्तूंपेक्षा वेगळ्या वस्तू ग्राहकांना दिल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा तक्रारींची संख्याही वाढतच आहे. ग्राहकांची दिशाभूल, त्यांचे नुकसान आणि आरोग्याच्या दृष्टीने उद्भवणारे धोके याकडे दुर्लक्ष होत असून, त्यावर कोणतीही कार्यक्षम सरकारी यंत्रणा कार्यरत नाही, अशी टीका आ.जोशी यांनी यावेळी केली. त्यामुळे ऑनलाईन डिलिव्हरी ॲप्सवरून दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासण्यासाठी सरकारकडे कोणती यंत्रणा आहे, अशा खाद्यपदार्थांचे नमुने तपासले जातात का आणि ग्राहकांकडून तक्रारी नोंदविण्याची प्रक्रिया कार्यरत आहे का तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तपासणीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध आहे का? नसल्यास, त्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, असे तीन प्रश्न उपस्थित केले.

या प्रश्नांना उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले की, अशा ॲप्सवरील अन्नपदार्थांवर अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) कायद्यानुसार नियंत्रण ठेवले जाते. हे ॲप्स स्वतः अन्न विक्रेते नसून वितरक म्हणून कार्यरत असतात, तरीही त्यांच्या माध्यमातून होणाऱ्या अन्नवितरणाची जबाबदारी संबंधित नोंदणीकृत विक्रेत्यांवर असते. त्यांचे परवाने, अन्न तपासणी व नियंत्रण ही जबाबदारी राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाची असते.

झिरवळ यांनी मान्य केले की अलिकडे या संदर्भातील तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभाग ॲप्सवरील नोंदणीकृत विक्रेत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी कठोर कारवाई करेल. त्यांनी हेही स्पष्ट केले की, ग्राहकांनी अन्नाच्या गुणवत्तेविषयी तक्रार नोंदवण्यासाठी एफएसएसआय (FSSAI) किंवा एफडीए (FDA) च्या अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्मद्वारे तक्रार करावी. तक्रार नोंदविल्यानंतर तपासणी करून दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल.

मनुष्यबळाच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी कबूल केले की, अन्न तपासणीसाठी राज्यात आवश्यक त्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाहीत. मात्र,सध्या १८९जणांची नवीन भरती प्रक्रिया झाली असून त्यांचे प्रशिक्षण सुरू होईल, असेही त्यांनी आश्वस्त केले. प्रयोगशाळेची संख्या वाढविण्याचे धोरणही अंगिकारले असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच,ऑनलाईन ॲप्सद्वारे वितरित होणाऱ्या अन्नपदार्थांवर अधिक प्रभावी तपासणी करता यावी यासाठी राज्यभर विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. ४३ ई-कॉमर्स आस्थापनांच्या तपासणी आतापर्यंत झाल्या आहेत. त्यातील दोन आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर पाच व्यावसायिकांना बंदची नोटीस देण्यात आली आहे.अशाप्रकारे निर्बंध आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहितीही झिरवळ यांनी दिली.

या चर्चेमुळे ऑनलाइन अन्न वितरण व्यवस्था आणि ग्राहकांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा मुद्दा विधान परिषदेच्या सभागृहात गंभीरपणे चर्चेला आला.यावेळी उपस्थित केलेले मुद्दे केवळ ग्राहकहिताचे असून, आरोग्यविषयक धोके आणि नियमनशून्यता याबाबत सरकारचे लक्ष वेधणारे ठरलेले आहेत. मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिलेले उत्तर अनेक उपाययोजनांची दिशा दाखवणारे असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि कारवाईवरच या प्रश्नांची खरी परीक्षा होणार आहे.

# ठाण्याच्या हॉस्पिटलवर प्रशासनाची गुरु'कृपा'

## विरोधक आक्रमक; सरकारकडून अखेर कारवाईचा इशारा

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजनेच्या माध्यमातून परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांना ठाण्याच्या गुरूकृपा हॉस्पिटलचे आरोग्य तपासणी सर्टीफिकेट घेण्याची सक्ती केली आहे. गाव खेड्यातून कर्मचाऱ्यांना पदरमोड करून ठाणे शहरात यावे लागते. आरोग्याच्या सर्टीफिकेटसाठी धोरण असताना, ठाण्यातीलच हॉस्पिटल सरकारची गुरू'कृपा' कशासाठी असा सवाल विरोधकांनी विधान परिषदेत विचारला. तसेच महामंडळाच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवत त्यांनी सरकारला धारेवर धरले. दरम्यान कोणत्याही एकाच डॉक्टरच्या सर्टीफिकेटची सक्ती खपवून घेतली जाणार नाही. परिवहन खात्याकडून असे आदेश दिले असतील तर त्याची चौकशी करून संबंधितांवर कठोर दोषींवर कारवाई केली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिषदेत केली.

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजनेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा तारांकित प्रश्न अनिल परब यांनी परिषदेत मांडला. एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना सुरू आहे. राज्यात आरोग्य विभागाचे धोरण मंजूर केले आहे. त्यानुसार ११ चाचण्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून केल्या जातात. ४० ते ५० वयोगटातील कर्मचाऱ्यांना वर्षातून एकदा तर ५० ते ५८ वयोगटातील कर्मचाऱ्यांची वर्षातून दोनदा चाचणी केली जाते. अतिशय योग्य पद्धतीने योजनेची अमंलबजावणी सुरू आहे. ठाण्यातील गुरूकृपा रुग्णालयातील डॉ. किरण पंडित यांना २ कोटी ६५ लाख रुपयांचे बील दिले आहे. एकाच डॉक्टरकडून तपासणी केली जात नाही, असे स्पष्ट केले. विरोधकांनी यावर जोरदार हरकत घेतली. कायद्यात बदल करून परिवहन महामंडळ पंडीत नावाच्या डॉक्टरपुढे पायघड्या का घालत आहे, असा सवाल अनिल परब यांनी विचारला. तर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी परिवहन विभागाची १० हजार कोटींची बीले प्रलंबित असताना, ठाण्यातील किरण पंडीत या डॉक्टरच्या सर्टीफिकेटची सक्ती कशासाठी, नांदेड, सांगली, रत्नागिरी आदी भागात विशेष युनीट स्थापन केल्याची बाब निदर्शनास आणून दिली. भाई जगताप, प्रवीण दरेकर यांनी देखील परिवहन विभागातील समस्यांचा पाढा वाचला. परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्पष्टीकरण दिले.

परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकाच डॉक्टरच्या सर्टीफिकेटसाठी दबाव टाकू नये. असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. तरीही असा प्रकार घडला असेल तर चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करू, अशी ग्वाही सरनाईक यांनी परिषदेत दिली.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या आरोग्य चाचण्या विशिष्ट ठिकाणी करण्याची सक्ती नाही - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस. टी.) कर्मचाऱ्यांच्या आरोग्य चाचण्या करण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना सुरू आहे. या योजनेत गुरुकृपा हॉस्पिटल अथवा अन्य कोणत्याही विशिष्ट हॉस्पिटल अथवा संस्थेमार्फत वैद्यकीय तपासण्या करण्यासाठी सक्ती करण्यात आलेली नाही. कुणी असा दबाव आणत असल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल आणि त्यात कुणी दोषी आढळल्यास त्यावर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत सांगितले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या अनुषंगाने प्रश्न विचारला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री भाई जगताप, प्रवीण दरेकर, ॲड. अनिल परब आदींनी सहभाग घेतला.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, राज्यात ९० हजार हजार एसटी कर्मचारी असून त्यांच्या पगारासाठी वेगळी वेतनश्रेणी आहे. त्यांच्यासाठी महामंडळाने धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना जाहीर केली आहे. या माध्यमातून ४० वर्षावरील कर्मचाऱ्यांना दोन वर्षातून एकदा आणि ५० वर्षांवरील कर्मचाऱ्यांना वर्षातून एकदा आरोग्याच्या ११ तपासण्या करण्यासाठी तीन हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या चाचण्या ठराविक ठिकाणीच करण्यात याव्यात अशी सक्ती करण्यात आली नसून या योजनेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# अपयशाची निराशा आणि यशाचा आनंद असे दोन्ही शिकवणारा हा अध्यक्षपदाचा प्रवास

## मावळते भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भावनिक साद

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

पक्षाचे सर्व नेते,लोकप्रतिनिधी,पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानत माझ्या प्रदेशाध्यक्ष पदाचा कार्यकाळ हा अपयशाची निराशा आणि यशाचा आनंद असे दोन्ही शिकवणारा असा प्रवास होता, अशा शब्दांत बुधवारी भाजपचे मावळते प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या समाज माध्यमावर आभार मानले.

यावेळी त्यांनी कविवर्य ना.धो.महानोरां च्या ओळीही उद्गत केल्या."कोणती पुण्ये अशी येती फळाला

जोंधळ्याला चांदणे लगडून जावे !!

अशीच काहीशी भावनिक अवस्था माझी झाल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

साधारण ३५ वर्षांपूर्वी कसलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना माझ्या सारख्याच सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मी माझ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली.भाजपचा सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी भिंती रंगवणे,पत्रके वाटणे, गावोगाव कधी सायकलवर, कधी मोटरसायकलवर, तर पायीच प्रवास करणे इथपासून सुरू झालेला माझा प्रवास भाजपच्या प्रदेशाध्यक्ष पदापर्यंत येऊन पोहोचला.हे माझ्यासाठीच अविश्वसनीय असून खरोखरच मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, कधीतरी भाजपचा राज्याचा अध्यक्ष म्हणून आपण काम करू.त्यामुळे सामान्यमधल्या असामान्य शक्तींना जागृत करणे हीच तर आपल्या पक्षाची किमया असल्याचेही बावनकुळे यांनी नमूद केले.

१२ ऑगस्ट २०२२ रोजी जेव्हा मी पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा आनंद तर होताच पण त्याहून अधिक जबाबदारीचे दडपण होते.कारण अनेक पिढ्यांनी,अतिशय कष्टाने,रक्ताचे पाणी करून राज्यात हा पक्ष उभा केला,वाढवला आणि त्यातून माझ्यासारखे कित्येक कार्यकर्ते घडले. त्यात उत्तमराव पाटील, ना.स.फरांदे, गोपीनाथराव मुंडे, नितीन गडकरी, भाऊसाहेब फुंडकर, देवेंद्र



फडणवीस, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्यासारख्या अनेक मान्यवरांनी जे पद भूषविले, त्या पदाची जबाबदारी स्वीकारणे हे माझ्यासाठी शिवधनुष्य होते.तरीही ते शिवधनुष्य समर्थपणे पेलण्याचा मी माझ्या परीने व आपल्या साथीने प्रामाणिक प्रयत्न केल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात मी महाराष्ट्रभर अनेकवेळा प्रवास केला. महाराष्ट्रातील प्रत्येक कानाकोपऱ्यात, चांद्यापासून बांद्यापर्यंत, तळागाळापर्यंत व्यक्तिशः पोहचण्याचा प्रयत्न केला. बूथवरचे सामान्य कार्यकर्ते ते राज्यातील नेते अशा सर्वांमध्ये योग्य समन्वय ठेऊन पक्षाचा विस्तार कसा होईल यासाठी प्रयत्न केले. आपण, महाराष्ट्रामध्ये संघटनपर्व यशस्वीपणे राबवत दीड कोटी सदस्यसंख्या असलेला भाजप राज्यातील सर्वात जास्त सदस्यसंख्या असलेला पक्ष बनवला ही माझ्यासाठी अतिशय अभिमानास्पद बाब असल्याचेही बावनकुळे यांनी नमूद केले.

माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दोन मोठ्या निवडणुका झाल्या. त्यातील लोकसभा निवडणुकीत आपल्याला अपेक्षित यश आले नाही. त्यादिवसापुरती माझ्याही मनात निराशा होती. परंतु,पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी.नड्डा, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आपण विचारमंथन केले, झालेल्या चुकांमधून शिकलो, मरगळ झटकून मेहनत केली आणि विधानसभा निवडणुकीत वाजत गाजत विजयश्री खेचून आणली. व त्यामुळेच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात भाजपा- महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आले. या यशाचे संपूर्ण श्रेय कार्यकर्ते म्हणून केवळ आपल्यालाच असल्याचेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

मी स्वतःला खरं भाग्यवान समजतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखे व्यक्तिमत्व देशाचे नेतृत्व करत असताना मला ही जबाबदारी मिळाली.मोदींच्या विकसित भारताच्या भाजपचा प्रदेशाध्यक्ष म्हणून मला योगदान देण्याची संधी मिळाली व आता राज्याचा महसूल मंत्री म्हणून ही संधी मला मिळत आहे याचा मला सर्वाधिक आनंद मिळाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भूपेंद्र यादव जी, बी. एल.संतोष जी, शिवप्रकाश या सर्व मान्यवरांनी माझ्यावर विश्वास दाखवला यासाठी मी त्यांचा ऋणी आहे.त्यामुळे मला आशा आहे की, या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीतून मी त्यांचा विश्वास सार्थ ठरवला असेल,असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला.

या संपूर्ण प्रवासात पक्षाच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी व आपण सर्व कार्यकर्त्यांनी मला खंबीर साथ दिली, त्यामुळे मी हे शिवधनुष्य पेलू शकलो. या प्रवासात राज्यातील मायबाप जनतेने देखील राज्यातील प्रत्येक ठिकाणी अतिशय आपुलकीने स्वागत केले,प्रेम केले,साथ दिली.आपले हे प्रेम व साथ कायम राहील, याची मला खात्री असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

"राष्ट्र प्रथम,मग पक्ष आणि मग स्वतः" हे ब्रीद उराशी बाळगून मी भाजपचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मागील तीन दशकांपासून काम करतो आहे. मी विश्वास देतो की, आई जगदंबेच्या आशीर्वादाने माझ्या जीवात जीव असेपर्यंत याच प्रामाणिकतेने काम करत राहीन असे सांगत,आपल्या सहकार्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार......! आणि अध्यक्ष म्हणून काम करीत असताना अनवधानाने माझ्याकडून काही चुका झाल्या असतील, कुणाला रागावलो असेल तर मी आपणा सर्वांची मनापासून माफी मागतो.आपला लोभ असाच कायम असावा,ही विनंती,असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

# पंढरीच्या वारीत अर्बन नक्षलवादी शिरले - आ. मनीषा कायंदे

मुंबई, दि. २ : प्रतिनिधी

जगभरात ज्याला प्रसिद्धी मिळते अशी ऐतिहासिक पंढरपूरची वारी आहे. या वारीसाठी लाखो वारकरी पंढरीला रवाना झाले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पंढरपूरकडे रवाना झाल्या आहेत, सर्वसामान्य कार्यकर्ते भाविक वारीत जात असतात. मात्र, असं असताना एक नवीनच प्रकार समोर आला आहे, काही अर्बन नक्षलवादी वारीत शिरले आहेत, ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले आहेत, असे शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी म्हलं आहे. विशेष म्हणजे यावेळी सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. आता, आमदार कायंदे यांच्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. देवाला धर्माला ही लोकं मानत नाही, हा त्यांचा अधिकार आहे. हिंदू धर्म आणि वारीबद्दल अपप्रचार करत आहेत, लोकांचा बुद्धीभेद करत आहेत. पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेतस, पथनाट्य करतात, असे शो करतात. एक दिवस तरी वारी अनुभवा, हा माणूस कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. सासवड येथे ही लोकं पोहोचतात आणि त्यांच्या वारीचा रुट देखील आहे. क्युआर कोड त्यांनी दिलाय जो ब्लॅकलिस्टेड आहे, असं दिसतंय. पंढरपूरच्या वारीचा ही लोकं गैरफायदा घेत आहेत, अशी माहिती मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

वारीत अनेक महिला वारकरी आपण पाहातो, तुळशीचं रोप घेऊन काही महिला चालतात. इतर कोणत्या गोष्टींचा प्रचार प्रसार करायचा असेल तर त्यांचा उपयोग करू शकता. काही वारकरी संघटना मुख्यमंत्र्यांना भेटल्या आणि आम्ही देखील सांगितलं ही या गोष्टीला आळा घाला. सन २०१०, २०११ पासून ह्या लोकांवर गुन्हे नोंद आहेत. जामिनावर असलेले लोकं देखील यात आहेत, अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली हे सर्व सुरू आहे, असा आरोप करत कायंदे यांनी अंनिसकडे बोट दाखवले आहे. वारीला बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय, मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. महिला संविधानाचे पुस्तक घेऊन चालतात, संविधानाच्या नावाखाली फेक नॅरेटिव्ह पसरवणारी ही लोकं तेच तर नाहीत ना, असा सवालही कायंदे यांनी विचारला आहे.

दरम्यान, वारीसंदर्भात आमदार मनीषा कायंदे यांनी केलेल्या वक्तव्यावर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा लोकांकडे काही लक्ष देऊ नका, हे कधीही पक्ष बदलतात, सोडून द्या, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी मनीषा कायंदे यांच्या वक्तव्याला अधिक महत्त्व देण्याची गरज नसल्याचे म्हटले. तसेच, महाराष्ट्रात 700 हून जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, अशी माहिती आदित्य यांनी दिली. तर, संविधान हत्या दिन कोणी साजरा केला? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**"ड" - निविदा सूचना क्रमांक ०७**

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी अनुभवी कंत्राटदार ठेकेदार यांचेकडून खालील कामाकरीता "ह- नमुन्यातील" निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, यांचे कार्यालयातून दिनांक ०४.०७.२०२५ ते ११.०७.२०२५ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई, भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १४.०७.२०२५ पूर्वी त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | CR to Vistarit amdar niwas, Mumbai - Supplying cleaning, plastic materials & Bed sheet, mattresses Pillow at vistarit amdar niwas, Mumbai. (MM-331242) | रु.८३९८०४.०० | रु.८५००.०० | १ महिना | "ड" | ५९०/- |
| २ | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft height, PVC chairs, Dunlop sofa, folding table of size 4'x2', wash hand basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and canopy for Govt. bunglow Sagar under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN-33192) | रु.८४२१५९.०० | रु.८५००,०० | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ३ | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft height, PVC chairs, Dunlop sofa, folding table of size 4'x2', wash hand basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and canopy for Govt. bldg. Rocky Hill 1&2 under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN-33193) | रु.८३७३००.०० | रु.८५००,०० | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ४ | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft height, PVC chairs, Dunlop sofa, folding table of size 4'x2', wash hand basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and canopy for Govt. bunglow Ramtek under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN-33196) | रु.८३८२३९.०० | रु.८५००,०० | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ५ | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft height, PVC chairs, Dunlop sofa, folding table of size 4'x2', wash hand basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and canopy for Govt. bunglow Shivgiri under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN-33190) | रु.८४२११५.०० | रु.८५००,०० | १ महिना | "ड" | ५९०/- |
| ६ | Providing and erection of waterproof mandap roof upto 15ft height, PVC chairs, Dunlop sofa, folding table of size 4'x2', wash hand basin, VIP chair, white partition, wooden stage, round table and canopy for Govt. bunglow Deogiri under N.D. road section at N.D. road, Mumbai. (WN-33197) | रु.८४२६३८.०० | रु.८५००.०० | १ महिना | "ड" | ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

**जा.क्र. काअ/इशवि/भांडार/डी-निविदा / ७१५४**
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,
इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला,
२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र. २२०१६९७५/२२०१६९७३,
ई-मेल - presidency.ee@mahapwd.com **दिनांक :- ३०/०६/२०२५**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१४७५**

**सही/-**
**(वि.अ.पाटसकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, मुंबई.**

# प्लास्टिक प्रदूषणामुळे समस्त जीवसृष्टीवर संकट

(आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन विशेष ३ जुलै २०२५)

जगात करण्यात आलेले सर्व शोध मानवजातीच्या विकासासाठी केले गेले, पण मानवाने आपल्या गरजांच्या मर्यादा तोडल्या आणि आपल्या स्वार्थ, लालसेप्रमाणे वागू लागले, परिणामी स्वतःसाठी तसेच संपूर्ण जगासाठी विनाशाचा रणशिंग फुंकला. असेच प्लास्टिक प्रदूषण आज आपल्या पृथ्वीसाठी एक मोठी समस्या बनले आहे. जमीन असो, आकाश, पाणी किंवा हवा असो, संपूर्ण वातावरणात प्लास्टिक प्रदूषणाने जीवनाला धोका निर्माण केला आहे आणि हा धोका वेगाने प्राणघातक पातळीवर वाढत आहे, तरीही लोक हे समजून घेण्यास तयार नाहीत. आपण अनेकदा पाहतो की विशिष्ट प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिक साहित्यांवर बंदी असूनही, त्यांचा वापर बेकायदेशीरपणे केला जात आहे. प्लास्टिक प्रदूषण जीवनचक्र विस्कळीत करून फार नुकसान करत आहे. या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यासाठी, दरवर्षी ३ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन साजरा केला जातो.

---------------

या वर्षी २०२५ ची थीम एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करा आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन द्यार आहे. ही थीम डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्यांची समस्या संपवण्याच्या गरजेवर भर देते आणि पुन्हा वापरता येण्याजोग्या पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते. प्लास्टिक प्रदूषणाच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि प्लास्टिकमुक्त भविष्यासाठी कृती करण्यास प्रेरणा देणे हे देखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, दरवर्षी ४६० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त प्लास्टिकचे उत्पादन होते. बांधकामापासून वाहनांपर्यंत, इलेक्ट्रॉनिक्स ते शेतीपर्यंत, जवळजवळ सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये आणि सर्व ग्राहकांद्वारे प्लास्टिकचा वापर केला जातो. २०१९ मध्ये पर्यावरणातील एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्यापैकी ८८ टक्के, किंवा अंदाजे २० दशलक्ष मेट्रिक टन, मॅक्रोप्लास्टिक्स होते, जे सर्व परिसंस्थांना प्रदूषित करतात.

जगातील बहुतेक प्लास्टिक प्रदूषण हे बाटल्या, टोप्या, शॉपिंग बॅग, कप, स्ट्रॉ यासारख्या एकदा वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमधून होते. दररोज २००० ट्रक प्लास्टिक कचरा जगातील महासागर, नद्या आणि तलावांमध्ये टाकला जातो. यूएनईपी २०२५ नुसार, आतापर्यंत उत्पादित झालेल्या प्लास्टिकपैकी फक्त ९ टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजे रिसायकल करण्यात आला आहे.

ईएमएफ २०१६ नुसार, २०५० पर्यंत समुद्रात माशांपेक्षा जास्त प्लास्टिक असू शकते. यूके सरकारच्या २०१८ च्या अहवालानुसार, सागरी प्लास्टिक प्रदूषणामुळे दरवर्षी १,००,००० हून अधिक सागरी सस्तन प्राणी आणि दहा लाख समुद्री पक्षी मृत्युमुखी पडतात. सर्व समुद्री कचऱ्यापैकी ८० टक्के हे प्लास्टिक आहे. प्लास्टिक हा एक न विघटनशील कचरा आहे जो हजार वर्षांपर्यंत टिकू शकतो.

१९५० पासून जगभरात ९.२ अब्ज टनांपेक्षा जास्त प्लास्टिक तयार झाले आहे, त्यापैकी सुमारे ७ अब्ज टन कचरा म्हणून टाकून देण्यात आला आहे. गेल्या चार दशकांत जागतिक प्लास्टिक कचऱ्याचे उत्पादन सात पटीने वाढले आहे असे स्टेटिस्टा दाखवते. आशिया हा असा प्रदेश आहे जो सर्वात जास्त अनियंत्रित प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो जागतिक एकूण कचऱ्यापैकी ६५ टक्के आहे.

आपल्या अन्नातून, पिण्याच्या पाण्यातून आणि श्वास घेत असलेल्या ऑक्सिजनमधूनही प्लास्टिकचे प्रदूषण आपल्या शरीरात प्रवेश करते. सौर किरणे, वारा, प्रवाह आणि इतर नैसर्गिक घटकांमुळे प्लास्टिकचे सूक्ष्म प्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिक्समध्ये विघटन होते. नॅनोप्लास्टिक्स शरीरात सहजपणे प्रवेश करू शकतात.

आपल्या हृदयात, फुफ्फुसात, यकृतात, प्लीहामध्ये, मूत्रपिंडात आणि मेंदूमध्येही सूक्ष्म प्लास्टिक आढळले आहे आणि अलीकडील एका अभ्यासात नवजात मुलांच्या प्लेसेंटामध्ये सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले आहे. प्लास्टिकमधून बाहेर पडणारी किमान ४,२१९ रसायने चिंतेचा विषय आहेत.

समुद्रात २४ ट्रिलियन सूक्ष्म प्लास्टिकच्या तुकड्यांसह, सागरी जीव बहुतेकदा प्लास्टिकचे सेवन करतात. जेव्हा मानव सागरी जीव खातात तेव्हा ते प्लास्टिक मानवी शरीरात प्रवेश करते. संशोधकांचा अंदाज आहे की सरासरी व्यक्ती दरवर्षी समुद्री खाद्यपदार्थांमधून सुमारे ५३,८६४ सूक्ष्म प्लास्टिक कण खातो.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

भारतात दरडोई प्लास्टिकचा वापर दरवर्षी अंदाजे ११ किलोपर्यंत वाढला आहे आणि तो वाढतच राहण्याची शक्यता आहे. दरवर्षी ५.८ दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिक कचरा जाळला जातो, ज्यामुळे हवेत डायऑक्सिनसह अनेक हानिकारक प्रदूषक सोडले जातात, ज्यामुळे श्वसनाचे आजार होतात आणि कर्करोगाचा धोका वाढतो.

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनुसार, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन न केल्यास २०३० पर्यंत भारताला १३३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त भौतिक मूल्याचे नुकसान होऊ शकते. नेचरमध्ये प्रकाशित झालेल्या

एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, भारत प्लास्टिक प्रदूषणात जगातील सर्वात मोठा वाटा देणारा देश बनला आहे, जो एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्याच्या जवळपास २० टक्के आहे. भारत दरवर्षी ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो पर्यावरण प्रदूषणाच्या बाबतीत जगातील इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा जास्त आहे. भारताचा अधिकृत कचरा संकलन दर ९५ टक्के आहे, तर संशोधनातून असे दिसून आले आहे की प्रत्यक्ष दर ८१ टक्के आहे.

अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, भारतातील दररोजच्या प्लास्टिक कचऱ्यापैकी फक्त ८-१० टक्के रिसायकल केला जातो, उर्वरित जाळला जातो किंवा लँडफिल आणि जलमार्गांमध्ये टाकला जातो.

प्लास्टिक पिशव्यांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो, ते जैविकरित्या विघटित होत नाहीत, प्लास्टिक पिशव्या पेट्रोलियम उत्पादनांपासून बनवल्या जातात, त्यांच्या उत्पादनादरम्यान विषारी रसायने सोडली जातात. प्लास्टिक अन्न साठवणुकीच्या पॅकेजेसमध्ये विषारी रसायने असतात. प्लास्टिक पिशव्यांचे मोठे संचय अनेकदा ड्रेनेज सिस्टममध्ये अडथळा आणतात.

प्लास्टिक पिशव्यांमुळे मुलांमध्ये फुफ्फुसांच्या गुंतागुंतीचा धोका वाढतो आणि महिलांमध्ये प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, तसेच प्लास्टिकमुळे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा धोका देखील वाढू शकतो. प्लास्टिक पिशव्या भूजल प्रदूषित करतात, प्लास्टिक प्रदूषणामुळे नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत होते. प्लास्टिक पिशव्यांच्या उत्पादनात भरपूर पाणी वापरले जाते.

अज्ञान म्हणा किंवा निष्काळजीपणा, लोक गरम अन्नपदार्थ पॅक करण्यासाठी प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा वापर करतात. आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की लोक लहान-लहान कॅरी बॅगमध्ये गरम पेये, चहा, कॉफी घेऊन जातात.

अनेक हॉटेल, रेस्टॉरंट किंवा रस्त्यावर स्ट्रीट फूड, नाश्ता, अन्न देखील प्लास्टिकच्या प्लेटमध्ये खाल्ले जाते किंवा प्लास्टिकच्या कॅरी बॅग पार्सल म्हणून वापरल्या जातात, जे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे.

प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गरम अन्न किंवा खाद्य ठेवणे हे विषासारखे आहे, कारण गरम अन्नपदार्थ प्लास्टिकच्या संपर्कात येताच रासायनिक प्रक्रिया सुरू करतात. प्लास्टिक गरम होताच, त्यातून बाहेर पडणारे हानिकारक रसायने अन्नपदार्थांमध्ये शोषले जातात आणि ते अन्न सेवन करून माणूस थेट प्राणघातक आजारांना आमंत्रण देतो. हे माहित असूनही, देशात अन्नपदार्थांसाठी प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

ग्राहकांच्या मागणी पूर्ण करण्यासाठी प्लास्टिकचे उत्पादन केले जाते, जर आपण ग्राहक प्लास्टिकपासून दूर राहिलो तर ही समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. प्लास्टिकला इतर पर्यायांचा अवलंब, पर्यावरण वाचवण्यासाठी जागरूकता आणि आपली प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक आहे.

सर्वप्रथम, आपला स्वार्थ आणि आळस सोडून द्या, सरकारी धोरणे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करा. मग प्लास्टिकला शक्य असलेले पर्याय स्वीकारा. वापरा आणि फेकून द्या सारख्या वस्तूंना नाही म्हणा. प्लास्टिकच्या पिशव्या पूर्णपणे विसरून जा, अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये प्लास्टिक वापरणे टाळा.

आज प्लास्टिक ही सोय आहे पण आयुष्यभरासाठी धोका आहे, हे समजून घ्या. पर्यावरण आपल्याला चांगले जीवन देण्यासाठी आहे, जर आपण आपले पर्यावरण नष्ट केले तर पर्यावरण आपल्याला देखील नष्ट करेल. याचे गांभीर्य समजून घ्या आणि जागरूक नागरिकाचे कर्तव्य बजावा.

■ ■ ■

# आणीबाणीच्या आठवणी!

आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १८ जानेवारी १९७७ रोजी अचानकपणे लोकसभा निवडणुकांची घोषणा केली. त्यांचा हा निर्णय सर्वांनाच आश्चर्यचकित करणारा होता.

त्यांनी आणीबाणी जारी केली तेंव्हा देशातील जनतेला जो धक्का बसला होता, त्यापेक्षा जास्त धक्का त्यांनी लोकसभा निवडणुकांची घोषणा केल्यानंतर देशातील जनतेला बसला.विरोधी पक्षाच्या नेत्यांचा तर त्यावर विश्वासच बसला नव्हता.

तुरुंगात असलेल्या विरोधी पक्षाच्या काही नेत्यांनी इंदिरा गांधी यांचे रेडिओ वरील भाषण ऐकले नव्हते, त्यामुळे तुरुंगाचे दरवाजे उघडून त्यांची जेंव्हा सुटका झाली तेव्हा त्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.



अभय गोखले

इतकेच नव्हे तर इंदिरा गांधी यांच्या काही सहकाऱ्यांनाही त्याची माहिती नव्हती, त्यामुळे तेही आश्चर्यचकित झाले. फेब्रुवारी १९७७ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीच्या रामलीला मैदानात विरोधी पक्षांची जी सभा झाली तीला उपस्थित असलेला प्रचंड जनसमुदाय पाहता, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे काय होणार याचा अंदाज सर्वांनाच आला होता.

२ फेब्रुवारी १९७७ रोजी इंदिरा गांधी यांना आणखी एक धक्का बसला.इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे निकटचे सहकारी जगजीवन राम यांनी अचानकपणे आपल्या मंत्रिपदाचा तसेच पक्षाचा राजीनामा देऊन इंदिरा गांधी यांना अनपेक्षित धक्का दिला. त्यांच्याबरोबरच उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री हेमवतीनंदन बहुगुणा आणि ओरिसाच्या माजी मुख्यमंत्री नंदिनी सत्पथी यांनी पक्षाचा त्याग केला.त्यांच्या पक्षत्यागामुळे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याचा अंदाज सर्वांना आला.

काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर वरील नेत्यांनी ' काँग्रेस फॉर डेमॉक्रसी ' या पक्षाची स्थापना केली आणि आपला पक्ष जनता पक्षाबरोबर आघाडी करणार असल्याचे जाहीर केले.

या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव होणार हे मतदानाअगोदरच निश्चित झाले होते. २० मार्च १९७७ रोजी जेंव्हा निवडणुकीचे निकाल बाहेर येऊ लागले तेंव्हा पहिल्या तासातच काँग्रेसचा मोठा पराभव होणार याचा अंदाज आला.

दक्षिण भारताने काँग्रेसची लाज राखली, मात्र उत्तर भारतात काँग्रेसचा पुर्णपणे सफाया झाला. उत्तर भारतात काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. इंदिरा गांधी यांचा रायबरेलीतून तर संजय गांधींचा अमेठीतून पराभव झाला.

इंदिरा गांधी यांचे विशेष सहाय्यक मोहंमद युनूस यांनी आपल्या 'परसन्स पॅशन्स आणि पोलिटिक्स 'या आपल्या पुस्तकात इंदिरा गांधी यांचा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरचा घटनाक्रम मोठ्या रोचकतेने मांडला आहे.

इंदिरा गांधी या त्यांच्या रायबरेली मतदार संघातून निवडणूक हरत असल्याचे संकेत १९ मार्च रोजी दुपारी चार वाजता मिळाले होते.

एका बातमी नुसार इंदिरा गांधी या त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी राजनारायण यांच्या बऱ्याच मागे पडत चालल्या होत्या. ही बातमी पंतप्रधानांचे खाजगी सचिव धवन यांनी पंतप्रधानांच्या निवासातील एका खोलीत येऊन सांगितली. त्यावेळी त्या खोलीत इंदिरा गांधी, मोहंमद युनूस आणि इंदिरा गांधी यांची नातवंडे बसले होते

मोहंमद युनूस लिहितात की, आम्हाला ती बातमी ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला.परंतु त्याही परिस्थितीत न डगमगता इंदिरा गांधी यांनी धवन यांना सांगितले की, त्यांनी रायबरेली येथे फोन करून तिथे नक्की काय परिस्थिती आहे हे जाणून घ्यावे. रात्री आठ वाजता इंदिरा गांधी या मोठ्या मताधिक्याने हरणार हे नक्की झाले, तेंव्हा मोहंमद युनूस हे तिथेच होते. इतक्या वर्षांचा इतिहास त्यांच्या डोळ्यासमोर आला. युनूस पुढे लिहितात की इंदिरा गांधी यांनी माझ्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि म्हणाल्या, तू राजकारणात नसल्यामुळे तुला आता हायसे वाटत असेल.

तेवढ्यात एक सामाजिक कार्यकर्त्या आणि पंतप्रधानांच्या कुटुंबाशी निकटचे संबंध असलेल्या, पुपूल जयकर आत आल्या. त्या खूपच खचलेल्या वाटत होत्या. इंदिरा गांधी यांनी त्यांची समजूत काढत म्हटलं की, असं कधी कधी घडतं. तू खचून जाऊ नकोस. त्यावर डोळ्यात पाणी आणून पुपूल जयकर उत्तरल्या की, इंदू ,ते ठीक आहे, पण ते तुझ्या बाबतीत घडायला नको होतं.

युनूस यांनी पुढे लिहिले आहे की, त्यानंतर आम्ही ड्रॉइंग रुममध्ये त्याबाबत काही काळ चर्चा केली. नंतर सोनिया गांधी आम्हाला डायनिंग रूमकडे घेऊन गेल्या. तेथे इंदिरा गांधी या स्वस्थपणे जेवत होत्या. इतरांचे मात्र जेवणाकडे लक्ष नव्हते.

इंदिरा गांधी या मनातल्या मनात पुढील हालचालींचा विचार करत असाव्यात. रात्री साडेदहा वाजता केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली. त्या बैठकीत आणीबाणी उठवण्यात आली. बैठक मध्यरात्री संपली. तो पर्यंत इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीतील पराभवावर शिक्कामोर्तब झाले होते.

रात्री अकरा वाजता संजय गांधी आणि त्यांची पत्नी मनेका गांधी हे अमेठीहून परत आले. मध्यरात्री राजकारणी लोक आपापल्या घरी परतले.

मात्र रात्री दोन वाजता इंदिरा गांधी यांच्या भोवती कॅबिनेट सेक्रेटरी, होम सेक्रेटरी आणि इतर खासगी सचिवांचा घोळका कायम होता. त्या पटापट कागदपत्रांवर सह्या करत होत्या, चर्चा करत होत्या, अधिकाऱ्यांशी बोलत होत्या, मध्येच आपल्या कुटुंबातील व्यक्तींशी बोलत होत्या. निवडणूक हरल्यामुळे निर्माण होणाऱ्या निराशेचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

मोहंमद युनूस जेंव्हा पहाटे परत इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानी गेले तेंव्हा त्यांनी पाहिले की घरातील सर्वजण अगोदरच उठून सामानाची बांधाबांध करत होते.इंदिरा गांधी यांनी घरातील सर्वांना सक्त सूचना दिल्या होत्या की आपण आता इथे एक क्षणही राहणे इष्ट ठरणार नाही. १२, विलिंग्डन क्रिसेंट हे निवासस्थान इंदिरा गांधी यांना उपलब्ध करून देण्यात आले होते.या नवीन जागेत सुध्दा इंदिरा गांधी यांना भेटण्यासाठी रोज बरेच लोक येत असत.

■ ■ ■

# अंतराळात भारताची लष्करी शक्ती

ऑपरेशन सिंदूर नंतर, भारत आता अंतराळात आपली लष्करी शक्ती आणखी मजबूत करणार आहे. सरकारने निर्णय घेतला आहे की २०२९ पर्यंत (पुढील ४ वर्षांत) ५२ विशेष संरक्षण उपग्रह अवकाशात पाठवले जातील, हे सर्व उपग्रह अंतराळात भारताचे डोळे बनतील आणि पाकिस्तान-चीन सीमेवर सतत लक्ष ठेवतील.

हे उपग्रह कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित असतील. ते ३६ हजार किमी उंचीवरून एकमेकांशी संवाद साधू शकतील. यामुळे पृथ्वीवर सिग्नल, संदेश आणि चित्रे पाठवणे सोपे होईल.

हे संपूर्ण अभियान संरक्षण अंतराळ संस्थेच्या अंतर्गत चालवले जात आहे आणि यासाठी सरकारने 'अंतराळ-आधारित देखरेख फेज-३' (SBS-t) योजना तयार केली आहे. यासाठी २६,९६८ कोटींचे बजेट आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीने याला मान्यता दिली.

या योजनेअंतर्गत, इस्त्रो २१ उपग्रहांची निर्मिती आणि प्रक्षेपण करेल, तर ३१ उपग्रह तीन खासगी भारतीय कंपन्या तयार करतील. पहिला उपग्रह एप्रिल २०२६ पर्यंत प्रक्षेपित केला जाईल, परंतु अंतिम मुदत आणखी कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे उपग्रह लो-अर्थ ऑर्बिट आणि जिओस्टेशनरी ऑर्बिटमध्ये तैनात केले जातील.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, एसबीएस-३ चा उद्देश पाकिस्तान, चीन आणि हिंद महासागर प्रदेश अधिक तपशीलवार कव्हर करणे आहे, ज्यामुळे कमी वेळेत उच्च-रिझोल्यूशन देखरेख शक्य होईल.

**HAPS विमानांमुळे ताकदही वाढेल**

इस्त्रोच्या उपग्रहांव्यतिरिक्त, हवाई दल तीन हाय-अल्टिट्यूड प्लॅटफॉर्म सिस्टम (HAPS) विमाने खरेदी करण्याची योजना आखत आहे. ही ड्रोनसारखी मानवरहित विमाने असतील, जी दीर्घकाळ उंचावर उड्डाण करून देखरेख करण्यास मदत करतील. यामुळे उपग्रहांच्या देखरेखीची क्षमता बळकट होईल.

■ ■ ■






'श्री विठ्ठल' अवघ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. श्री विठ्ठलाचे भक्त म्हणजेच वारकरी विठ्ठलाला 'माउली' संबोधतात. आई ज्याप्रमाणे बाळाच्या सर्व इच्छा पुरवते, त्याचे लाड करते आणि त्याची काळजीही घेते त्याप्रमाणे विठूमाऊली तिच्या भक्तांच्या समस्त इच्छा पुरवते. भक्तांवर येणारी संकटे परतवून लावते, प्रसंगी भक्ताच्या घरी जाऊन त्याची सेवाही करते. माऊलीच्या अशाच एका भक्ताची कथा संक्षिप्त स्वरूपात आज पाहणार आहोत.

# लेकरांची 'विठूमाऊली'

निस्सीम भक्ती आणि पराकोटीच्या भावामुळे साक्षात विठ्ठलालाच बोलावून बंधनमुक्त करण्यास भाग पाडणाऱ्या संत सखुबाई वारकरी संप्रदायाच्या इतिहासात कायमच्या अजरामर झाल्या. कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाड या ठिकाणी पती आणि सासू-सासऱ्यांसह राहणाऱ्या सखुबाई भगवंताच्या भक्तीमध्ये सदैव लीन राहायच्या.

सखूबाईंचे पती, सासू आणि सासरे या तिघांनाही सखूबाईची भगवत भक्ती रुचत नव्हती त्यामुळे ते तिघेही तिचा पुष्कळ छळ करत; मात्र या छळाला भगवंताची देणगी मानून त्या सर्व काही सहन करत असत. एकदा कृष्णा नदीकाठी सखू पाणी भरण्यासाठी गेल्या असता त्यांना पंढरीकडे निघालेली दिंडी दिसली.

विठ्ठल दर्शनाच्या ओढीने त्याही दिंडीत सहभागी झाल्या. याविषयी त्यांच्या घरी कळताच त्यांच्या पतीने त्यांना मारहाण करत घरी आणले आणि घरात एका खुंटीला बांधून ठेवले. पंढरपूर यात्रा संपेपर्यंत त्यांना बांधून ठेवायचे, दोन सप्ताह काहीच खायला प्यायला द्यायचे नाही असे ठरवून तिघेही आपापल्या कामाला लागले.

सखुना बांधलेला दोर इतका घट्ट होता कि काही दिवसांनी त्यांच्या शरीराला खड्डे पडू लागले. याही परिस्थितीत त्यांनी आर्त भावाने श्री विठ्ठलाला साद घातली , 'हे नाथा, या डोळ्यांनी तुझे एकदा जरी चरण पाहिले असते, तरी मी तात्काळ प्राण त्यागले असते. मी जशीही आहे तुझीच आहे, तूच मला या बंधनातून मुक्त कर' आर्त भावाने आळवलेली सखूची हाक थेट श्री विठ्ठलाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचली.

क्षणाचाही विलंब न करता भगवंताने सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि सखूकडे गेला. स्त्री रूपातील भगवंत सखूबाईंना म्हणाला, 'मी पंढरपूरला जात आहे तुला नाही जायचे का?' यावर सखू उदगारल्या 'मी इथे बांधलेली आहे, माझ्यासारख्या पापिणीच्या नशिबात पंढरपूरची यात्रा कुठे ' यावर स्त्रीरूपातील भगवंत म्हणाला 'बाई मी तुझ्या पाठीशी आहे, तुझ्या जागी मी उभी राहते, माझ्या ऐवजी तू पंढरपूरला जा. असे म्हणून भगवंताने तिच्या शरीराभोवती गुंडाळलेला केवळ दोरखंड मुक्त केला नाही, तर या भवसागरातून सखूबाईंना कायमचे बंधनमुक्त केले.

१५ दिवस उपाशी राहिलेल्या सखू मृत पावल्या तर आपण संकटात येऊ या भीतीने तिचे नातेवाईक सखूबाईंचे रूप घेतलेल्या भगवंताचा दोरखंड सोडतात. पुढे सखूबाई येईपर्यंत सखूच्या जागी साक्षात श्री विठ्ठल सखूबाईंच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा करतो. भगवंताच्या सहवासाने सखूच्या पतीच्या आणि सासू सासऱ्याच्या स्वभावात परिवर्तन होऊन त्यांच्या वर्तणुकीत पालट होतो.

भावाचा भुकेला असलेल्या भगवंताने भक्ताच्या घरी जाऊन भक्ताचीच सेवा केल्याची कितीतरी उदाहरणे संत चरित्रांत सापडतात. ज्याप्रमाणे सखूबाईंसाठी त्याने १५ दिवस स्वतःला बांधून घेतले, तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, त्याप्रमाणे त्याने जनाबाईसाठी धुणी धुतली , एकनाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले आहे. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत.

संतांची चरित्रे वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे सर्वच संतांनी जीवनात कितीही घनघोर संकट आले तरी भगवंताची साथ तिळमात्रही सोडली नाही. उलट या परिस्थितीत त्यांनी केवळ भगवंतालाच आळवले. मायेतील प्रलोभने त्यांनी कधी जवळ केली नाहीत. मी भगवंताचा आणि माझा केवळ आणि केवळ भगवंत याच उत्कट भावाने त्यांनी मनोभावे उपासना केली शेवटी भगवंतालाही न राहवून भक्ताच्या साहाय्याला धावून यावेच लागते.

भगवंत जसा सखूबाईंना बंधनमुक्त करण्यासाठी आला, संत गोरा कुंभारांना त्यांचे बाळ जिवंत करण्यासाठी आला, संत तुकारामांना सदेह वैकुंठात नेण्यासाठी आला. ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवण्यासाठी आला तसा तो आपल्याही साहाय्यासाठी का धावून येणार नाही?

घरातील परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानाही सखूबाईंनी विठ्ठलाची आराधना सोडली नाही. साधना करताना घरातून होणारा विरोध सहन करत आपणही भगवंताची मनोभावे साधना करतो का ?

ज्या आर्ततेने सखूबाईंनी श्री विठ्ठलाला साद घातली त्या उत्कटनेने भगवंताला आपण आळवतो का ? पुंडलिकासाठी जो भगवंत गेली २८ युगे एका विटेवर उभा आहे तो भगवंत आपल्या आर्त हाकेसाठी का बरे धावून येणार नाही?



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

■ ■ ■

# भक्तीच्या परंपरेवर होत असलेले आघात!

**वाचक लिहितात**

महाराष्ट्राला संतांच्या परंपरेचा वारसा लाभलेला आहे. संतांच्या शिकवणीचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजेच आषाढी वारी! महाराष्ट्राचे वैभव म्हणजे ही वारी! या वारीतून हिंदू ऐक्याचे आणि भक्तीभावाचे दर्शन घडते. मात्र, काही वर्षांपासून या वारीत विघ्ने आणण्याचे प्रयत्न सातत्याने होत आहेत.

यंदाच्या वारीत तर देवाचे अस्तित्वच नाकारणाऱ्या अंनिसवाल्यांनी संविधान समता दिंडी या गोंडस नावाखाली वारीत घुसखोरी केल्याचे समोर आले आहे. याच अंनिसवाल्यांनी यापूर्वी वारीला अंधश्रद्धा ठरवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले होते. आता तर ते पवित्र वारीत प्रवेश करून संत साहित्य, अभंग, धर्मग्रंथ आणि वारकऱ्यांचे श्रद्धास्थान यांच्याविषयी अपप्रचार करत आहेत, आणि वारकऱ्यांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुसरीकडे, अबू आझमी यांनी वारीतील पालख्यांमुळे रस्ते जाम होतात. रस्त्यावर हिंदू सण साजरे होतात; मुसलमान तक्रार करत नाहीत.

पण मुसलमानांनी दहा मिनिटांसाठी रस्त्यावर नमाजपठण केल्यावर तक्रारी होतात, असे वक्तव्य केले. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, ह्यह्यआमचे रस्त्यावरचे नमाजपठण बंद केले, तर तुमची वारीही बंद करा.

या घटनांवरून स्पष्ट दिसते की, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे वारीला विरोध वाढत आहे. हिंदू ऐक्याचे प्रतीक असलेली ही वारी अनेकांना खुपते आहे. म्हणूनच ते वारंवार या वारीत अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

यासाठी, समस्त वारकरी संप्रदायाने आणि सर्व हिंदूंनी जागृत राहून कृती करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, जसे बंगालमध्ये ६२९ वर्षांची रथयात्रा बंद पाडली गेली, तसेच आपल्या ७०० वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या वारीसोहळ्याचे भवितव्यही धोक्यात येऊ शकते.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

आपल्या भारतीय स्वयंपाकघरात जेवण बनवताना अनेक प्रकारचे मसाले वापरले जातात. हे मसाले केवळ जेवणाची चव वाढवतातच असे नाही तर आपल्या आरोग्यासाठीही खूप फायदे देतात. दालचिनी ही त्यापैकी एक आहे.

दालचिनीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आणि पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असतात. आयुर्वेदातही याला महत्त्वाचे स्थान आहे. कारण दालचिनीमध्ये व्हिटॅमिन-ए पासून कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि पोटॅशियम पर्यंत अनेक पोषक घटक असतात. त्यात अँटीऑक्सिडंट, दाहक-विरोधी आणि सूक्ष्मजीवविरोधी गुणधर्म देखील भरपूर असतात. सहसा तुम्ही भाज्या तसेच फुलाव भात बनवण्यासाठी दालचिनीचा वापर करता, पण तुम्हाला माहिती आहे का की तुम्ही दालचिनीचे पाणी देखील पिऊ शकता?




**मासिक पाळीच्या वेदनांपासून आराम मिळतो :** महिलांना दर महिन्याला मासिक पाळीच्या वेळी असह्य वेदना सहन कराव्या लागतात. पोटदुखी, पेटके इत्यादी अनेक समस्या उद्भवतात. जर तुम्हाला यापासून आराम मिळवायचा असेल तर तुम्ही दालचिनीचे पाणी प्यावे. यामुळे तुम्हाला आराम मिळेल.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते :** जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी प्यायले तर ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. अँटिऑक्सिडंट, अँटी-व्हायरल, अँटी-मायक्रोबियल आणि अँटी-फंगल गुणधर्मांनी समृद्ध असल्याने, दालचिनी तुम्हाला अनेक आजार आणि संसर्गांपासून वाचवते.

**वजन कमी होणे :** दालचिनीचे पाणी वजन कमी करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. या पाण्याच्या सेवनाने चयापचय वाढते. यामुळे कॅलरीज जलद बर्न होतात. जर तुम्ही दररोज सकाळी दालचिनीचे पाणी प्यायले तर ते भूक नियंत्रित करते. पोट आणि कंबरेभोवती जमा झालेली फॅट कमी होते.

**मधुमेहाच्या रूग्णांसाठी फायदेशीर :** मधुमेहाच्या रुग्णांनी दालचिनीचे पाणी नक्कीच प्यावे. ते रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी पिऊ शकता. जर तुम्ही खूप जास्त औषधे घेत असाल तर ते पिण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला नक्कीच घ्या.

**पचन चांगले करा :** जर तुम्हाला पोटात गॅस, अपचन किंवा जडपणा यासारख्या समस्या असतील तर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी दालचिनीचे पाणी प्यावे. यामुळे पचनक्रिया सुधारते. पोटाशी संबंधित समस्या देखील दूर होतात.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## ताळ - मेळ

पगार आला हाती तरी
आनंद होईना अंतरी
कारण तुटीचं बजेट भौ
कायम आहे ना उरी..!

आमदानी अठन्नी
और खर्चा रुपय्या
यात संतुलन साधलं
तर मनशांती मिळेल भैया..

स्त्रोत वाढवा उत्पन्नाचे
मग पसरवा पाय
इच्छांना मुरड घाला
नाय तर फजिती
झाल्याविना राहणार नाय !

# 'पालघर-त्र्यंबकेश्वर-घोटी' मार्गाला मंजूरी

## नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महामार्गांचा विकास

**जव्हार, दि. २ : प्रतिनिधी**

नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या निमित्ताने नाशिकला जोडणाऱ्या सर्व राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांच्या एकूण दहा रस्त्यांचा विकास करण्यात येणार आहे. यामध्ये घोटी, त्रंबकेश्वर, मोखाडा, जव्हार, विक्रमगड, मनोर या राष्ट्रीय महामार्गाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे गेली सात वर्षे घोटी ते पालघर या रस्त्याची राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषणा झाल्यानंतर केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी यामहामार्गाच्या विकासाची घोषणा केली आहे.

नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळयाला भाविकांची होणारी अलोट गर्दी व वाहतूक व्यवस्थेसंदर्भात लागणारी कुंभमेळयाच्या निमित्ताने रस्त्यांचा विकास , रस्त्यांची सुविधा, आवश्यक रस्त्यांची निर्मिती ही केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयामार्फत करण्यास केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी तत्त्वतः मान्यता दिली आहे. याबाबत लवकरच डीपीआर करून त्याला निधी उपलब्ध करून दिला जाईल, असा निर्णय नाशिक संस्था कुंभमेळा बैठकीत नागपूर येथे घेण्यात आला.

कुंभमेळयाला होणारी गर्दी लक्षात घेऊन त्याचे नियोजन, पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्र पातळीवर मदतीची विनंती केली होती.

# जमीन अभिहस्तांरण प्रक्रियेसाठी प्रमाणित कार्यपद्धती-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना कब्जे हक्काने प्रदान केलेल्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी असलेली प्रक्रिया सोपी करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. तसेच अल्प उत्पन्न गटातील रहिवाशांना रूपांतर करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार सध्या डे असलेली मूल्यांकनाच्या रक्कम १० टक्क्यांपेक्षा कमी करता येईल काय/ हे तपासले जाईल, असेही त्यांनी सांगितले

मुंबईतील मालाड पूर्व येथील नागरी निवारा वसाहत योजनेतील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना भोगवटादार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी येणाऱ्या अडचणींबाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेत भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी जमीन भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्याबाबत सरकारने काढलेला आदेश अत्यंत क्लिष्ट असल्याची टीका करत सुटसुटीत आदेश काढण्याची मागणी केली होती.

या मागणीवर बोलताना बावनकुळे यांनी, जमिनीचे रूपांतर भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्यासाठी सुटसुटीत प्रमाणित कार्यपद्धती तयार केली जाईल. यात ही प्रक्रिया किती दिवसात पूर्ण होऊन प्रकरण निकाली निघेल हे पाहिले जाईल, असे स्पष्ट केले. या कार्यपद्धतीमुळे लोकांना सरकार दरबारी खेटे मारावे लागणार नाहीत, असेही बावनकुळे म्हणाले. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे मिळावीत ही सरकारची प्राथमिकता आहे. त्यामुळे नागरी निवारा वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी तातडीने कार्यवाही केली जाईल, असे आश्वासनही बावनकुळे यांनी दिले.

तत्पूर्वी, नागरी निवारा योजनेतील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना १५ ते २५ वर्षांपूर्वी सरकारने कब्जे हक्काने जमीन दिली होती. ही जमीन भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार (रेडी रेकनर) १० टक्के मूल्यांकन रक्कम आकारत आहे. परंतु, या संस्थांनी २७ जून २०२५ रोजी मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन ही रक्कम १ टक्के पेक्षा जास्त न आकारण्याची मागणी केली आहे, अशी माहिती सुनील प्रभू यांनी यावेळी दिली. या चर्चेत भाजपच्या अमित साटम यांनीही भाग घेतला.

# त्या विद्यार्थिनीचा सर्पदंशाने मृत्यू

**वाडा, दि. २ : प्रतिनिधी**

सोनाळे येथील न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये पाचवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीचा मृत्यू सर्पदंशाने मृत्यू झाल्याचे निदान झाले आहे. मात्र, याघटनेत घटनेत वेळीच उपचार न मिळाल्याने मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे.

वेदिका प्रकाश झाटे (११) ही विद्यार्थीनी 26 जूनला मैत्रिणीसोबत घरातून सकाळी शाळेत गेली होती. शाळेच्या अल्पसुट्टीत तिला अचानक चक्कर आली. तिला जवळच्या दवाखान्यात किंवा शाळेपासून अवघ्या एक ते दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या आरोग्य केंद्रात नेण्याऐवजी नेण्याऐवजी ऐका शिक्षकाने आपल्या मोटारीतून थेट घरी सोडले होते. तसेच कोणताही दवाउपचार न करताच शाळेचे शिक्षक निघून गेले होते. तसेच शाळेनेही प्राथमिक उपचार करण्याऐवजी घरी सोडण्याचे काम शिक्षकावर सोपवले होते. मुलगी बेशुध्द असल्याने कुटुंबियांना तिला दुचाकीवरून वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचारांसाठी दाखल नेले होते. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले होते. दुसऱ्या दिवशी शवविच्छेदनात मुलीचा मृत्यू सर्पदंशाने झाल्याचे स्पष्ट झाले. अल्पसुट्टीत वेदिकाला साधी भोवळ आली असेल त्यामुळे गंभीर प्रकार वाटला नाही. त्यामुळे तिला दवाखान्यात न नेता तिच्या घरी सोडले. मात्र आमची मोठी चूक झाल्याचे मुख्याध्यापक वसंत महाले मान्य केले. वाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून अधिक तपास केला आहे.

# राज्यात अडीच वर्षात 427 पोलिसांचे मृत्यू; तर 25 आत्महत्या

## प्रत्येक मंगळवार आणि शुक्रवार संवादाची सक्ती-मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या अडीच वर्षांत ४२७ पोलिसांचा मृत्यू झाला असून, यात २५ आत्महत्यांचा समावेश आहे. पोलिसांत वाढत असलेल्या मानसिक तणावामुळे ही स्थिती उद्भवली असल्याचे स्पष्ट होताच, राज्य सरकारने तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्यातील प्रत्येक पोलिस युनिटमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांना आता दर मंगळवारी आणि शुक्रवारी दोन तास कर्मचाऱ्यांशी संवाद साधावा लागणार आहे. आठवड्यात किती पोलिसांशी संवाद झाला याची नोंद ठेवण्याचे निर्देशही सरकारने दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली.

आमदार सुनील शिंदे यांनी पोलिसांच्या ड्युटीदरम्यान होणाऱ्या मृत्यूचा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न, आरोग्य व्यवस्था व डिजी लोन आदी प्रश्नावरून सरकारला धारेवर धरले. पोलिसांच्या ड्युटीचा ८ तासांचा कालावधी असला, तरीही किमान १२ तास त्यांना काम करावे लागते. मुंबई पोलिस दलात कार्यरत असलेल्यांपैकी निम्म्याहून अधिक पोलिस मुंबईबाहेर वास्तव्यास आहेत. वसई, विरार, नवी मुंबई, पनवेलपासून कर्जत, कसारापर्यंत पोलिसांचे वास्तव्य आहे. यामुळे दिवसातील किमान १६ ते १८ तास त्यांचे ड्युटी व प्रवासात जाते. त्यामुळे योगा आणि व्यायाम करण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. पोलिसांचे सर्वाधिक मृत्यू हे हृदयविकाराच्या झटक्याने होत असल्याची माहिती दानवे यांनी सभागृहात दिली. प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, संजय खोडके, भाई जगताप, बंटी पाटील यांनी पोलिसांच्या समस्यांबाबत विधान परिषदेत आवाज उठवला.

मुख्यमंत्री फडणवीस यावर म्हणाले की, पोलिसांची ८ तासाची ड्युटी असून, सण-उत्सव किंवा बंदोबस्ताच्या वेळी काही कारणास्तव सुट्टी न मिळाल्यास त्याचे एनकॅशमेंटही मोठ्या प्रमाणावर वाढवले आहे. पोलिसांमध्ये वाढणाऱ्या जीवनशैलीशी संबंधित आजारांवर लक्ष दिले जात आहे. ४० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून एकदा आणि ५० वर्षांवरील पोलिसांसाठी वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी अनिवार्य केले आहे.

### पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प

मुंबईसह राज्यभरात पोलिसांसाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प राबवले जात आहेत. तालुका स्तरावर ही काम वेगाने सुरू आहे. पोलिस गृह निर्माण महामंडळाचे काम अभूतपूर्व असल्याचे त्यांनी नमूद केले. डीजी लोन योजनेचा उल्लेख करताना फडणवीस म्हणाले की, त्यांनी गृहमंत्री असताना ही योजना सुरू केली होती. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात ती बंद झाली होती. नव्याने गृहमंत्रीपद आल्यानंतर ती पुन्हा सुरू केले असून आता बॅकलॉक निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### अनुकंपा भरती मिशन मोडवर

राज्य शासनाच्या १५० दिवस आराखडा कार्यक्रमात पोलिसांच्या अनुकंपा भरती संदर्भातील सर्व प्रकरणे मिशन मोडवर निकाली काढली जातील. यासाठी सर्व विभागांना यासंबंधी आदेश दिले आहेत.

### ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार

यासंदर्भात अधिक माहिती देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, मुंबई व महाराष्ट्र पोलिस दलात गेल्या काही वर्षांत हृदयविकार, कर्करोग, आत्महत्या अशा विविध कारणांमुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे मृत्यू झाले. यात कार्डियाक अरेस्टमुळे ७५ मृत्यू, कर्करोगामुळे ६ मृत्यू झाले आहेत. पोलिसांच्या कल्याणासाठी शासनाने अनेक उपाययोजना राबवत असून यात ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. यासाठी राज्यात २७० हॉस्पिटल्ससोबत टायअप करण्यात आले आहे. टाटा मेमोरियल व ए.के. मेहता यांच्यासोबत कॅन्सर तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलिसांसाठी योगा, ध्यानधारणा व व्यायामशाळा सुरू करण्यात आली असल्याचे गृह राज्यमंत्री कदम यांनी यावेळी दिली.

# वसईतील रक्तपेढ्याच ऑक्सिजनवर

## काही दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा शिल्लक

**वसई, दि. २ : प्रतिनिधी**




वसईतील रक्तपेढ्यांमध्ये काही दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा शिल्लक आहे. याची दखल घेत वसईतील डॉक्टर संघटनांनी एकत्रित येत स्वैच्छिक रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

रक्तदान शिबिरासाठी रक्तदाते पुढे येत नसल्याने वसईतील ब्लड बँकांतील रक्तसाठा केवळ दोन-तीन दिवस पुरेल इतकाच शिल्लक आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात येताच रक्ताचा निर्माण झालेला तुटवडा भरून काढण्यासाठी वसईतील डॉक्टर संघटनांनी डॉक्टर दिनानिमित्त स्वैच्छिक रक्तदान शिबिर आयोजित केले होते. इंडियन डेंटल असोसिएशन, वसई नायगाव डॉक्टर असोसिएशन, इंडियन मेडिकल असोसिएशन , वसई, वसई तालुका आयुर्वेदिक ग्रॅज्युएट वल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सरला रक्तपेढी येथे स्वैच्छिक रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्त तुटवडा भरण्यासाठी प्रयत्नशील राहिले. लोकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करण्याचे आवाहन या प्रसंगी डॉक्टर संघटनांनी केले आहे. डॉक्टर संघटनांकडून रक्तदान शिबिरास उत्सुर्फ प्रतिसाद मिळाला.

# गोरेगाव- मुलुंड जोड रस्ता प्रकल्पाला गती

## 19.43 हेक्टर जागा पालिकेकडे वळती; केंद्रीय पर्यावरण मंत्रालय यांची अंतिम मान्यता

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

मुंबईतील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या महत्वाकांक्षी गोरेगाव-मुलुंड जोड रस्ता प्रकल्प (तिसरा टप्पा) अंतर्गत बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून जाणाऱ्या जुळया बोगद्याच्या बांधणीला आता गती मिळणार आहे. प्रत्येकी ४.७ किलोमीटर अंतराच्या आणि ४५.७० मीटर रुंदीच्या जुळया बोगद्यासाठी आवश्यक असलेली १९.४३ हेक्टर वनजमीन मुंबई महापालिकेकडे वळती करण्यास केंद्रीय पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय यांची अंतिम मान्यता मिळाली आहे. त्यानुसार, अटी व शर्तींचे अनुपालन तसेच पूर्ततेची कार्यवाही मुंबई महापालिकेमार्फत सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिली आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीसाठीच नव्हे, तर महानगराच्या समतोल विकासासाठीही एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास बांगर यांनी व्यक्त केला आहे.

मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली गोरेगाव- मुलुंड जोड रस्ता (लिंक रोड) प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सुमारे १२.२० किलोमीटर लांबीचा हा प्रकल्प एकूण चार टप्प्यांमध्ये राबविला जात आहे. या संपूर्ण प्रकल्पामुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरांदरम्यान प्रवासाची वेळ ७५ मिनिटांवरुन २५ मिनिटांवर येणार आहे. मुंबईकरांच्या प्रवास वेळेत आणि इंधनाची बचत होणार आहे. तसेच, कार्बन उत्सर्जनात दरवर्षी सुमारे २२ हजार ४०० टन इतकी घट होणार आहे.

### वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळणार

अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर म्हणाले की, गोरेगाव-मुलुंड जोड मार्ग हा मुंबईमधील पूर्व आणि पश्चिम उपनगरांना एकमेकांशी जोडणारा नवीन प्रमुख जोडरस्ता आहे. विशेषत: उत्तर मुंबईतील वाहतुकीस मोठा फायदा होणार असून वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळणार आहे. जोगेश्वरी-विक्रोळी जोड रस्त्याच्या (जेव्हीएलआर) तुलनेत या नवीन जोडरस्त्यामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ८.८० किलोमीटरने कमी होणार आहे. इंधन वापरात बचत, मुंबईच्या वायू गुणवत्ता निर्देशांकातही (एक्यूआय) सुधारणा होण्यास मदत मिळणार आहे.

### जुळया बोगद्याची निर्मिती

गोरेगाव - मुलुंड जोड रस्ता प्रकल्पाच्या टप्पा ३(अ) अंतर्गत उड्डाणपूल, एलिव्हेटेड रोटरीचे बांधकाम तर, टप्पा ३ (ब) मध्ये गोरेगांव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे १.२२ किलोमीटर लांबीचा तिहेरी मार्गिका असलेला पेटी बोगदा (कट अँड कव्हर) तसेच बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रत्येकी ४.७ किलोमीटर अंतराच्या आणि ४५.७० मीटर रुंदीच्या जुळया बोगद्याची निर्मिती केली जाणार आहे. जोड मार्ग आणि अन्य बाबींसह तिसऱ्या टप्प्यातील मार्गाची एकूण लांबी ६.६५ किलोमीटर आहे.


## आज का अंदाज

गुरूवार ३ जुलै २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ३३५ | १६७ | ८९० | १८९ | १४७ | ४५६ | २७७ | १३३ |
| ४७० | ५९० | ३४० | ३७८ | ३४५ | १७७ | १४४ | ४६७ |
| ५६० | ६८० | २५० | २५० | २०० | २५८ | ७९० | २५० |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २१ | ५१ | ६९ | ७९ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २२ | ५२ | ६४ | ७४ |

**३ जुलै : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २४ | ३४ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## संस्कृत काही सोपी भाषा नाही, पण आमची नेहमी नवीन शिकण्याची तयारी असत : हुनर हाली

**मुंबई, २ जुलै :** दमदार कथा आणि उत्तम अभिनय यामुळे सोनी सबवरील वीर हनुमान मालिका लोकांची आवडती मालिका झाली आहे. या मालिकेत आपला पराक्रम, भक्ती आणि सदाचाराने समस्त प्रेक्षकांचे मन जिंकणाऱ्या बाल हनुमानाची भूमिका आन तिवारी हा बालकलाकार करत आहे.

पडद्यावर डोळ्यांना आनंद देणाऱ्या या मालिकेच्या पडद्याच्या मागे यातील कलाकारांचे संबंध खूप छान आहेत. या मालिकेत अलीकडेच कैकयीच्या भूमिकेत दाखल झालेल्या हुनर हाली गांधीने पडद्याच्या मागे एक वेगळी भूमिका स्वीकारली आहे– आन तिवारील संस्कृत शिकवण्याची! संस्कृत भाषेवर प्रेम असणारी आणि बऱ्यापैकी प्रभुत्व असणारी हुनर आनला संस्कृत भाषेतील छोट्या छोट्या गोष्टी आणि श्लोकांचे अर्थ समजावून सांगत असते. आन आपले संवाद न अडखळता बोलू शकेल आणि त्याला त्या संवादांचे मर्म देखील समजेल यासाठी ती प्रयत्न करत असते. टेक्सच्या मध्ये त्यांची शिकवणी चालते, ज्यात थट्टा विनोद, कुतूहल आणि रुची दिसते आणि हे सगळे प्रत्येक दृश्य अचूक करण्यासाठी असते!

पडद्याच्या मागच्या या विशेष नात्याविषयी बोलताना हुनर हाली गांधी म्हणते, मला संस्कृत पहिल्यापासून आवडते. ही काही सोपी भाषा नाही, खास करून आनसारख्या लहान मुलासाठी. पण मला या गोष्टीचे कौतुक वाटते की, तो शिकण्यासाठी उत्सुक असतो. आन खूप प्रामाणिक आणि जिज्ञासू मुलगा आहे. तो जी मेहनत घेतो ती पाहून मलाच त्याला मदत करावीशी वाटते. आमचे एक मस्त रुटीन आहे. मी शब्दार्थांचे क्विझ घेते, संवादांचे भाग करून त्यांचा अर्थ त्याला समजावते. आम्हाला दोघांना या खेळात मजा येत आहे. वीर हनुमान मालिकेत काम करणे हाच मुळात एक दिव्य अनुभव आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कामासोबतच महत्त्वाची जबाबदारी मिळण्याचे संकेत आहेत. अचानक मोठी जबाबदारी मिळू शकते.

**वृषभ :** आज पदोन्नतीची संधी मिळेल. इलेक्ट्रॉनिकच्या कामाशी संबंधित लोकांना आज चांगला नफा होईल. आर्थिकदृष्ट्या तुम्ही मजबूत राहाल. वैवाहिक जीवनात तुमचे जोडीदारासोबतचे संबंध अधिक घट्ट होतील.

**मिथुन :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. परीक्षा किंवा स्पर्धेत यश मिळण्याचे संकेत आहेत.

**कर्क :** आज कामाच्या ठिकाणी संघर्ष वाढू शकतो. तुम्हाला काही अप्रिय बातम्या मिळू शकतात. व्यावसायिकांची परिस्थिती सुधारेल. नवीन कामाच्या योजना आखल्या जातील आणि फायदे मिळतील.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर आणि प्रगतीशील असेल. कामे हळूहळू पूर्ण होतील. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. शहाणपणाने निर्णय घ्या.

**कन्या :** जुन्या मित्रासोबत फिरण्याचा प्लॅन करू शकता. तुमचे करिअर चांगले राहील. कठीण परिस्थितीत तुमचा संयम ढळू देऊ नका. नाहीतर, नुकसान होण्याची शक्यता जास्त असेल.

**तुळ :** आजचा काळ तुमच्यासाठी अनुकूल असेल. उच्चपदस्थ आणि प्रतिष्ठित लोकांशी संपर्क वाढतील. कामाच्या ठिकाणी तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. सकारात्मक विचारसरणी ठेवा.

**वृश्चिक :** आज, जुना मालमत्तेचा वाद सोडवला जाऊ शकतो. ज्यामुळे तुम्हाला संपत्ती मिळू शकते. तुमचे मन इकडे तिकडे भटकू देऊ नका. राजकारणात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.


**धनु :** आजचा दिवस काही चांगल्या बातम्यांनी सुरू होईल. कोणावरही जास्त विश्वास ठेवू नका. स्वत:वर विश्वास ठेवा. जवळच्या मित्रांकडून पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे. यश मिळण्याची चिन्हे आहेत.

**मकर :** आज तुम्हाला व्यवसायात नवीन मित्र मिळतील. नोकरीत तुम्हाला पदोन्नती मिळू शकते. मित्रांसोबत पर्यटनस्थळी सहलीला जाऊ शकता. न्यायालयीन प्रकरणांमध्ये संयम बाळगा.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी लाभ आणि प्रगतीचा असेल. अतिरिक्त परिश्रमाने परिस्थिती सुधारेल. वैयक्तिक समस्यांमध्ये इतरांना हस्तक्षेप करू देऊ नका. तुमच्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने निर्णय घ्या.

**मीन :** आज कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. अन्यथा, तो तुम्हाला फसवू शकतो. महत्त्वाच्या कामांमध्ये तुम्हाला अधिक संघर्ष करावा लागेल.

## शब्दकोडे क्रमांक २१५३




**आडवे शब्द :-**
१) देवावर विश्वास नसणारा
३) संसार
५) बातमीदार
७) किंमत
९) दंतमंजन
१२) निरुद्योगी
१५) सर्वत्र आरसे लावलेले घर
१७) कशा प्रकारचा?
१८) हात
१९) जबरदस्तीने
२१) घोड्याच्या पायाखाली लावण्याचे लोखंडी साधन
२२) मलईची घट्ट बासुंदी
२४) गल्ली
२५) दुर्दशा
२६) केसांची लट
२८) चौक
२९) कानापर्यंत
३०) संगीतातील एक राग
३१) जिम्मेदार
३४) मृत्यु नसलेला
३५) छोटे कुबड
३६) सत्वांश
३८) जागविणारा आवाज
३९) सोन्याचा धागा
४०) मुखरस
४१) उद्याच्या नंतरचा दिवस
४३) तल्लीनता
४५) नास्तिकता धर्माविरुद्ध मत
४६) उलट, विरुद्ध
४९) च्या सह
५१) शिकारीचा प्राणी
५२) एखाद्या मुद्यावरून भांडण
५५) मुकटा
५६) जगातील सर्वात उंच पुतळा ह्या भारतीय नेत्याचा आहे
६१) घासणे (इं.)
६२) स्तुती करणारा
६३) वाहतुकीचा रस्ता
६५) एका कुशीवर निजलेला
६७) बारीक दगड (हिं )
७०) वैमानिक
७१) कोळ्याच्या जातीचा एक कीटक
७२) जल
७३) धार्मिष्ठ

**उभे शब्द :-**
१) प्रजाजन
२) शपथ
३) सूर्याचे एक नाव
४) ओरखडा
५) छोटी वस्ती
६) उपस्थित
८) चकचकाट, प्रकाश, तेज
१०) कपडे अडकविण्याचे एक साधन
११) नाजूक
१३) बांगड्यांचा व्यवसाय करणारी जमात
१४) छोटा डोंगर
१५) पाणी साठण्यासाठी झाडाभोवती केलेला खड्डा
१६) सेनापती
१९) ताकद
२०) सतरंजी, रुजामा
२३) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२४) नरमांजर
२६) माळी
२७) संध्याकाळ
२८) बाई
२९) आम्रफलातील द्रवपदार्थ
३२) उद्यान
३३) दरवाजा
३४) महासर्प
३५) लाटण्याचा साथीदार
३७) प्रश्नोत्तरे
४१) प्रतिध्वनी
४२) रविवार
४४) दिवसाचा चोविसावा भाग
४७) पालव
४८) बिनावासाचे पांढरे फूल
५०) गुरांचा घोळका
५३) प्रिया, पत्नी
५४) एक अप्सरा
५५) लेखणी
५७) वणवा
५८) भ्रमंती, फिरणे
५९) परमेश्वर
६०) दुरून केलेली बारकाईने पाहणी
६१) सडक
६४) रक्षण करणारा
६५) एक प्रश्नार्थक शब्द
६६) वडाचे झाड,
६८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
७०) आंब्याची कोय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर





सत्यनारायण चौधरी पोलीस सह आयुक्त (का. व सु.) बृहन्मुंबई यांच्या हस्ते एमएचबी पोलीस ठाणे मुंबई गु.र.क्र.412/2025 कलम-306,316(4),61(2),3(5) भा.न्या.सं. मधील गुन्ह्यात गुजरात येथून 03 आरोपी अटक करून 11 किलो,107 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करून उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल बबलू तुकाराम साळुंखे यांना प्रशंसापत्र देवून सन्मान करण्यात आले.

# हाडाचा कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष होतो हे केवळ भाजपामध्येच शक्य

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गौरवोद्गार

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

भाजपचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या रुपाने पक्षाचा तळागाळातील हाडाचा कार्यकर्ता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे.भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपामध्येच शक्य आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री व भाजपा माजी राष्ट्रीय अध्यक्ष नितीनजी गडकरी यांनी मंगळवारी मुंबईत केले.भाजपाच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या निवडीची घोषणा करण्याच्या कार्यक्रमाचा समारोप त्यांच्याच भाषणाने झाला.

त्यांनी सांगितले की, रविंद्र चव्हाण यांचे आई वडील कोणी आमदार नव्हते, त्यांच्या पाठीशी कुटुंबाचा उद्योग व्यवसाय नव्हता.मात्र ते पक्षाचे तळमळीचे कार्यकर्ते आहेत.त्यांनी कोकणातील गावागावात जाऊन पक्षाचा विस्तार केला आणि पक्षाला यश मिळवून दिले.असे दैवदुर्लभ कार्यकर्ते ही भाजपाची संपत्ती आहे. कार्यकर्त्यांच्या त्याग व बलिदानामुळे पक्ष मोठा झाला असल्याने त्यांच्या रुपाने आपल्यातील एक कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष झाल्याचा कार्यकर्त्यांना आनंदच असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ते म्हणाले की, काँग्रेस पक्ष सत्तेच्या साठ वर्षात जे काम करू शकला नाही ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या अकरा वर्षात देशात झाले आहे. पण अजूनही काम करायचे आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे.आणि हे स्वप्न पूर्ण करण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असेल, असा ठाम विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यातील महायुती सरकार ताकदवान आहे. त्यासोबत रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात संघटनही मजबूत असेल.दोन्हीच्या समन्वयातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर आधारित राज्यात शिवशाही आणू असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पक्षाचे मावळते प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कार्याचा गौरव करताना गडकरी म्हणाले की, पक्षाचा संघर्षशील कार्यकर्ता किती मोठा होऊ शकतो याचे उदाहरण म्हणजे चंद्रशेखर बावनकुळे आहेत. त्यांनी प्रदेशाध्यक्ष झाल्यावर रात्रं दिवस प्रवास करून पक्षासाठी काम केले.त्यांच्याच नेतृत्वात पक्षाला विधानसभा निवडणुकीत यश मिळाले.

## महापालिकेसाठी भाजपची मोर्चेबांधणी

# शेलार यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक व्यवस्थापन समिती

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपने मोर्चेबांधणी सुरु केली असून निवडणूक व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी पक्षाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीत फडणवीस यांचे निकटवर्ती मानले जाणारे आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांना स्थान न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या समिती सदस्य म्हणून माजी खासदार किरीट सोमैया, माजी मंत्री प्रकाश मेहता, भाई गिरकर, माजी आमदार मधू चव्हाण, राज पुरोहित, आमदार कालीदास कोळंबकर, पराग अळवणी, कॅप्टन तमिल सेल्वन, राम कदम, पराग शहा, श्रीकांत भारतीय, जयप्रकाश ठाकूर, माधव भांडारी, हाजी अराफत शेख, राणी द्विवेदी, संजय पांडे, दिलीप पटेल आणि अरुण देव यांचा समावेश आहे. केंद्रीय पदाधिकारी आणि मुंबई कोअर कमिटी सदस्य हे या समितीवर कायम निमंत्रित सदस्य म्हणून असणार आहेत.

# मातोश्रीबाहेर 'त्रिभाषा'वरून उद्धव ठाकरेंना डिवचणारे बॅनर्स

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

मातोश्री परिसर पुन्हा एकदा बॅनरराजकारणाच्या भाळावर वादळ निर्माण करणाऱ्या फलकांनी गजबजला आहे. यावेळी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांना त्रिभाषा सूत्राबाबत थेट डिवचणारे बॅनर्स लावण्यात आले असून, या बॅनर्सची चर्चा संपूर्ण मुंबईत रंगली आहे. या आज्ञात बॅनर्सवर कुठल्याही पक्षाचे नाव नाही. मात्र, उद्धव ठाकरेंचा फोटो लावून, ते मुख्यमंत्री असताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत त्रिभाषा सूत्र मंजूर केल्याच्या निर्णयावरून त्यांना टोला लगावण्यात आला आहे.




बॅनरवरील मजकूर "असं सूत्र तुम्हीच स्वीकारलं होतं, विसरलात की काय? सत्य बाहेर आलं की घशात गेलं, दात उबाठानेच केला मराठीचा घात." यानंतर डॉ. माशेलकर समितीच्या अहवालाचा दाखलाही या बॅनरवर देण्यात आला आहे, ज्यामध्ये ठाकरे सरकारच्या निर्णयाचा उल्लेख आहे.

विशेष म्हणजे, ५ जुलै रोजी ठाकरे बंधू – उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे – यांची पहिल्यांदाच संयुक्त सभा होत आहे. अशावेळी मातोश्री परिसरात अशा बॅनर्स लावल्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राज्यातील वातावरण आधीच चांगलेच तापले असताना, शिवसेना, मनसे आणि इतर पक्षांमध्ये बॅनर युद्ध चिघळताना दिसत आहे.

या बॅनर्सवर कोणताही पक्ष किंवा संघटनेचे नाव नसल्याने यामागचा नेमका हेतू आणि लावणाऱ्यांचा चेहरा कोणता? याकडे राजकीय वर्तुळातील आणि प्रशासनातील सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महापौर बंगल्यातच होणार बाळासाहेबांचे स्मारक

महत्त्वाच्या बातम्या

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मुंबई महापौरांच्या बंगल्यातील स्मारकाचा मार्ग मोकळा झाला आहे. आठ वर्षांपूर्वी स्मारकाच्या निर्णयाविरोधात दाखल झालेल्या जनहित याचिकेसह अन्य याचिका मुख्य न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या खंडपीठाने सर्व याचिका फेटाळून लावल्या. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याला विरोध नाही. परंतु शिवाजी पार्क येथील मुंबई महापौर बंगल्याची जागा देण्यात येणार आहे. त्या विरोधात असल्याचे याचिकेत नमूद केले आहे. महापालिकेने ही जागा वार्षिक एक रुपया दराने ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एमआरटीपी कायद्यात आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

## नोकरीचे आमिष देणाऱ्या यूट्युबरला अटक

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

परदेशात उच्च पगाराच्या नोकऱ्यांचे आमिष दाखवून तरुणांची फसवणूक करणाऱ्या एका यूट्यूबरला मुंबई क्राईम ब्रँचने अटक केली आहे. आरोपी संजय विश्वकर्मा (३३) याने आपल्या यूट्यूब चॅनेलवर खोटे आणि दिशाभूल करणारे व्हिडीओ अपलोड करून, संपर्क क्रमांक देत वर्क व्हिसा लावून देण्याच्या नावाखाली देशभरातील अनेक जणांकडून पैसे उकळले. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संजय विश्वकर्माविरुद्ध मुंबई, मीरा-भाईंदर, उत्तर प्रदेश आणि हरियाणा येथे चार गुन्हे नोंदवले गेले आहेत. या चॅनेलला ६,००० हून अधिक सदस्य (सबस्क्राइबर्स) होते.

## पालिकेतील खासगीकरणाच्या विरोधात संघर्ष समिती संपावर ठाम

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिकेतील अनेक विभागात खासगीकरण करण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी पालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापन विभाग व परिवहन विभागातील खासगीकरणाकडे मोर्चा वळवला आहे. या संबंधीची माहिती प्रशासनाने सर्व कामगार संघटनांची बैठक घेऊन सांगितले. यानंतर समितीने निविदा रद्द करण्याची केल्यानंतर पालिकेने निविदा प्रक्रिया पुढे ढकलली असली कामगार संप करण्याच्या निर्णयावर ठाम आहेत. या संपाचा निर्णय कामगार येत्या ९ जुलैला मतदानाच्या माध्यमातून जाहीर करणार आहेत. पालिकेच्या सर्व कामगार संघटनांनी सोमवारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन खाजगीकरणाची निविदा रद्द करण्याची मागणी केली. तेव्हा आयुक्तांनी निविदा प्रक्रिया ८ जुलै पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर संघर्ष समितीने राणी बागेतील अण्णाभाऊ साठे सभागृहात झालेल्या कामगारांच्या मेळाव्यात संपावर ठाम असल्याची भूमिका जाहीर करीत ९ जुलै रोजी बेमुदत संप जाहीर करणार असल्याचे स्पष्ट सांगितले. या मेळाव्याला संघर्ष समितीचे अध्यक्ष अशोक जाधव निमंत्रक वामन कविस्कर, शशांक राव, रमाकांत बने, बाबा कदम सत्यवान जावकर उपस्थित होते.

## उच्च न्यायालयाचा येस बँकेला दणका

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

आधार ओळखपत्राचा आग्रह करून बँक खाते उघडण्यास विलंब केल्याबद्दल उच्च न्यायालयाने येस बँकेला याचिकाकर्त्या मायक्रोफायबर्स प्रायव्हेट लिमिटेडला ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्या कंपनीने जानेवारी २०१९मध्ये बँकेत खाते उघडले असले तरी आधार ओळखपत्र अनिवार्य नसतानाही म्हणजेच एप्रिल ते सप्टेंबर २०१८ पर्यंत बँकेने कंपनीचे खाते उघडले नसल्याचेही न्या. महेश सोनाक आणि न्या. जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने आपल्या आदेशात नमूद केले. तरीही बँकेने भरपाईच्या मुद्द्यावरही कोणतेही उत्तर दिले नाही आणि याचिकाकर्त्याकडे उत्पन्नाचे पर्यायी साधन नव्हते, त्याची दखल घेऊन ५० हजार रुपयांची भरपाई कंपनीला देण्याचे आदेश न्यायालयाने बँकेला देताना ही रक्कम आठ आठवड्यांत जमा करण्याचेही स्पष्ट केले.

# माजी आमदार विजय भांबळेंनी हाती बांधले घड्याळ

मुंबई दि. २ प्रतिनिधी

पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर नंदूरबारहून राज्याच्या दौरा सुरु करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिली. महिला विकास मंडळ सभागृह मुंबई येथे आज गडचिरोली, चंद्रपूर, परभणी, नागपूर, हिंगोली, अहिल्यानगर, आणि मानखुर्द शिवाजीनगर येथील विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला सर्वांना सोबत घेऊन महिला, युवक, युवती यांना संधी द्यायची आहे असे सांगतानाच अजितदादा पवार यांनी यापुढे गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार असे चार दिवस पक्षाला देणार असल्याचे जाहीर केले. पक्षात येणाऱ्या लोकांचा नक्कीच मानसन्मान राखला जाईल असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

शरदचंद्र पवार गटाचे जिंतूरचे माजी आमदार विजय भांबळे यांनी यावेळी आपल्या असंख्य पदाधिकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



याशिवाय गडचिरोली, चंद्रपूर, अहिल्यानगर, परभणी, नागपूर, हिंगोली, या जिल्हयातील महानगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषदेतील विविध पक्षातील पदाधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक आणि आमदार सना मलिक यांच्या नेतृत्वाखाली मुंबई मानखुर्द - शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील सपाच्या महिला व पुरुष पदाधिकारी यांनीही मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# पुनर्विकासाला आणला अडथळा भाडेकरूंना प्रत्येकी २ लाखांचा दंड

मुंबई दि. २ प्रतिनिधी

मालाड पश्चिम येथील धोकादायक अवस्थेतील इमारतीच्या पुनर्विकासास अडथळा आणणाऱ्या आठ भाडेकरूंची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली असून, त्यांना प्रत्येकी १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. भाडेकरूंची भूमिका "अडथळा निर्माण करणारी" असल्याचा ठपका न्यायालयाने ठेवला आहे.

या भाडेकरूंनी १०० वर्षे जुन्या कृष्ण बाग इमारत क्र. १ या इमारतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने २०२३ मध्ये दिलेल्या पाडकाम नोटीसीला आव्हान दिले होते. ही इमारत "सी१" वर्गात मोडणारी असल्याने राहण्यायोग्य नसून तात्काळ पाडणे आवश्यक असल्याचे घोषित करण्यात आले आहे. पालिकेने ही नोटीस प्रथम ऑक्टोबर २०२० मध्ये जारी केली होती. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठासमोर दोन याचिकांवर सुनावणी झाली एका याचिकेत भाडेकरूंनी इमारत रिकामी करण्याच्या नोटिशीला आव्हान दिले होत. इमारतीचा वर्ग "सी१"वरून "सीर-बी" मध्ये बदलावा, जेणेकरून दुरुस्ती करता येईल, अशी मागणी होती; तर दुसरी याचिका मालकांनी दाखल केली होती, ज्यात पाडकाम अंमलात आणण्याची मागणी करण्यात आली होती. अधिक धोकादायक राहिलेला नाही आणि न्यायालयाने भाडेकरूंचा युक्तिवाद फेटाळून लावला की, दुरुस्तीनंतर भूतल त्यामुळे इमारत रिकामी करणे गरजेचे नाही. न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की, मालकाने सुरू केलेल्या पुनर्विकास प्रक्रियेला भाडेकरूंनी अडथळा निर्माण करू नये. सर्वोच्च न्यायालयात जाण्यासाठी सहा आठवड्यांची स्थगिती देण्याची भाडेकरूंची विनंतीही न्यायालयाने फेटाळली, कारण त्यांच्या "खोडसाळ आणि हट्टाग्रहाने" अन्य रहिवाशांचे नुकसान झाले आहे, असे न्यायालयाने नमूद केले. या निर्णयानुसार, संबंधित आठही भाडेकरूंनी प्रत्येकी १२ लाख आर्म फोर्स बॅटल कॅज्युल्टीज वेलफेअर फंड यामध्ये चार आठवड्यांत जमा करणे बंधनकारक आहे, असे आदेश उच्च न्यायालयाने यावेळी दिले आहेत.

# रेल्वेत दररोज सरासरी ३० मोबाईल फोनची चोरी

मुंबई दि. २ प्रतिनिधी

मुंबईच्या उपनगरीय लोकल ट्रेन मध्ये मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले असून दररोज सरासरी ३० ते ३५ मोबाईल फोन चोरले जात आहेत. २०२४ मध्ये ११ हजार तर चालू वर्षातील ५ महिन्यात साडेतीन हजार मोबाईन फोनची चोरी झाली आहे. म्हणजेच महिन्याला साधारण ९५० आणि दिवसाला सरासरी ३० मोबाईल फोनची चोरी होत आहे. चालू वर्षातील जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत ३ हजार ५७६ मोबाईल फोनची चोरी झाली आहे. म्हणजे या वर्षी देखील महिन्याला सातशेहून अधिक मोबाईल फोन चोरण्यात आले आहेत.

दरम्यान, रेल्वे परिसरात मोबाईल चोरणाऱ्या एका सराईत चोराला रेल्वे पोलिसांच्या विशेष कृती दलाने अटक केली आहे. नदीम नवाब फरिदी उर्फ कार्टुन (२८) या सराईत मोबाईल चोराला अटक केली. जून महिन्यात त्याने दहा दिवसात ३ मोबाईल लंपास केले होते. त्याच्यावर यापूर्वी मोबाईल चोरीचे ४ गुन्हे आहेत.

हार्बर मार्गावर रेल्वेतून चोरी झालेल्या एका प्रकरणाचा तपास रेल्वेच्या विशेष कृती दलामार्फत सुरू होता. सीसीटीव्ही चित्रण आणि तांत्रिक तपास करून पोलिसांनी नदीम नवाब फरिदी उर्फ कार्टून (२८) या सराईत मोबाईल चोराला अटक केली.

# मच्छीमार महिला पालिकेत धडकणार

मुंबई दि. २ प्रतिनिधी

मुंबई, शहर प्रतिनिधी. क्रॉफर्ड मार्केट येथील छत्रपती शिवाजी महाराज मंडईतील मासळी विक्रेत्या कोळी महिला आणि इतर मासळी व्यावसायिकांना महापालिकेकडून फुटपाथवर स्थलांतर करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या मच्छिमार समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना ही प्रक्रिया त्वरित थांबविण्याचे आवाहन केले आहे. ही प्रक्रिया थांबवली नाही तर कोळी समाजाचा उद्रेक महानगरपालिका कार्यालयावर धडकल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृषी समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी दिला आहे.



क्रॉफर्ड मार्केट येथील महानगर पालिकेच्या सीटीएस क्रमांक १५०० या भूखंडावर पाच दशकांपासून अस्तित्वात असलेले छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईतील ३४८ मासळी व्यावसायिकांना रस्त्यावर आणण्याच्या महानगर पालिकेच्या निर्णयाचा मच्छिमार समाजात सर्व स्तरावरून निषेध होत आहे. फुटपाथवर स्थलांतरामुळे क्रॉफर्ड मार्केट येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होणार आहे. तसेच राज्यभरातून दररोज येणाऱ्या १५० हून अधिक मासळी वाहने, हजारोंच्या संख्येने येणाऱ्या मासळी विक्रेत्या आदींना गैरसोय निर्माण होणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले मार्केट समोरील रस्त्यावर नवीन शेड बांधून मासळी विक्रेत्या कोळी महिलांना आणि मासळी व्यापाऱ्यांचे स्थलांतर करण्यास समितीकडून तीव्र हरकत नोंदविण्यात आली आहे.

नव्वद हजार चौरस फूट क्षेत्र असलेल्या या मासळी मंडईत मूलभूत सुविधा नसल्याने राज्यभरातून येणाऱ्या मासळी व्यावसायिक तसेच मासळी ग्राहकांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. म्हणून तेथे शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कोळी महिलांना बसण्यासाठी बाकडे आदी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली असल्याचे समितीचे मुंबई जिल्हाध्यक्ष प्रफुल भोईर यांनी सांगितले. महापालिकेच्या दोषी अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी समितीकडून करण्यात आली आहे. मच्छिमार समाजाला फुटपाथवर आणण्याचा महानगरपालिकेचा हा निर्णय पालिकेने मागे घेतला नाही तर कोळी समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे ठामपणे समितीच्या महिला अध्यक्षा नयना पाटील यांनी सांगितले.

## ४० लाख पळवणाऱ्या कामगारांना अटक

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

मालकाचा विश्वास बसल्याची जाणीव होताच दोन कामगारांनी व्यापारातले ४० लाख रुपये घेऊन पोबारा केला; मात्र पोलिसांनी त्यांची वेळीच गचांडी आवळली. हनुमान राम आणि बेहरा राम अशी या कामगारांची नावे असून ते राजस्थानचे आहेत. गवालिया टैंक परिसरात राहणाऱ्या तक्रारदार व्यावसायिकाची गिरगाव येथे प्रोपरायटर फर्म आहे. तेथे आरोपीसह एकूण चार कर्मचारी काम करीत होते. गेल्या आठवड्यात शनिवारी तक्रारदाराने या दोघांना ४० लाख रुपयाच्या व्यवहाराची जबाबदारी सोपविली. ती रक्कम घेऊन दोघे पसार झाले. दोघांचे फोन बंद येऊ लागल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. तक्रारदाराने लागलीच व्ही. पी. रोड पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि मानवी कौशल्याआधारे या दोघांना - मुंबईबाहेर पडताच ताब्यात घेण्यात आले.

## पदव्युत्तर पदवीची प्रवेश प्रक्रिया सुरू

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत विविध पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. एमई, एम.टेक., एमबीए, एमसीए तसेच हॉटेल मॅनेजमेंट आदी अभ्यासक्रमांसाठी १ ते ९ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. राज्य सीईटी कक्षाकडून राबविण्यात येत असलेल्या या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला मंगळवारपासून (ता. १) सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनमधूनच संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश करण्यासाठी अर्ज करता येतील. विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्यातून पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची १३ जुलै रोजी प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे.

# अश्लील कृत्य : विकृताला शिकवला धडा

मुंबई दि. २ प्रतिनिधी

भर रस्त्यात महिलांना पाहून अश्लील वर्तन करणाऱ्या विकृताला एका तरुणीनेच चांगलाच धडा शिकवला. तिने मित्राच्या मदतीने या विकृताला पकडून चोप दिला आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. दहिसर येथे वास्तव्यास असलेली २५ वर्षीय तरुणी एका खासगी कंपनीत काम करते. दररोज सकाळी ती ७.३० च्या सुमारास कार्यालयात जाण्यासाठी रेल्वे स्थानक गाठते. रेल्वे स्थानकावर जाणारा रस्ता निर्मनुष्य असून तेथे वाहने उभी असतात. काही दिवसांपूर्वी सकाळी या रस्त्यावरून जात असताना तिच्याकडे पाहून एक तरुण अश्लील कृत्य करीत होता. ती त्याच्याकडे दुर्लक्ष करून निघून गेली. संध्याकाळी घरी परतल्यावर हा प्रकार तिने आपल्या पालकांना सांगितला. तिच्या पालकांनीही याकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला. काही दिवसांनी पुन्हा तसाच प्रकार घडला. तोच विकृत तरुण तिच्यासमोर येऊन अश्लील कृत्य करीत होता. ही तरुणी या प्रकारामुळे प्रचंड संतापली. त्याला जाब विचारला असल्यास तो हल्ला करण्याची शक्यता होती. त्यामुळे ती तडक तेथून निघून गेली.

दोन वेळा असा प्रकार झाल्याने ही तरूणी संतापली होती. तिला पालकांनी रस्ता बदलून जाण्याचा सल्ला दिला. मात्र तिने या विकृताला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी तिने आपल्या एका मित्राची मदत घेतली.


त्याला रंगेहाथ पकडून चोप देण्याचे दोघांनी ठरवले. त्यानुसार त्या ठिकाणी त्यांनी सापळा रचण्याचे ठरवले. दररोज सकाळी कामावर जाताना तिचा मित्र लांबून आडोशाला उभा राहून पाळत ठेवत होता. दोन दिवस तो विकृत तरुण दिसला नाही. तिसऱ्या दिवशी तरूणी सकाळी ७.४५ च्या सुमारास त्याच रस्त्याने निघाली होती. ठरलेल्या योजनेप्रमाणे लांबून तिचा मित्र पाळत ठेवून होता. ही तरुणी येताना पाहून त्या विकृताने पुन्हा अश्लील कृत्य करण्यास सुरवात केली. इतक्यात तिच्या मित्राने झडप घालून त्याला पकडले. दोघांनी त्याला चोप दिला. योगायोगाने त्याच वेळी तेथून पोलिसांची गस्तीची गाडी जात होती. त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

किरण पाडेकर (२८) असे या विकृत तरुणाचे नाव आहे. तो गाडीचालक आहे. गेल्या अनेक दिवसांपासून तो रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या महिलांना पाहून अशी अश्लील कृत्ये करीत असल्याची माहिती दहिसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक होनमाने यांनी दिली.

# मुंबईत मलेरिया आणि गॅस्ट्रोचा फैलाव

मुंबई दि. २ प्रतिनिधी

मुंबईत मलेरिया आणि गॅस्ट्रो (पोटांचे आजार) हे आजार वाढत आहेत. पालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जून महिन्यात दररोज सरासरी २९ जणांना मलेरिया तर ३१ जणांना गॅस्ट्रोचा त्रास होत होता.



मलेरिया रोग पसरवणाऱ्या ॲनोफिलीस डासांमुळे मुंबईकरांना पोटाच्या समस्यांना तसेत इतर आजारांना तोंड द्यावे लागत आहे. आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, या वर्षी संक्रमित लोकांची संख्या ८८४ असून वरील आकडेवारीनुसार, या वर्षी जूनमध्ये मलेरियाच्या रुग्णांची संख्या दुप्पट झाली आहे. यावर्षी गॅस्ट्रोबाधितांची संख्या ९३६ वर पोहोचली आहे. हिंदुजा रुग्णालयातील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीचे सल्लागार डॉ. पवन ढोबळे यांनी सांगितले, की पावसाळा येताच गॅस्ट्रोच्या रुग्णांमध्ये वाढ होते. जून महिन्यात गॅस्ट्रोचे सुमारे ४० रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी काही रुग्णांना फक्त हायड्रेशनमुळे आराम मिळतो, तर गंभीर प्रकरणांमध्ये - सारख्या आवश्यकता असते. डॉक्सीसायक्लिन अँटिबायोटिक्सची ते पुढे म्हणाले, की पावसाळ्यात दूषित पाणी आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या अस्वच्छ अन्नामुळे संसर्ग पसरतो. लक्षणे दिसल्यानंतर पालिकेचे दवाखाने आणि रुग्णालयांमध्ये त्वरित चाचणी आणि उपचार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पालिकेच्या कीटकनाशक विभागाने मुंबईतील विविध भागांत एकूण ७२,७९५ डासांच्या उत्पत्तीच्या ठिकाणांची तपासणी केली आहे. त्यापैकी ६,५०६ ठिकाणी मलेरियाच्या डासांची उत्पत्ती आढळून आली आहे.

## विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

राज्यभरातील विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मुंबईतील 'दर्द से हमदर्द तक' संस्था आणि पिंपरी येथील एसएनबीपी विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १२ व १३ जुलैला स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी 'कॉलेजियम सिस्टम- शाप कि वरदान?' हा विषय असून प्रथम असून पारितोषिक ३० हजार रुपये, द्वितीय पारितोषिक २० हजार रुपये तसेच उत्कृष्ट वक्ता व उत्कृष्ट रिबटल यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपये पारितोषिक दिले जाणार आहे. 'कॉलेजियम सिस्टम' देशातील न्यायाधीश नियुक्ती प्रक्रियेतील महत्त्वाची पद्धत आहे. त्यांचे विचार मांडण्यासाठी राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या हेतूने वादविवाद स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती 'दर्द से हमदर्द तक' संस्थेचे संस्थापक ॲड. प्रकाश साळसिंगीकर यांनी दिली. स्पर्धेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे




## गर्भवती महिलांचा मृत्यूदर चिंताजनक!

आरोग्य वेध
डॉ. मेघा दळे

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगात दर दोन मिनिटांनी एका गर्भवती महिलेचा मृत्यू होतो. माता मृत्युदर म्हणजे गर्भधारणेदरम्यान, प्रसूतीच्या वेळी किंवा प्रसूतीनंतर ४२ दिवसांच्या आत होणारा महिलेचा मृत्यू. 'अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिशियन अँड गायनॅकॉलॉजिस्ट' ही संस्था अनेक प्रकरणांमध्ये गर्भधारणेनंतर एक वर्षापर्यंतच्या कालावधीत होणाऱ्या मृत्यूला माता मृत्यूच मानते. माता मृत्युदर (एमएमआर) म्हणजे प्रति एक लाख जन्मांमागे झालेला मातांचा मृत्यू. २०२३ मध्ये जागतिक एमएमआर प्रति एक लाख जिवंत जन्मांमागे १९७ होता. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा दर ३४६ आणि उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये तो १० होता.



### महिलांच्या मृत्यूची कारणे

* **रक्तस्राव:** प्रसूतीनंतर जास्त रक्तस्राव (पोस्टपार्टम हेमरेज) हे माता मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते १९९० मध्ये एक लाख १४ हजार महिला अतिरिक्त रक्तस्रावामुळे मृत्युमुखी पडल्या. हा आकडा २०२१ पर्यंत ४७ हजारापर्यंत कमी झाला.

* **उच्च रक्तदाब विकार:** प्रीक्लेम्पसिया आणि एक्लेम्पसिया सारखे उच्च रक्तदाब विकार गर्भवती महिलांमध्ये मृत्यूचे प्रमुख कारण आहेत. हे विकार मेंदू, मूत्रपिंड आणि इतर अवयवांना नुकसान पोहोचवू शकतात.


* **मानसिक आरोग्य स्थिती:** नैराश्य, चिंता आणि प्रसूतीनंतरचे नैराश्य यासारख्या मानसिक आरोग्य स्थिती माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

* **संसर्ग:** गर्भधारणेदरम्यान किंवा प्रसूतीनंतर सेप्सिससारखे संसर्ग हे माता मृत्यूचे आणखी एक प्रमुख कारण आहे.

* **हृदयरोग:** हृदयरोग आणि कार्डिओमायोपॅथी (हृदयाच्या स्नायूंचे कमकुवत होणे) ही माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

## करून घ्या प्रतिबंधात्मक चाचण्या

आरोग्यवेध



उपचारांपेक्षा प्रतिबंध योग्य ठरतो. आरोग्याच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता कामा नये. वय वाढू लागल्यावर शरीरात बदल घडू लागतात. अनेक आजारांची सुरुवात होते. या आजारांचं निदान वेळीच झालं तर रोगमुक्त होता येतं. आजाराचं वेळीच निदान होण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं गरजेचं आहे. तिशीनंतर उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्टरॉल यासह इतरही चाचण्या करून घ्यायला हव्यात. अशाच काही उपयुक्त आणि गरजेच्या आरोग्य चाचण्यांविषयी...

* हृदयविकार कोणत्याही वयात होऊ शकतो. सध्याचं धकाधकीचं जीवन, आहाराच्या चुकीच्या सवयी हृदयविकाराला निमंत्रण देतात. हृदयविकाराची काही लक्षणं दिसू लागतात. हा धोका वेळीच ओळखण्यासाठी ईसीजी तपासणी करून घ्यायला हवी. ईसीजी म्हणजे इलेक्ट्रोकार्डिग'म. या चाचणीमुळे भविष्यातला हृदयविकाराचा धोका ओळखता येतो. काही उपाययोजना किंवा जीवनशैलीत बदल करून हृदयविकाराला आळा घालता येतो.

* भविष्यातल्या व्याधींचा धोका वेळीच ओळखण्यासाठी जनुकीय चाचण्या करून घेता येतील. जनुकीय चाचण्यांमुळे डीएनएमधले बदल टिपता येतील. कॅन्सरचा धोका ओळखता येईल. बाळाचा विचार करत असाल तर जनुकीय चाचण्या दिशादर्शक ठरू शकतात. या चाचण्यांमुळे तुमच्या बाळाचं आरोग्यही उत्तम राहू शकतं. काही जनुकीय चाचण्या खूप उपयुक्त ठरू शकतात.

* लिपिड प्रोफाइल चाचणीमुळे कोलेस्टरॉलची पातळी कळते. चांगल्या आणि वाईट कोलेस्टरॉलची पातळी कळल्यानंतर हृदयाच्या आरोग्याची कल्पना येऊ शकते. तिशीनंतर साधारण दोन वर्षांनी संपूर्ण लिपिड प्रोफाइल चाचणी करून घ्यायला हवी. हृदयविकार, स्थूलपणा, मधुमेह यांचा कौटुंबिक इतिहास असेल तर नियमित लिपिड प्रोफाइल चाचणी खूप उपयुक्त आणि प्रतिबंधात्मक ठरू शकते. वाईट कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

* यकृताच्या चाचण्याही करून बघायला हव्यात. यकृताचं आरोग्य खूप महत्त्वाचं असतं. शरीरातली रसायनं, प्रथिनं आणि ट्रायग्लिसराइड्सची तपासणी करून यकृताच्या आरोग्याची माहिती घेतली जाते. यामुळे हेपिटायटिससार'या विकारांचा धोका कमी होऊ शकतो किंवा वेळीच उपचार होऊ शकतात. तिशीनंतर यकृताची नियमित चाचणी करायला हवी.

* पॅप स्मिअर तसंच कोलनोस्कोपी या चाचण्याही गरजेच्या आहेत. पॅप स्मिअर ही चाचणी महिलांसाठी अत्यंत गरजेची आहे. तिशीनंतर या चाचण्या नियमितपणे करणं गरजेचं आहे. या चाचण्यांमुळे सर्व्हिकल कॅन्सर तसंच इतर घातक आजारांचा धोका वेळीच लक्षात येतो आणि त्या दृष्टीने उपाय करता येतात. कोलनोस्कोपी ही चाचणी पुरुषांसाठी गरजेची आहे. या चाचण्या पन्नाशीनंतर केल्या तरी चालत असलं तरी तिशीनंतर केल्यास घातक व्याधींचा धोका वेळीच लक्षात येऊ शकतो. कुटुंबात कलोन कॅन्सरचा इतिहास असेल तर ही चाचणी करून घेणं खूप गरजेचं आहे.

## 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे...

काय खावं?




एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेबरोबरच शरीराला आवश्यक असणाऱ्या जीवनसत्त्वांचा, खनिजांचा अतिरेकही वाईटच. सर्वसाधारणपणे निरोगी प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्वाची गरज असते. मात्र त्याचा अतिरेक घातक ठरू शकतो.


* 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधांच्या अतिरेकामुळे पचनसंस्थेशी संबंधित तक्रारी निर्माण होतात. दिवसभरात २००० मिलिग्रॅमपेक्षा अधिक क्षमतेची 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधं घेतल्यास जुलाब, मळमळणं, ॲकसिड रिफ्लक्ससार'या समस्या उद्भवू शकतात.

* 'क' जीवनसत्त्व शरीराला लोह शोषून घ्यायला मदत करतं. या जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे शरीर लोहही अधिक प्रमाणात शोषून घेईल. लोहाच्या अतिप्रमाणामुळे यकृत, हृदय, थायरॉइड, स्वादुपिंड तसंच मज्जासंस्था यांना नुकसान पोहचू शकतं.

* 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे मूतखड्याचा धोका वाढतो. हे जीवनसत्त्व ऑक्सालेटच्या रुपात मूत्रावाटे शरीराबाहेर टाकलं जातं. 'क' जीवनसत्त्व अधिक प्रमाणात घेतल्यास मूत्रातल्या ऑक्सालेट या घटकाचं प्रमाण वाढून खडे किंवा स्फटिक तयार होण्याची शक्यता वाढते.

## बॅड कोलेस्टेरॉलकडे दुर्लक्ष नको

आरोग्य चर्चा
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे



शरीरातील कोलेस्टेरॉलचे वाढलेले प्रमाण 'सायलेंट किलर' ठरते. त्याची लक्षणे चेहऱ्यापासून शरीरापर्यंत दिसतात. काही वेळा डोळ्यांभोवती किंवा आजूबाजूला पिवळे डाग दिसतात. हे झेंथेलास्माचे लक्षण असू शकते. हे डाग बहुतेकदा शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शक मानले जातात. चेहर्याचा रंग बदलणे, पापण्यांवर पिवळे डाग येणे ही त्याची आणखी काही लक्षणे आहेत. डोळ्यांच्या बुब्बुळांभोवती हलक्या रंगाची रिंग तयार होणे हे डोळ्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा होऊ लागल्याचे लक्षण असू शकते.

रक्तात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढल्यास रक्तवाहिन्या ब्लॉक होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयाला त्रास होऊ लागतो. शरीर थकलेले आणि सुस्त वाटते. कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर कोरडेपणासह खाज येण्याची समस्या दिसून येते. निळ्या आणि जांभळ्या रंगाचे डाग तयार होतात. ही रक्ताभिसरणावर अनिष्ट परिणाम झाल्याची लक्षणे आहेत. रक्तप्रवाह प्रभावित झाल्यामुळे डोके आणि पाय दुखण्याच्या तक्रारी दिसून येतात.

शरीरातील उच्च कोलेस्टेरॉलचा परिणाम पचनसंस्थेवर होतो. यासोबतच फुफ्फुसे आणि हृदयावरही दबाव वाढतो.

त्यामुळे छातीत दुखण्यासोबत श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. जंक फूडचे जास्त सेवन, शारीरिक हालचालींपासून दूर राहणे, जास्त वजन, लठ्ठपणा, दारू आणि सिगारेटचे सेवन तसेच अनुवांशिकता ही शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी वाढण्यामागील करणे असू शकतात.

## डोळे मिचकावताय?

वेगळे काही
डॉ. कुंदन गायकवाड

डोळे मिचकावणे हे 'मायोकायमिया' या आजाराचे लक्षण असू शकते. पापणीचे स्नायू आकुंचन पावल्यामुळे डोळे मिचकावले जातात. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर्स अँड स्ट्रोक' (एनआयएनडीएस)च्या मते बहुतेकवेळा ही स्थिती सौम्य असते आणि काही सेकंदांपासून काही मिनिटांपर्यंत टिकते.

* **तणाव आणि चिंता:** २०२३ मध्ये 'जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूरोसायकोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार तणाव मेंदूच्या न्यूरोट्रांसमीटर संतुलनावर परिणाम करतो. त्यामुळे पापण्यांच्या स्नायूंचे अनैच्छिक आकुंचन होऊ शकते.

* **झोपेचा अभाव:** पुरेशी झोप न घेतल्याने डोळे मिचकतात. 'स्लीप रिसर्च सोसायटी'च्या २०२४ च्या अभ्यासानुसार ७-९ तासांपेक्षा कमी झोपणाऱ्या लोकांना 'मायोकायमिया' होण्याची शक्यता ४० टक्के जास्त असते.

* **कॅफिन आणि अल्कोहोलचे जास्त सेवन:** कॉफी, चहा किंवा एनर्जी ड्रिंक्समध्ये आढळणारे कॅफिन आणि अल्कोहोल मज्जासंस्थेला उत्तेजित करतात.



त्यामुळे डोळ्यांचे स्नायू संवेदनशील होऊ शकतात. '२०२३ मध्ये फूड सायन्स अँड न्यूट्रिशन जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, कॅफिनचे जास्त सेवन केल्याने 'मायोकायमिया'चा धोका ३० टक्क्यांनी वाढू शकतो.

* **डोळ्यांचा दाब:** मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्हीच्या स्क्रीनकडे जास्त वेळ पाहिल्याने डोळ्यांच्या स्नायूंवर दबाव येतो. त्यामुळे डोळे मिचकवू शकतात. २०२४ मध्ये 'ऑफ्थॅल्मोलॉजी रिसर्च'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात डिजिटल स्क्रीनवर ६ तासांपेक्षा जास्त वेळ घालवणाऱ्यांमध्ये डोळे मिचकण्याच्या तक्रारी २५ टक्के जास्त असतात, असे आढळून आले आहे..

* **पोषक तत्वांची कमतरता:** व्हिटॅमिन बी१२, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमची कमतरता मज्जासंस्थेवर परिणाम करते. त्यामुळे डोळे मिचकतात.

* **डोळे कोरडे आणि ॲलर्जी** : ५० वर्षांहून अधिक वयाच्या लोकांना डोळे कोरडे होण्याची समस्या असते. त्यामुळे त्यांचे डोळे मिचकतात.

* **गंभीर न्यूरोलॉजिकल समस्या:** काही वेळा डोळे मिचकावणे हे ब्लेफेरोस्पाझम किंवा हेमिफेशियल स्पॅझम सारख्या गंभीर न्यूरोलॉजिकल समस्यांचे संकेत असू शकते. ब्लेफरोस्पाझममध्ये दोन्ही डोळ्यांच्या पापण्या अनैच्छिकपणे बंद होऊ शकतात. हेमिफेशियल स्पॅझममध्ये चेहऱ्याच्या एका बाजूला परिणाम होतो. मल्टिपल स्क्लेरोसिस किंवा पार्किन्सन सारख्या आजारांमुळेदेखील डोळे मिचकू शकतात. अशा वेळी ताबडतोब न्यूरोलॉजिस्टशी संपर्क साधावा.



## बटाटे फ्रीजमध्ये ठेऊ नका!

कुठे चुकतो आपण?

आ बटाटे खराब होऊ नयेत म्हणून फ्रीजमध्ये ठेवले जातात. मात्र ही कृती आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते.

* बटाटा फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर त्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. हीच साखर आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते. फ्रीजमधले बटाटे खाल्ल्यामुळे कर्करोगासारखी दुर्धर व्याधीही जडू शकते.

* बटाट्यातल्या साखरेचा यातल्याच अमिनो ॲसिड ॲस्परॅगनशी संपर्क होऊन ॲरक'इलामाइड नावाचं घातक रसायन तयार होतं. हे रसायन आरोग्यासाठी खूपच घातक ठरतं.

* फ्रीजमध्ये ठेवलेले बटाटे शिजवल्यानंतर त्यात ॲक्रइलामाइड रसायनाची निर्मिती होऊ लागते. हे रसायन पोटात गेल्यानंतर बराच त्रास होऊ शकतो. त्यामुळे बटाटे कोरड्या जागी ठेवायला हवेत.

* ॲक्राइलामाइड हे रसायन स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये आढळतं. उच्च तापमानावर शिजवलेल्या स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये या रसायनाची निर्मिती होते. हे रसायन कॅन्सरला कारणीभूत ठरू शकतं.

## दोषांनुसार निवडा व्यायामप्रकार

आयुर्वेद आणि विकार



निरोगी आणि तंदुरुस्त रहाण्यासाठी व्यायाम गरजेचा आहे हे आपण जाणतो. शरीराला कोणत्याही प्रकारचा व्यायाम चालतो, असं आपल्याला वाटतं. पण शरीरातल्या दोषांनुसार व्यायामाची निवड करायला हवी असं आयुर्वेद सांगतं. याबाबत विस्ताराने जाणून घेऊ.

* वात दोष असणारे लोक मुळातच उत्साही असतात. मात्र या लोकांची देहयष्टी बारीक असते. त्यांची पचनशक्तीही कमकुवत असते. तसंच त्यांचं वजनही कमी असतं. त्यामुळे वात दोष असणाऱ्यांनी कमी वेग असणाऱ्या व्यायामप्रकारांची निवड करायला हवी. लंजेस, स्क्वॉट्स, रेझिस्टन्स बँड ट्रेनिंग हे व्यायामप्रकार वात दोषांसाठी योग्य ठरतात. योगासनं तसंच कमी तीव्रतेचे व्यायामप्रकारही चालून जातात.

* पित्त प्रवृत्तीच्या लोकांचं शरीर अधिक उष्ण असतं. त्यांची शारीरिक क्षमता उत्तम असते. तसंच बांधाही मध्यम असतो. या लोकांनी आरामदायी तसंच तुलनेने सोपे व्यायामप्रकार करणं गरजेचं आहे. पित्तामुळे उष्णता वाढत असल्यामुळे या लोकांनी उष्ण तसंच आर्द्र जागेत व्यायाम करू नये. यीन योगा, पिलेट्स, पोहणं, चालणं असे व्यायाम करता येतील.

* कफ प्रवृत्तीच्या लोकांची शारीरिक क्षमता उत्तम असते. पण आळशीपणामुळे त्यांचं वजनही लवकर वाढतं. या लोकांना व्यायामासाठी उद्युक्त करणं खूप कठीण असतं. या लोकांनी झुंबा, कार्डिओ तसंच इतर वेगवान व्यायामप्रकार करायला हवेत.

## लहान मुलांनाही यकृताचा धोका

आरोग्य विशेष
डॉ. अजेय गर्जे



लहान मुलांमध्ये यकृताचा आजार क्वचितच दिसून येतो. परंतु 'अमेरिकन लिव्हर फाउंडेशन'च्या मते, फॅटी लिव्हर डिसीज (नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर), व्हायरल हेपेटायटीस (हिपॅटायटीस ए, बी, सी), ऑटोइम्यून हेपेटायटीस, मेटाबॉलिक लिव्हर डिसीज हे आजार यकृताचे आरोग्य बिघडवू शकतात.

जन्मापासून यकृतामध्ये दोष, आनुवंशिक समस्या, विषाणू संसर्ग (उदा. हिपॅटायटीस विषाणू), शरीरात एंझाइमची कमतरता, रोगप्रतिकारक शक्तीचे अयोग्य कार्य, जास्त चरबी किंवा साखर असलेले अन्न खाणे यामुळे ही समस्या वाढते.

मूल वारंवार आजारी पडत असेल, त्याचे वजन व्यवस्थित वाढत नसेल किंवा वारंवार उलट्या होत असतील तर हे यकृताच्या आजाराचे लक्षण असू शकते. याशिवाय, त्वचा किंवा डोळे पिवळे होणे (कावीळ), पोट फुगणे, लघवीचा गडद रंग, विष्ठेचा हलका रंग, थकवा आणि अशक्तपणा आणि भूक न लागणे ही त्याची लक्षणे असू शकतात. डॉक्टर मुलाच्या लक्षणांवर आधारित रक्त तपासणी, अल्ट्रासाऊंड किंवा सीटी स्कॅन, बायोप्सी, अनुवांशिक चाचणी अशा काही चाचण्या करतात.

उपचार रोगाच्या तीव्रतेवर आणि प्रकारावर अवलंबून असतात. काही प्रकरणांमध्ये औषधांमुळे विकार बरा होतो. परंतु गंभीर प्रकरणांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते. पित्त अट्रेसियासारख्या प्रकरणांमध्ये, वेळेवर शस्त्रक्रिया करणे आवश्यक ठरते.

## वायफाय, लॅपटॉपमुळे येते वंध्यत्व

जाणून घ्या
डॉ. सतीश सोनवणे



लोक अनेकदा लॅपटॉप मांडीवर ठेवून काम वापरतात. यामुळे ऑलिगोस्पर्मिया होऊ शकतो. यात वीर्यातील शुक्राणूंची संख्या कमी होते आणि त्याचा प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो.

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये डिसेंबर २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार मांडीवर ठेवून लॅपटॉप वापरण्याचे अनेक तोटे होऊ शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते संपूर्ण जगातील जवळजवळ प्रत्येक सहावी व्यक्ती वंध्यत्वाचा सामना करत आहे. भारतातही १५-२० टक्के जोडपी वंध्यत्वाचा सामना करत आहेत. यापैकी ४०-५० टक्के प्रकरणे पुरुषांच्या वंध्यत्वामुळे होतात. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, अंडकोषांचे तापमान शरीराच्या सामान्य तापमानापेक्षा सुमारे ३ अंश सेल्सिअसने कमी असले पाहिजे. लॅपटॉप मांडीवर ठेवून बराच काळ वापरला जातो तेव्हा त्याची उष्णता थेट अंडकोशाचे तापमान वाढवते. यामुळे शुक्राणूंच्या निर्मितीची प्रक्रिया मंदावते किंवा विस्कळीत होते. त्यामुळे प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

लॅपटॉप वायफायला कनेक्ट केल्यानंतर मांडीवर ठेवून वापरला तर नुकसान आणखी वाढू शकते. याचे कारण म्हणजे वायफायमधून निघणारे रेडिएशन शरीराच्या नाजूक भागांवर, विशेषतः अंडकोषांच्या कार्यावर परिणाम करते.

यामुळे शुक्राणूंच्या डीएनएला नुकसान होऊ शकते. त्यांची पुढे जात राहण्याची क्षमता कमी होऊ शकते आणि रचनादेखील खराब होऊ शकते. हे सतत केल्याने शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते आणि प्रजनन क्षमतेवर वाईट परिणाम होऊ शकतो.

नवसंशोधन


### विषाणू ओळखणारं उपकरण



विषाणूंच्या विविध प्रजाती शोधून ओळख पटवण्यासाठी एका नव्या उपकरणाचा शोध लावण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. हे उपकरण उपयुक्त आणि कमी खर्चिक आहे. 'व्हिरिऑन' असं त्याचं नाव आहे. हे उपकरण वैद्यकीय क्षेत्रातच नाही तर इतर क्षेत्रातही वापरता येऊ शकतं. या उपकरणाचा वापर करून शेतकरी शेतातले रोगजंतू शोधू शकतात. हे उपकरण काही क्षणांमध्ये विषाणूंची ओळख पटवत असल्यामुळे विकारांचं निदान लवकर होऊ शकतं. त्यामुळे उपचारांनाही लवकर सुरूवात होऊ शकते. प्रत्येक डॉक्टरकडे हे उपकरण असायला हवं. ग'ामीण भागात या उपकरणाचा अधिक चांगला वापर होऊ शकतो.

काळजी डोळ्यांची

### लहानग्यांनाही होतो मोतीबिंदू!



मोतीबिंदू फक्त प्रौढांना होतो, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात लहान मुलांना आणि त्यातही छोट्या बाळांना मोतीबिंदू होऊ शकतो. मोतीबिंदूमुळे अंधूक दिसू लागतं. काही वेळा दृष्टी अधू होते. मोतीबिंदूचा प्रादुर्भाव एका किंवा दोन्ही डोळ्यांना होऊ शकतो. त्यामुळे लहानग्यांच्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यायला हवी. मोतीबिंदू जन्मजात असू शकतो. मातेला काही आजार झाल्यास गर्भातल्या बाळाच्या डोळ्यांमध्ये दोष निर्माण होऊ शकतात. ही समस्या अनुवंशिकही असू शकते. बाळाच्या पालकांना लहानपणी मोतीबिंदू झाला असेल तर मुलांनाही हा त्रास होऊ शकतो.

जपणूक त्वचेची

### मध ठरतो उपयुक्त



थंडीत त्वचा कोरडी पडते. ओठ फुटतात. म्हणूनच या दिवसात कोल्ड क'ीम, बॉडी लोशन, लिप बामचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. मात्र निसर्गाने त्वचेच्या रक्षणासाठी बरीच आयुधं दिलं आहेत. त्यापैकी एक म्हणजे मध. खोबरेल तेल, मध, लॅनोलिन आणि ई जीवनसत्त्व यांचा वापर करून घरच्या घरी लिप बाम किंवा क'ीम तयार करता येईल. या क'ीममुळे त्वचा कोरडी पडणार नाही.

आजीबाईचा बटवा

### लाभ लवंगयुक्त पाण्याचे...



लवंगांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. दंतविकारांमध्ये लवंग खूप लाभदायी ठरते. लवंगामुळे इतर काही विकारांनाही प्रतिबंध करता येतो. लवंगयुक्त पाणीही औषधी असतं. या पाण्याचं सेवन नियमितपणे करायला हवं. हिवाळ्यात लवंगेचं पाणी पिणं गरजेचं आहे. या पाण्यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. वजन कमी करणार्यांसाठीही हे पाणी उपयुक्त असतं. शरीराचा दाह कमी करण्याचा गुणधर्मही यात आहे. एका भांड्यात पाणी घेऊन दोन-तीन लवंगा भिजवून ठेवा. लवंगा रात्रभर भिजत ठेवा. सकाळी उठल्यावर हे पाणी प्या. या पाण्यामुळे वजन कमी होण्याच्या प्रकि'येचा वेग वाढतो.

महासागर





# सेन्सेक्स 300 अंकांनी घसरला
## गुंतवणूकदारांचे 50000 कोटी रुपये बुडाले



**मुंबई, दि.२ प्रतिनिधी**

अस्थिर व्यापार सत्रानंतर भारतीय शेअर बाजार बुधवार २ जुलै रोजी घसरून बंद झाले. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारावरील अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांची भावना कमकुवत झाली आणि बाजारात नफा बुकिंग दिसून आले. सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स २३६.५६ अंकांनी वाढून ८३,९३३.८५ च्या उच्चांकावर पोहोचला होता. परंतु दिवसअखेरीस तो २८७.६० अंकांनी घसरून ८३,४०९.६९ वर बंद झाला. त्याचप्रमाणे, निफ्टीनेही सकाळची वाढ गमावली आणि २५,४५० च्या खाली २५,४५३.४० वर बंद झाला. यामुळे आज गुंतवणूकदारांना ५०,००० कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले.

निफ्टी मेटल इंडेक्स १.३८% वाढला. आयटी, फार्मा आणि ऑटो क्षेत्रांमध्येही अनुक्रमे ०.१७%, ०.३५% आणि ०.३४% वाढ झाली. दुसरीकडे, निफ्टी रिॲल्टी निर्देशांक सर्वाधिक १.४२% ने घसरला. मीडिया आणि

**सेन्सेक्स 83,409**

**निफ्टी 25,453**

पीएसयू बँक निर्देशांकांमध्येही अनुक्रमे ०.४% आणि ०.८३% ची घसरण झाली. निफ्टी मिडकॅप १०० ०.१७% आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.४२% घसरला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज २ जुलै रोजी ४६०.७६ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील दिवशी म्हणजेच सोमवार, १ जुलै रोजी ४६१.२६ लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आज सुमारे ५०,००० कोटी रुपयांनी कमी झाले आहे. सेन्सेक्समधील ३० पैकी १४ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये टाटा स्टीलच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.७२ टक्के वाढ झाली. यानंतर, एशियन पेंट, अल्ट्राटेक सिमेंट, ट्रेंट आणि मारुती सुझुकीचे शेअर्स १.३८ टक्के २.१५ टक्क्यांनी वाढून बंद झाले.

# दलाई लामांच्या निर्णयाने चीन संतप्त

**धर्मशाळा, दि. २ वृत्तसंस्था**



तिबेटी धर्मगुरू १४ वे दलाई लामा (तेन्झिन ग्यात्सो) यांनी त्यांच्या उत्तराधिकारीच्या निवडीबाबत चीनच्या हस्तक्षेपाला ठामपणे विरोध दर्शवत, पुन्हा एकदा स्पष्ट केलं आहे की, त्यांच्या पुनर्जन्माची प्रक्रिया पारंपरिक तिबेटी बौद्ध पद्धतीनेच होणार आहे आणि याचा एकमेव अधिकार गदेन फोड्रंग ट्रस्टकडेच आहे.

दलाई लामांनी एका अधिकृत निवेदनातून सांगितले की, "गदेन फोड्रंग ट्रस्टशिवाय कोणालाही माझ्या पुढील पुनर्जन्मात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही." त्यांनी ही घोषणा त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर केली असून, चीनच्या या मुद्द्यावर केलेल्या दाव्यांना थेट आव्हान दिले आहे.

दलाई लामांनी २०११ मध्ये घेतलेल्या एका निर्णयाचा पुनःउच्चार करत सांगितले की, पुढील दलाई लामाची निवड गदेन फोड्रंग ट्रस्टच्या नेतृत्वातच होईल. यासाठी तिबेटी बौद्ध परंपरेतील प्रमुख धर्मगुरू आणि धर्मपालक यांचाही सल्ला घेतला जाईल.

तसेच त्यांनी १९६९ मध्ये केलेल्या विधानाची आठवण करून दिली – की, दलाई लामा संस्था सुरू ठेवायची की नाही, हे निर्णय तिबेटी लोकांवर आणि तिबेटी बौद्ध धर्माच्या अनुयायांवर सोडावे.

चीन सरकारने पूर्वीच दावा केला होता की, पुढील दलाई लामाची निवड त्यांनीच केली पाहिजे. चीनच्या या भूमिकेमुळे अनेक वर्षांपासून वाद सुरू आहे. परंतु दलाई लामांच्या या स्पष्ट भूमिकेमुळे चीनच्या मनसुब्यांना मोठा झटका बसला आहे. दलाई लामांनी केलेल्या पुनर्जन्मासंबंधीच्या ताज्या घोषणेमुळे चीन संतप्त आहे, याची अनेक ठोस कारणं आहेत.

चीनने गेल्या काही दशकांपासून तिबेटवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी धर्माचा वापर करण्याचा प्रयत्न केला आहे. दलाई लामांचा पुनर्जन्म जर तिबेटी परंपरेनुसार, चीनबाहेर झाला, तर चीनचा "आपला दलाई लामा निवडण्याचा" प्लॅन फसतो.

दलाई लामांनी घोषित केलं आहे की "फक्त गदेन फोड्रंग ट्रस्टलाच माझ्या पुनर्जन्माची ओळख पटवण्याचा अधिकार आहे, चीनला नाही." यामुळे चीनने निवडलेल्या 'सरकारी दलाई लामा'ला तिबेटी बौद्ध धर्मगुरूंनी मान्यता न दिल्यास, तो फक्त "राजकीय कठपुतळी" ठरेल. यामुळे चीनची आंतरराष्ट्रीय प्रतिमा डागाळते.

भारत, नेपाळ, मंगोलिया, रशिया, जपान, श्रीलंका आदी देशांतील बौद्ध अनुयायांचा झुकाव दलाई लामा आणि तिबेटी परंपरेकडे आहे – चीनकडे नाही.

दलाई लामांचा पुनर्जन्म भारतात किंवा परदेशात झाला, तर जागतिक बौद्ध नेतृत्व भारताकडे वळण्याची शक्यता आहे, जी गोष्ट चीनला अजिबात मान्य नाही.

# अमेरिकेकडून भारतावर ५०० टक्के टॅरिफ शक्य

**वॉशिंग्टन, दि. २ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यांनी एका नव्या सिनेट विधेयकाला मंजुरी दिली असून, यामध्ये रशियाकडून तेल आणि ऊर्जा खरेदी करणाऱ्या देशांवर — मुख्यतः भारत आणि चीनवर — तब्बल ५०० टक्के आयात शुल्क लावण्याचा प्रस्ताव आहे.

ही कारवाई रशियावर दबाव वाढवण्यासाठी आणि त्याला युक्रेन युद्धाच्या मुद्द्यावर चर्चेसाठी टेबलावर आणण्यासाठी करण्यात येत असल्याचे सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी ABC News ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, "ट्रम्प यांनी मला या विधेयकावर मतदान घेण्यास सांगितले आहे."

ग्रॅहम प्रायोजित करीत असलेले हे विधेयक अत्यंत कठोर स्वरूपाचे आहे. त्यानुसार, जे देश रशियाशी ऊर्जा व्यवहार करतात आणि युक्रेनला मदत करत नाहीत, त्यांच्यावर ५०० टक्के टॅरिफ लावण्यात येईल.

भारत आणि चीन हे रशियाच्या कच्च्या तेलाचे सर्वात मोठे खरेदीदार आहेत. या खरेदीमधून रशियाला युद्धासाठी आर्थिक पाठबळ मिळत असल्याचा दावा



अमेरिकेकडून केला जात आहे. मे २०२५ मध्ये भारताने रशियाकडून ४.२ अब्ज युरो मूल्याचे जीवाश्म इंधन विकत घेतले. त्यापैकी ७२ टक्के म्हणजे बहुसंख्य हिस्सा हा कच्च्या तेलाचा होता. याआधी ग्रॅहम यांनी सांगितले होते की, "या विधेयकाला ८४ सहप्रायोजक मिळाले आहेत. त्यामुळे ते सहज संमत होईल. मात्र, अंतिम निर्णय ट्रम्प यांच्याकडे असेल. ते या टॅरिफवर 'विवेकाधिकार' वापरू शकतात."

रशियाचे राजकीय सत्ता केंद्र क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी या प्रस्तावावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, "सिनेटर ग्रॅहम यांच्या भूमिका जगाला माहीत आहेत. त्या नेहमीच रशियाविरोधी राहिल्या आहेत. त्यांनी आधीच या प्रकारच्या निर्बंधांची मागणी केली होती."

# घाई-गर्दीच्या वेळेत ओला-उबरचे भाडे होणार दुप्पट

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने कॅब कंपन्या जसे की ओला, उबर, रॅपिडो यांना मोठा दिलासा दिला आहे. यामुळे आता या कंपन्यांना पीक ट्राफिक आवर म्हणजे गर्दीच्या वेळांमध्ये मूळ भाडे दुपटीपर्यंत वाढवण्याची मुभा मिळाली आहे. १ जुलै रोजी रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या मोटार व्हेकल ॲग्रीगेटर गाईडलाईन्स (MVAG) नुसार ही परवानगी देण्यात आली आहे. यापूर्वी भाडे वाढवण्याची कमाल मर्यादा ही मूळ भाड्याच्या दीडपट इतकीच होती, पण आता ती दुप्पट करण्यात आली आहे. याचा परिणाम प्रवाशांच्या खिशावर होणार आहे.

पुढील तीन महिन्यात हे सुधारित नियम लागू करावेत





अशा सूचना राज्यांना देण्यात आल्या आहेत. या नवीन भाडे वाढवण्यासंबंधी रचनेमुळे आता या कंपन्यांना मागणीच्या प्रमाणात भाडे कमी-जास्त करता येणार आहे. तसेच यामुळे एकंदरीत दर वाढीबद्दल एक नियमावली असणार आहे.

तसेच एमव्हीएजी २०२५ मध्ये आणखी एक मोठा बदल करण्यात आला आहे. ज्यानुसार संबंधित राज्य सरकारने परवानगी दिल्यानंतर, ॲग्रीगेटर्सच्या माध्यमातून आता गैर-वाहतूक (non-transport) म्हणजेच खाजगी दुचाकींना पॅसेंजर प्रवासासाठी वापरता येणार आहे.

वाहतूक कोंडी कमी करणे, वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे आणि परवडणारी गतिशीलता आणि हायपरलोकल डिलीव्हरी यांची उपलब्धता सुधारणे हे ध्येय लक्षात ठेवून "राज्य सरकार ॲग्रीगेटर्सद्वारे शेअर्ड मोबिलिटी म्हणून प्रवाशांच्या प्रवासासाठी गैर-वाहतूक दुचाकींचे ॲग्रीगेशन करण्यास परवानगी देऊ शकते," असे या मार्गदर्शक सूचनांमध्ये म्हटले आहे.

केंद्र सरकारने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या कलम २३ नुसार, अशा दुचाकींच्या वापरासाठी ॲग्रीगेटर्सकडून दररोज, आठवड्याला किंवा दर पंधरा दिवसांनी शुल्क वसूल करण्याचा अधिकार राज्यांना असेल.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना

**नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ५ देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. २ ते ९ जुलै दरम्यान होणारा हा ८ दिवसांचा दौरा गेल्या १० वर्षातील त्यांचा सर्वात मोठा राजनैतिक दौरा असेल. या काळात पंतप्रधान मोदी हे घाना, त्रिनिदाद-टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबियाला भेट देतील. ते ६-७ जुलै रोजी ब्राझीलमध्ये होणाऱ्या १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेलाही उपस्थित राहतील.

पंतप्रधान मोदींचा दौरा घाना इथून सुरू होईल. पंतप्रधान २ ते ३ जुलैपर्यंत तिथं राहतील. विशेष म्हणजे, घाना हा असा देश आहे, जिथं गेल्या तीन दशकांमध्ये कोणत्याही भारतीय पंतप्रधानांनी भेट दिलेली नाही. या दरम्यान, पंतप्रधान मोदी घानाच्या राष्ट्रपतींना भेटतील आणि आर्थिक, ऊर्जा आणि संरक्षण सहकार्याला नवीन उंची देण्याबाबत चर्चा करतील. दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याची ही एक सुवर्णसंधी असेल.

यानंतर, पंतप्रधान मोदी ३-४ जुलै रोजी त्रिनिदाद-टोबॅगोला पोहोचतील. १९९९ नंतर भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा असेल. या भेटीमुळे भारत आणि या कॅरिबियन देशांमधील व्यापार आणि सांस्कृतिक संबंधांना नवीन बळकटी मिळेल.

दौऱ्याचे तिसरं ठिकाण अर्जेंटिना असेल. पंतप्रधान मोदी ४-५ जुलै रोजी अर्जेंटिनामध्ये असतील. तिथं ते संरक्षण, कृषी, खाणकाम, तेल आणि वायू यांसारख्या क्षेत्रातील भागीदारी आणखी मजबूत करण्यावर भर देतील. या भेटीमुळे भारत आणि अर्जेंटिना यांच्यातील आर्थिक आणि धोरणात्मक संबंधांना एक नवा आयाम मिळेल. यानंतर पंतप्रधान ५ ते ८ जुलै दरम्यान ब्राझीलला भेट देतील. रिओ दि जेनेरिओ इथं होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी ब्राझीलचे अध्यक्ष लुला दा सिल्वा यांची भेट घेतील.

शिखर परिषदेनंतर, अध्यक्ष सिल्वा पंतप्रधान मोदींसाठी खास डिनरचं आयोजन करणार आहेत. ब्रिक्स शिखर परिषदेत, पंतप्रधान मोदी जागतिक प्रशासनातील सुधारणा, शांतता आणि सुरक्षा, बहुपक्षीय संस्था मजबूत करणं, एआयचा जबाबदार वापर, हवामान बदलाचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक पावलं आणि जागतिक आरोग्य यावर चर्चा करतील.

पंतप्रधान मोदींच्या भेटीचा शेवटचा मुक्काम नामिबियात असेल. पंतप्रधान ९ जुलै रोजी नामिबियाला पोहोचतील. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील सहकार्याला नवी चालना मिळेल.

# कुटुंबाचा आधारवड स्नेहालय



स्नेहालय कुटुंब सेवा केंद्र ही एक ना-नफा संस्था आहे जी जोडप्यांना आणि कुटुंबांना सक्षम करण्यासाठी समर्पित आहे आणि तिचे अस्तित्व मुंबई, भारतात आहे.स्नेहालय एक अशी जागा जिथे जोडप्यांना मार्गदर्शन मिळू शकते आणि कुटुंबांना शक्ती, उपचार आणि दिशा मिळू शकते. आज कुटुंबांना पूर्वीपेक्षा जास्त ताणतणावाचा सामना करावा लागत आहे. अनेक व्यक्ती, अडचणींना तोंड देऊ शकत नाहीत, प्रियजनांवर टीका करतात, मादक पदार्थांचे सेवन करतात किंवा नैराश्य आणि एकाकीपणात पडतात. दबावाखाली विवाह तुटत आहेत, ज्यामुळे वेगळे होणे आणि घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे. पिढ्यान्पिढ्या अंतर वाढत असल्याने पालक-मुलांचे संबंध ताणले जात आहेत, विशेषतः वेगाने विकसित होत असलेल्या डिजिटल जगात. संयुक्त कुटुंब व्यवस्था, शहरीकरण आणि विभक्त कुटुंब संरचनांच्या ऱ्हासामुळे, पारंपारिक आधार प्रणाली नष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे कुटुंबे पूर्वीपेक्षा अधिक

**लोकसेवार्थ**

असुरक्षित झाली आहेत.कुटुंब प्रेमाचे आश्रयस्थान असू शकते किंवा संघर्षाचे रणांगण असू शकते फरक बहुतेकदा योग्य वेळी योग्य पाठिंबा मिळण्यात असतो.

या वाढत्या आव्हानांना ओळखून, कॅथोलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडिया आणि

**लोकजागर**

कॉन्फरन्स ऑफ कॅथोलिक बिशप्स ऑफ इंडिया यांनी विवाह आणि कौटुंबिक जीवनाला पाठिंबा देण्यासाठी समर्पित कुटुंब सेवा केंद्राची मागणी केली. या आवाहनाला प्रतिसाद देत, मुंबईच्या आर्चडायोसीसने जोडप्यांना आणि कुटुंबांना मजबूत, चिरस्थायी नातेसंबंध निर्माण करण्यास मदत करण्यासाठी व्यावसायिक मार्गदर्शन, समुपदेशन आणि समृद्धी कार्यक्रम प्रदान करण्यासाठी स्नेहालय म्हणजे "प्रेमाचे निवासस्थान" ची स्थापना केली.

सुरुवातीपासूनच, स्नेहालयचे नेतृत्व समर्पित संचालकांनी केले आहे जे हे एक असे ठिकाण बनवण्यासाठी वचनबद्ध आहेत जिथे दुखापतग्रस्त व्यक्तींना उपचार मिळतात, संघर्ष करणाऱ्या विवाहांना नूतनीकरण मिळते आणि मजबूत कुटुंबे आणखी मजबूत होतात.स्नेहालय येथे, आम्ही तुमच्यासोबत चालतो, प्रेम, लवचिकता आणि आशेने भरलेले भविष्य घडवण्यास मदत करतो.स्नेहालय या सामाजिक संस्थेची उद्दिष्टे हि सर्वसमावेशक अभ्यासक्रमांद्वारे जोडप्यांना लग्नासाठी तयार करणे, व्यक्ती आणि जोडप्यांना समुपदेशन आणि पाद्री काळजी घेऊन पाठिंबा देणे, पती-पत्नीमधील बंध मजबूत करणाऱ्या कार्यक्रमांनी वैवाहिक जीवन समृद्ध करणे आजच्या जगाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी जोडप्यांना आणि कुटुंबांना मार्गदर्शन करणे हि आहेत. खरोखरच स्नेहालय हि संस्था अनेक कुटुंबासाठी एक आधारवडच आहे.

# नागपूरच्या तरुण उद्योजिकेचा यशस्वी प्रवास

सर्वसामान्य कुटुंब राहात असलेल्या तरुणीने वडिलांपासून प्रेरणा घेऊन वयाच्या 14 व्या वर्षी दुग्ध व्यवसायात पाऊल ठेवले. यासाठी तिला तिच्या बहिणीचीही साथ मिळाली. या व्यवसायाचा हळूहळू अनुभव घेत आज तिने हॉटेल उद्योग क्षेत्रात आपले नाव कमावले आहे. या माध्यमातून काही हजार रुपयांचा व्यवसाय आज कोटींच्या घरात पोहोचला आहे. पण एक महिला म्हणून हे तिच्यासाठी सोपे नव्हते. मात्र जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणा यातून हे सर्वसाध्य करून दाखवले ती म्हणजे नागपूरच्या अलका दिघोरीकर या उद्योजिकीने.



अलका यांनी लहानपणीच उद्योजक होण्याचे स्वप्न पाहिले होते, ही प्रेरणा त्यांना तिच्या वडिलांकडून मिळाली होती. त्या दृष्टीने अलका यांनी वयाच्या चौदाव्या वर्षीच दूध डेअरीचा व्यवसायात पाऊल टाकले. 25 ते 30 पैसे लिटरमागे मिळवत दुसरीकडे तिने शिक्षणही सुरू ठेवले. मात्र, उच्च शिक्षण तिला घेता आले नाही. हॉटेल व्यवसायात उतरण्यापूर्वी तिने एका कुरियर एजन्सीतही काम केले. सुरुवातीला एअर हॉस्टेस होण्याचे स्वप्न होते. ते दिल्ली सारख्या शहरात अनेक एअर्व्हेज सर्विसेस मध्ये काम मिळवत पूर्ण केले. पुढे एअरलाईन सर्विसेस मध्ये ग्राउंड होस्टेस म्हणून सात वर्षे काम केले. नॉन शेड्युल फ्लाईटसह अनेक ठिकाणी वेग वेगवेगळ्या पदावर काम केले. जवळपास सात वर्षांच्या अनुभवाच्या शिदोरी घेऊन हॉटेल इंडस्ट्रीत प्रवेश झाला. व्यवस्थापक पदावर दोन मोठ्या ग्रुपसोबत जोडली गेल्याने, पुन्हा 6 ते 7 वर्षे काम करत या व्यावसायिक क्षेत्राला समजून घेतले. त्यानंतर मात्र आपणच या

**शून्यातून विश्व**

व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेऊन 2017 मध्ये हॉटेल व्यवसायाला सुरुवात केल्याची माहिती अलका दिघोरीकर यांनी दिली. हॉटेल व्यवसाय सुरू करताना भांडवलही मोठ्या प्रमाणात लागणार होते. त्यासाठी सुरुवातीला बँकेतून कर्ज काढले. स्वतः जवळचे काही पैसे गोळा केले. उपलब्ध भांडवलावर स्वत:चे हॉटेल बांधने शक्य नव्हते. त्यामुळे इमारत भाडे तत्वावर घेऊन कामाला सुरुवात केली. पुढे काम वाढत गेले, व्यवसाय वाढला आणि उत्पन्नही वाढले. त्यातून त्यांनी दुसरे हॉटेल घेतले. मात्र, गेल्यावर्षी कोरोनाच्या महामारीने आमच्या वाटचालीमध्ये आडकाठी घातल्याचे अलका यांनी सांगितले. या क्षेत्रात महिला म्हणून स्पर्धेत टिकताना अनेक अडचणी सामोर आल्यात. काम करताना पाय ओढणारे मिळाले. यातून सावरत व्यवसाय रुळावर येतोच तेच कोरोनाच्या महामारीने चक्र थांबले. आर्थिक नुकसान झाले दुसरे हॉटेल बंद पडले. कर्मचारी यासर्व स्टाफ आणि पैसे कुठून आणायचा असे अनेक प्रश्न समोर उभे राहिल. मात्र, अनुभव आणि जनसंपर्काच्या जोरावर पुढे हळूहळू उत्तर सापडल्याने यातून सावरण्याचा मार्ग निघाला, असल्याचे दिघोरीकर यांनी सांगितले.

मागील अनुभवात अनेक गोष्टी कळल्या. या क्षेत्रात फार काही शिक्षण नसतानाही लाख मोलाचा अनुभव कामी आला. मी रतन टाटा यांना आदर्श मानते. तसेच या क्षेत्रातील जाणकार पदमेश गुप्ता, सुधीर बॅनर्जी यासारख्या ज्येष्ठ व्यावसायिकांकडून आजही अनेक धडे मिळतात. त्यांच्या विचारातून उर्जा घेत कामातील उणिवा शोधल्या आणि स्वत:ची एक ताकद निर्माण करत अडचणीवर मार्ग काढला. तसेच कुणाल बावनकार सारखा विश्वासू सहकारी यासह इतर कर्मचारी या सगळ्यांच्या मदतीने हा डोलार कठीण काळातही उभा ठेवण्यात यशस्वी झालो असल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या दूध व्यवसायापासून सुरू झालेला प्रवास हा हॉटेल उद्योगापर्यंत येऊन पोहोचला. यात 70 लोकांना रोजगार उपलब्ध करून देता आला. भविष्यात स्वतःच्या मालकीचे हॉटेल असावे किमान 700 लोकांना जॉब देता येईल, असे काम उभे करण्यासाठी पाऊल टाकले आहे. लवकरच ते स्वप्न पूर्णत्वास जाईल अशी आशा आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कर्नाटक काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदावरून अंतर्गत संघर्ष तीव्र

**बंगळुरू, दि. २ वृत्तसंस्था**

कर्नाटक काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदावरून अंतर्गत संघर्ष तीव्र झाला आहे. दरम्यान, काँग्रेस नेते आणि कर्नाटक प्रभारी रणदीप सिंह सुरजेवाला बेंगळुरूच्या दौऱ्यावर आले आहेत आणि ते पक्षाच्या आमदारांसोबत सतत बैठका घेत आहेत. उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांचे निकटवर्तीय आमदार इक्बाल हुसेन यांनी दावा केला की सुमारे १०० आमदार मुख्यमंत्री बदलण्याच्या बाजूने आहेत. जर आता बदल झाला नाही तर काँग्रेस २०२८ च्या निवडणुकीत विजय मिळवू शकणार नाही. हुसेन यांनी बोलताना सांगितले की, आम्ही सुरजेवाला यांच्यासमोर हा मुद्दा उघडपणे उपस्थित करू. शिवकुमार यांनी पक्षासाठी दिवसरात्र काम केले आहे आणि आता त्यांना मुख्यमंत्री होण्याची संधी मिळाली पाहिजे.

२०२३ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मोठ्या विजयात डीके शिवकुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तेव्हा ते मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार होते, परंतु पक्षाच्या हायकमांडच्या आदेशावरून त्यांनी उपमुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यावेळी रोटेशनल सीएम फॉर्म्युला हा मुद्दाही समोर आला होता, परंतु तो कधीही सार्वजनिकरित्या मंजूर झाला नव्हता. आता पुन्हा एकदा हा मुद्दा उघडपणे समोर आला आहे.

# दर्शन रांग गोपाळपूरमध्ये, तरीही चक्क पाच तासांत भाविक विठुरायाच्या चरणी

**पंढरपूर, दि. २ प्रतिनिधी**

यंदा आषाढीमध्ये व्हीआयपी दर्शन बंद झाल्यानंतर मोठा चमत्कार दिसून आला. दर्शन रांग गोपाळपूरमध्ये असतानाही फक्त 5 तासांमध्ये भाविक थेट विठुरायाच्या चरणापाशी पोहोचू लागले आहेत. या याधी याच दर्शनासाठी १५ ते १६ तास लागायचे. आता केवळ पाच तासात विठ्ठलाचे दर्शन होत असल्याने भाविकातून समाधान व्यक्त केलं जात आहे.

खरंतर ही आषाढी यंदा विक्रमी होणार अशी परिस्थिती आहे. आषाढी एकादशी सोहळ्याला अजून चार दिवसांचा अवधी असतानाच देवाच्या दर्शन रांगेत दोन लाखापेक्षा जास्त भावी उभे आहेत. इतर वेळेला दर्शन रांग गोपाळपूरमध्ये असताना भाविकांना १५ ते १६ तास इतका वेळ



दर्शनाला लागत असे. मात्र यंदा मात्र व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे भाविकांचा दर्शनाचा १५ तासाचा वेळ केवळ पाच ते सात तासांवर आला आहे.

व्हीआयपी बंदच्या दणक्याने अनेक व्हीआयपी नाराज जरी झाले असले तरी त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. यंदाच्या आषाढीमध्ये आमचे व्हीआयपी फक्त वारकरी असतील ही भूमिका पालकमंत्र्यांनी घेतली आणि स्वतःही मुखदर्शन घेत आपण केलेला नियम पाळण्यास सुरुवात केली. त्यामुळेच तथाकथित व्हीआयपी लोकांचे वांदे झाले असले तरी वारकरी भाविक मात्र खुशीत आहेत. १५ तासाचे दर्शन पाच तासात होऊ लागल्याने दर्शन रांगेवरील ताणही पूर्णपणे कमी झाला आहे.

भाविकही आता अल्पावधीमध्ये देवाच्या चरणापर्यंत पोहोचू लागत असल्याने त्यांनाही हे दर्शन सुखकर होत आहे. यंदा आषाढी एकादशी यंदा ६ जुलै २०२५ रोजी आहे. त्यानिमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणार आहेत.

# 'तो' बलात्कार होता तर आरोपीच्या अंगावर 'लव्ह बाईट्स' कसे?

## वकिलाचा धक्कादायक सवाल

**कोलकाता, दि. २ वृत्तसंस्था**

कोलकाता येथील एका लॉ कॉलेजमध्ये सामूहिक बलात्काराचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वीच समोर आला. पोलिसांनी या प्रकरणी माजी विद्यार्थी आणि दोन सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अटक केली. ही घटना २५ जून रोजी सायंकाळी ७:३० ते १०:५० दरम्यान कॉलेज कॅम्पसमध्ये घडली. पीडित २४ वर्षीय विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीनुसार, तिला तीन आरोपींनी घेरले. त्यापैकी दोघांनी तिला तिसऱ्या आरोपीच्या खोलीत डांबले. यानंतर तिसऱ्या आरोपीने तिला शौचालयात ओढत नेत बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात अनेक नवनवीन माहिती समोर येत आहे. तशातच मुख्य आरोपी ३१ वर्षीय मोनोजित मिश्रा याच्या वकिलांनी एक धक्कादायक सवाल केला आहे.

मुख्य आरोपी मोनोजित मिश्रा याचे वकिलपत्र घेतलेल्या वकिलांनी असा सवाल केला आहे की, बलात्काराच्या वेळी आरोपीच्या शरीरावर उठलेल्या ओरखड्यांव्यतिरिक्त 'लव्ह बाईट्स' देखील सापडले आहेत. याबद्दल सरकारी वकिलांनी काहीही भाष्य केलेले नाही. तो जर बलात्कार होता, तर आरोपीच्या शरीरावर लव्ह बाईट्स कसे काय आले? असा धक्कादायक सवाल आरोपीच्या वकिलांनी केला आहे.

सरकारी वकिलांनी मेडिको-लीगल तपासणीनंतर युक्तिवादात असे सांगितले की, आरोपीच्या शरीरावर ओरखडे सापडले आहेत, ज्याचा अर्थ पीडितेने आरोपीला रोखायचा प्रयत्न केला होता. या युक्तिवादाला उत्तर देताना आरोपीच्या वकिलांनी धक्कादायक दावा केला. "सरकारी वकिलांनी सांगितले की मुख्य आरोपीच्या शरीरावर ओरखडे उठल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. पण आरोपीच्या शरीरावर लव्ह बाईट्सही सापडल्याचे त्यांनी सांगितले का? जर हा बलात्कार असेल तर आरोपीच्या शरीरावर लव्ह बाईट्स नसायला हवेत," असा युक्तिवाद मोनोजितचे वकिल राजु गांगुली यांनी केला.

महासागर MUMBAI
RNI No.: MAHAMAR/2016/79101
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From Bora Bazar Street,Fort, Mumbai -400001. Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK

महासागर मुंबई
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून बोरा बाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2016/79101